म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. क्र. २१२८

सामाजिक विचार मंथन

REFBK-0023447

गोई माधवराव बागल

सं. निबंध
(सामाजिक)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा दंडणी भरावी लागेल.

21 APR 1982

(क्र. मा. प.)
५०००-४-८०



बहुजनसमाजाचे झुंजार नेते भास्करराव जाधव यांना—

निवेदन

महाराष्ट्रातील बुद्धिवादी विचारवंत व क्रांतिकारी नेते भाईमाधवराव बागल यांचे 'सामाजिक विचार मंथन' हे पुस्तक वाचकांच्या हाती देताना, आम्हाला अत्यानंद होत आहे. भाईजींनी सबंध आयुष्यात अत्याचार व अन्यायाविरुद्ध लढा दिला. धार्मिक रुढीभंजन असो की, संस्थानी सरंजामशाही-विरोधी संघटन, श्रमिकांचा लढा असो की, पीडितांची न्यायमागणी, यासाठी त्यांनी जीवाचे रान केले. सबंध आयुष्य समर्पित केले. नाना कष्ट सहन केले. याच लढ्यातून निर्माण झालेले त्यांचे विचार, पलायनवादी नाहीत तर ते बंडखोर व परिवर्तनवादी आहेत. शाहू महाराज, महात्मा फुले व डॉ. बाबा-साहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांच्या व्यक्तिमत्वावर फार मोठा प्रभाव आहे. म्हणूनच भाईजी हे खरे सत्यशोधक आहेत. या सत्यशोधकाने वेळोवेळी लिहिलेल्या लेखांचा 'सामाजिक विचार मंथन' हा संग्रह म्हणजे पेटता पलिता होय. या विचारात महाराष्ट्रातील नव्या पिढीला विचारप्रवृत्त व अंतर्मुख करण्याचे प्रचंड सामर्थ्य आहे यात शंका नाही.

भाईजींनी आमच्यावरील लोभामुळे व सामाजिक कर्तव्यभावनेने हा लेखसंग्रह प्रकाशनार्थ दिला, त्याबद्दल आम्ही त्यांचे कृतज्ञ आहोत. प्रा. डॉ. गंगाधर पानतावणे यांनी भाईजींचा परिचय करून दिला आणि हा लेखसंग्रह मिळवून दिला हे ऋण विसरता येणार नाहीत. त्यांच्या सहकार्याशिवाय 'सामाजिक विचार मंथन' प्रकाशित होऊ शकले नसते हे कृतज्ञतापूर्वक नमूद करतो. नाथ मुद्रणालयातील सर्व कर्मचारी तसेच चित्रकार भ. मा. परसवाळे यांनी अनुरूप असे मुखपृष्ठ दिले त्याबद्दल या सर्वांचे आभार मानतो.

शंकरराव हातोले

संदर्भ निबंध (सामाजिक)
२९८
२३७७७
२७/२/८२

सामाजिक विचार मंथन

भाई माधवराव बागल

REFBK-0023447

आनंद प्रकाशन
औरंगाबाद

प्रकाशन क्रमांक – १३

प्रकाशक –
शंकरराव हातोले
बी. कॉम्, बी. लिब्. एस्सी.
आनंद प्रकाशन, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

सर्व हक्क सुरक्षित

प्रथमावृत्ती –
बुद्ध पौर्णिमा – १९८१

किंमत : अठरा रुपये पन्नास पैसे.

मुखपृष्ठ –
भ. मा. परसवाळे

मुद्रक :
पं. बं. शेळके
नाथ मुद्रणालय,
शारदा कॉलनी, औरंगाबाद.

प्रमुख विक्रेते –
बौद्ध व दलित साहित्य विक्रेता,
आनंद बुक डेपो, जयसिंगपुरा, औरंगाबाद.



भाई माधवराव बागल.

अनुक्रमणिका

★ डॉ. आंबेडकर, म. फुले व राजर्षी शाहू यांची चरित्रे आचरायची असतात. १

★ अस्पृश्यतेला मूठमाती देण्यासाठी... ४

★ प्राथमिक अवस्थेतून ते म. फुल्यांपर्यंतची विचाराची वाट ८

★ रात्र वैऱ्याची आहे.... सत्यशोधकांनो, जागे रहा! १४

★ नास्तिकवाद २०

★ समाजसेवा २७

★ सत्यशोधकांचा समता संघर्ष ३१

★ बुद्धिझम व कम्युनिझमचा समन्वय झालाच पाहिजे! ३८

★ गोब्राह्मण प्रतिपालक नव्हे– पीडितांचे, सामान्यांचे शिवाजी महाराज! ४१

★ चिरंजीव आमचा शाहुराया ५२

★ राजकीय क्षेत्रात– ६२

★ विचारतरंग ६९

★ मी समाजवादी कसा बनलो! ७२

★ मराठवाड्यातील अत्त्याचार अखेर दलितांना कल्याणकारकच ठरतील ७७

★ उद्घाटकीय भाषण : अस्मितादर्श पाचवा मेळावा, कोल्हापूर ७९

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
ग्रंथ क्रमांक
दिनांक
स्थळ प्रत

डॉ. आंबेडकर, म. फुले व राजर्षी शाहू यांची चरित्रे आचरायची असतात.

महात्मा फुल्यांच्यावर मी अनेक लेख लिहिले आहेत, अनेकांनी लिहिले आहेत व यापुढे अनेक लिहितील. फुले हा विषय पीएच. डी. साठी घेऊन अनेक पीएच. डी. झालेही आहेत. फुल्यांच्या जीवनाचा व विचाराचा अभ्यास करण्याकरिता जर्मनी, रशिया, अमेरिकेहून संशोधक महाराष्ट्रात येतात, येथे येऊन त्यांनी पुस्तकेही लिहिली आहेत. पण हे सर्व अभ्यास करून डिग्री मिळवण्यापुरतं झालं. पण अभ्यास करून डिग्र्या मिळवून ज्या समाजाचं चित्र डॉ. आंबेडकरांनी पाहिलं आणि भोगलं, ते स्वतःचा जीव धोक्यात घालून बदलण्याचा प्रयत्न किती जणांनी केला आहे? मनुष्याला पुस्तकी ज्ञानापेक्षा अनुभवच जाऊन शिकवतो. तो अंतःकरणात टिपून घेतो. तो भावनाप्रधान असल्यास अन्यायाचा प्रतिकार करण्यास स्वतःचा जीवही धोक्यात घालतो. अशा या मालिकेत शाहू–फुले–आंबेडकर बसतात, म्हणून ते पूज्य झाले. त्यांनी अन्यायाचा प्रतिकार करण्याकरिता जे कार्य केलं, त्यातूनच नवविचारांची ग्रंथनिष्पत्ती झाली. इतर वाचनाची अनुभवास जोड मिळाल्यास ते ग्रंथ इतर समाजास मार्गदर्शक ठरतात.

फुले, शाहू व आंबेडकर यांच्या कृतीचे व विचारांचे ग्रंथ आज वाचावयास मिळतात, पण वाचकांची वृत्ती वाचनापुढे जाऊन कृतीत उतरली आहे काय?

या प्रत्येक महात्म्यानी देव नको, मूर्तिपूजा नको सत्यनारायण नको, तुम्ही ईश्वराविषयी विचारच करू नका, असे सांगितले आहे.

शाहू महाराज म्हणतात,

'मूर्तीचे पूजक आपणास पवित्र म्हणवून घेऊ लागले आहेत. तीर्थाचे काल्पनिक माहात्म्य वाढविण्यात आले त्यामळे तेथील ब्राह्मणास विपुल मिष्ठान्न मिळू लागून द्रव्यप्राप्तीही फार होऊ लागल्याने, त्यांच्यात आळस व

दुर्व्यसने वाढून त्यांना विद्या शिकण्याचे अगत्य वाटेनासे झाले. मनुष्य उपजल्यापासून तो मरेपर्यंत त्यांचेकडून निरनिराळ्या रूपाने पैसे मिळवण्याकरिता व्रते, दाने वगैरे विषयीचे ग्रंथ तयार केले.

याप्रमाणे अज्ञान्यांच्या पैशावर ब्राह्मण म्हणविणाऱ्यांची चंगळ उडाल्याने ब्राह्मणातील विद्या नष्ट झाली. फल ज्योतिषशास्त्र वाढवून निरनिराळ्या ग्रहांची भीती घालून पैसे उपटण्याच्या युक्त्या निघाल्या.

"अमुक दिवस चांगला, तमक दिवस वाईट, अमक्या दिवशी प्रवास करावा, लग्न अमक्या मुहूर्तावर करावे, अशी थोतांडे काढून वेडगळ धर्मसमजुतीचा पगडा जनमानसावर बसवला!"

या पुराणग्रंथांनी व धर्मग्रंथांनी माणसाचं कोणतंही कल्याण साधलं नाही. माणसाची प्रगती केली नाही, विकासास अडथळा आणला, ही जाणीव शाहू, फुले, आंबेडकरांनी समाजाला करून दिली आहे. पण वक्ते, लेखक आणि वर्तमानपत्रे हे विचार फार तर छापण्यापलिकडे, वक्ता बोलण्यापलिकडे, लेखक लिहिण्यापलिकडे काय करतो?

प्रबोधनकार केशवरावजी ठाकरे म्हणतात,

"कोणत्याही काळाचा, कोणत्याही देशाचा इतिहास घ्या, तेथले देव-धर्मवाद्यांचे वर्तन माणुसकीला लाज आणणारेच आढळते. देव-धर्माची लुडबूड साफ नको, असा पुकार करणाऱ्या या लाखो सत्यशोधकांच्या प्राणहत्त्येने मानवांच्या इतिहासांची पानेच्या पाने बरबटून निघाली–"

मनूच्या कालापासून ते या काळापर्यंत ही हत्त्या अबाधितपणे चालत आलेली आहे, अधिकात अधिक जुलूम, हत्त्या, भ्रष्टाचार भोगावा लागला, तो अस्पृश्य जातीला. **"आज तर मराठवाड्यात या अत्त्याचाराचा कळस झाला आहे. जगाच्या इतिहासात अशी निर्घृण हत्त्या, बालहत्त्या, अशी कत्तल, अशी जाळपोळ अद्यापपर्यंत झाली नसेल!"**

बाबा आढावांचा 'सत्यशोधक'चा ताजा अंक वाचला व त्यातील लहानापासून ते वृद्धापर्यंत व स्त्रियांकडून मिळवलेली माहिती वाचू लागल्यावर माझे अंग थरथरू लागले, अश्रू आवरेनात!

ही भारतभूमी कोणाच्या मालकीची? हिंदूधर्मीयाची सुद्धा नव्हे. सात कोटी अस्पृश्यांचीही नव्हे. ती फक्त उच्चवर्णीय ब्राह्मण–ब्राह्मणेत्तरांचीच काय?

हा मालकीचा ताम्रपट त्यांना कोणी दिला ? त्यांनी इतरांना बुजगावण्यासाठी निर्माण केलेल्या दुष्टबुद्धी बुद्धिवान हरामखोरांनीच ना ?

पुण्यश्लोक आंबेडकरांनी, म. गांधींना त्यांच्या उपोषणावेळी उत्तर दिले, ते काय खोटे ?

'गांधीजी आम्हाला देश नाही, मातृभूमी नाही, येथे अस्पृश्यांना आसरा नाही, आधार नाही. या उच्चवर्णियांची मनुस्मृतीनं आणि गीतेनं माणुसकीच नष्ट केली आहे !'

भारत स्वतंत्र झाला. तो भारत कुणाचा! ते स्वातंत्र्य कुणाचे ?

ज्या धर्माने माणुसकीच नष्ट केली, तो गाडून टाकल्याखरीज अस्पृश्यांना स्वातंत्र्याचा लाभ मिळण शक्य नाही.

महात्मा फुल्यांच्यांही आता आपण पुढे गेलं पाहिजे. तो निर्मीकही नको. आपल्याला त्यातही देवत्वाचा वास येतो. आज भारत स्वतंत्र आहे, असं म्हटलं जातं. पण ते स्वातंत्र्य मागतं कोण ? जनता ? राज्यकर्ते, राज्य आघाडीचे असो, काँग्रेसचे असो अगर कोणत्याही पक्षाचे असो. त्या राज्यात अस्पृश्यांना संरक्षण मिळणार नाही, ही शाब्दिक आश्वासने फसवी आहेत.

आता इतर कोणापासूनही अपेक्षा न करता तुम्ही तुमची एकजूट बांधा.

मराठवाड्यांतील अत्त्याचारापासून शिका की आपल्यातील सर्व भेदाभेद टाकून एकी केली पाहिजे. त्यासाठी अस्पृश्यांनी बुद्धधर्माचा स्वीकार करायला पाहिजे, म्हणजे आपल्या शक्तीवर उभे राहाल.

आजची हत्त्या ही धर्माच्या नावाखाली आपलं वर्चस्व टिकवण्याकरता चालली आहे, त्या धर्माला देवाचा आधार आहे, तो आधार काढून टाकण्याचा प्रयत्न कोणाही अधिकाऱ्याने, पुढाऱ्याने, पक्षाने, आमदार, खासदार, मंत्र्याने केला नाही व कदापि करणार नाही. ती अंधश्रद्धा तुम्हीच गाडून टाका, म्हणजे वैचारिकदृष्टया स्वतंत्र व्हाल अन् वैचारिकदृष्टया स्वतंत्र झाल्यानंतर तो विचार तुम्हाला स्वस्थ बसू देणार नाही.

देव नाही. ईश्वर नाही. आकाशातला बाप नाही. जमिनीवर नाही, आकाशात नाही. स्वर्ग नाही, नरक नाही. पूर्वजन्म नाही, आत्मा नाही. तुमचं चांगलं वाईट करणारे तुम्हीच आहात. ही गुलामगिरी टाकून स्वतंत्र व्हा व तुमच्या मनगटाच्या जोरावर उभे रहा !

♠

अस्पृश्यतेला मूठमाती देण्यासाठी....

जयप्रकाशजींनी आडनावे बदलावीत, अशी एक सूचना केली आहे. प्रयत्न स्तुत्य आहे, पण त्याने हिंदू धर्मातला जातीवाद जाईल असे नाही, तो हिंदू धर्माशी कायमचा चिकटला आहे. तो धर्मातच गोवला गेला आहे. म्हणून अस्पृश्यांवर अत्याचार करणाऱ्यांना आपण ते धर्मकृत्यच करतो असे वाटते !

म्हणून एकूण समाजाची मानसिक घडणच बदलण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कायदा आणि प्रचार याची सांगड घातली पाहिजे. तो आदर्श छत्रपती शाहू महाराजांनी घालून आपल्या राज्यात फारच पुढचे पाऊल टाकले. याच दृष्टीकोनातून मी खालील सूचना सरकारपुढे ठेवत आहे.

इतर प्राण्यांहून मनुष्य प्राणी हा श्रेष्ठ आहे. कारण त्याच्यात बुद्धीची वाढ झाली आहे. तो विचार करू शकतो. धर्म, ईश्वर वगैरे कल्पना बुद्धीतूनच निघाल्या. म्हणून कल्पनेवर विश्वास ठेवा, श्रद्धा ठेवा असे त्याला सांगता येणार नाही. अमक्या धर्मात त्याने सांगितलेल्या आचारधर्मात बदल करता येणार नाही. ते नियम ईश्वरानेच घालून दिले, असे सांगून चालणार नाही. कारण ईश्वर तुमच्याच बुद्धीतून निर्माण केला. आता तीच बुद्धी सांगते की, अनुभवाला ईश्वर, धर्म–कर्म–विपाक या गोष्टी पटत नाहीत, म्हणून त्या त्याज्य आहेत. म्हणून विज्ञानावर श्रद्धा ठेवा, कारण ती श्रद्धा नव्या ज्ञाना–बरोबरच बदलत असते.

नाहीतरी प्रत्यक्षात धर्माचे नियम आता कोण पाळत असतो ?

विचारवंत ते आचार मी अमक्या धर्मात आहे, असे म्हणत असताही पाळत नसतात.

महात्मा गांधीजींची गोष्ट घ्या. ते स्वःला हिंदूधर्मीय म्हणवून घेत असताही हिंदू धर्माच्या त्यांच्या सद्सद्विवेक बुद्धीला न पटणाऱ्या आज्ञा पाळत नव्हते. मनुने स्वतःला ईश्वर बनवून चार वर्ण पाडले ! अस्पृश्यताही

त्यानेच निर्माण केली. त्यांनाही नियम बांधून दिले, पण मानवाला अशा प्रकारे हीन लेखणं महात्माजींच्या सद्सद्विवेक बुद्धीला पटलं नाही, म्हणून अस्पृश्यता घालवण्याकरिता त्यांनी प्राणांतिक उपोषण केले, ते हिंदू धर्मात राहून. त्यांची समजूत की, या कृत्यामुळे आपण हिंदू धर्माचा त्याग केला असं होत नाही. पण स्वतःला कट्टर हिंदू धर्मीय समजणाऱ्याला ते मान्य झालं नाही, खपलं नाही, म्हणून त्या विचारसरणीच्या गोडशाने त्यांचा खून केला. तीच गोष्ट हमीद दलवाईची, लोकशाहीवादी आगरकर यांची. म. फुले यांनी तर धर्माविरुद्ध व आचारविरुद्ध बंड केले. डॉ. आंबेडकर यांनी तर हिंदू धर्म सुधारणे अशक्य आहे, असा अनुभव आल्याने हिंदू धर्माचा त्याग केला. अस्पृश्यांवर बंधन घालणाऱ्या, माणुसकीचे हक्क नष्ट करणाऱ्या मनुस्मृतीचे दहन केले.

एकूण माणसाच्या बुद्धीची झेप सारखी पुढे पुढे जात आहे. पूर्वीच्या अंधश्रद्धा, समजुती गळून जात आहेत.

म्हणून नवविचारांच्या कार्यकर्त्यांनी समाजपरिवर्तन करण्याची खटपट केली पाहिजे. नवविचाराला धरून सरकारने कायदे केले पाहिजेत.

भावी पिढीचे विचार बदलण्यासाठी विद्यालयापासून सुरुवात केली पाहिजे. मुला-मुलींच्या विचारांची घडण घरापासून व नंतर शाळेत होत असते. घरी आई-बाप, वडीलधाऱ्यांपासून व शाळेत शिक्षकांपासून. आई व वडील स्त्रिया या जुन्या सनातनी संस्कृतीत वाढल्यामुळे, त्यांच्यापासून नवसंस्काराची अपेक्षा करता येणार नाही. पण शाळेत पुरोगामी विचारांचे शिक्षक असतील, तर ते पुरोगामी विचारांचे शिक्षण देऊ शकतील. याकरता सरकारने शाळाखात्यातील मास्तरांची निवड त्यांची विचारसरणी पाहून केली पाहिजे. जनसंघ, आर. एस्. एस्. व हिंदू सभावाले हे शाळाखात्यात शिक्षक असल्यास ते आपली विचारसरणी मुलात रूजवल्याखेरीज राहणार नाहीत.

बालवाङ्मयापासून ते बी.ए. पर्यंतच्या पाठ्यपुस्तकातील धडे जातिभेद, अस्पृश्यता विरोधाचे असतील, यांची सरकारने खबरदारी घेतली पाहिजे. गीते देखील धर्म अंधश्रद्धेची जोपासना करणारी असू नयेत.

शाळेत व कॉलेजात शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांची वाक्ये निवडून प्रत्येक वर्गात संतवाक्ये लावतात, त्याप्रमाणे वर्गात भितीवर चिकटवावीत व शहरातील व खेड्यातील भितीवर सिनेमापोस्टर्सप्रमाणे चिकटवावीत. ती फाडली गेली, तर गावसभासदांनी ती पुन्हा लावावीत.

ज्या गावी पाणवठ्यावर व देवालयात जाण्यास अस्पृश्यांचा प्रतिबंध असेल, त्या गावी कार्यकर्त्यांनी पुढे घालून न्यावे. अशावेळी प्रतिकार झाल्यास सरकारने अस्पृश्यांना सहाय्य करावे.

ज्या गावी अस्पृश्यांना जुलूमजबरस्ती, जाळपोळ व स्त्रियांच्या अब्रुवर घाला असेल, त्या गावची पंचायत रद्द करून दुसरी सरकारने नेमावी.

जाळपोळ होऊन अस्पृश्यांच्या झोपड्या, घरे जाळली गेली असतील व जे नुकसान झाले असेल, ते सर्व गावावर दंड बसवून भरून द्यावे.

देवालयातला प्रवेश हा देवभक्तीमुळे केला न जाता, तेथे अस्पृश्यांना मनाई केली जाते म्हणूनच असवा. ती मनाई मोडली की देवालयात पाय टाकण्याचे कारण नाही. कारण देव बोकांडी बसला की दैववाद आला. दैववाद आला की मनुष्य परावलंबी झाला, त्याचं कर्तृत्व नाहीसं झालं. देव मानला की दगड मोठा आणि माणूस नीच ठरला ! देव मानला की समता गेली. समता गेली की समाजवाद गेला. समाजवाद गेला की लोकशाही गेली. भारतीय घटनाच संपुष्टात आली.

निधर्मी वृत्ती लोकात यायची, तर ती मंत्र्यात यायला पाहिजे. त्यांच्या-तील अंधश्रद्धा गेली पाहिजे. त्यांनी अधिकारावर असताना कोणत्याही धार्मिक समारंभात भाग घेता कामा नये, तसा आदेश गांधीजींनी दिला होता.

प्रचाराचं आजचं फार मोठं साधन म्हणजे रेडिओ. आज तर रेडिओत सत्यनारायणाची पूजा, देवाला आळवण्याची गीते रोज कानावर पडत असतात, ती बंद झाली पाहिजेत.

वर्तमानपत्रे हेही प्रचाराचं मोठा साधन. संपादकांनी साक्षात्काराच्या, चमत्काराच्या बुवाबाजीच्या कथा व केवळ खप वाढविण्याच्या दृष्टीने बातम्या देऊ नयेत.

त्यांनी सरकारवर सर्वस्वी अवलंबून राहू नये, तुमचं संरक्षण करायला सरकारची शक्ती तोकडी पडते. म्हणूनच तुम्हीच प्रतिकारास सज्ज झाले पाहिजे, त्याकरिता तुमची शक्ती वाढली पाहिजे. त्याकरिता सर्व अस्पृश्यांची एकजूट बनली पाहिजे. ती एकजूट बनण्याकरिता तुमच्यातील जातिभेद नष्ट झाले पाहिजे. ते नष्ट करण्याकरिता उपाय एकच ! .... तो आंबेडकरांनी सांगितला आहे.

अस्पृश्यांनो, बुद्ध धर्माचा स्वीकार करा !

सरकारला आणखी एक विनंती–

मिश्रविवाह हा जातिभेद नष्ट करण्याचा अत्यंत परिणामकारक उपाय आहे, पण त्याची सक्ती करता येणार नाही. पण मिश्रविवाह केलेल्यांना नोकरीत प्रेफरन्स द्यावा व स्पृश्य–अस्पृश्य विवाह झाला असेल, त्या दांपत्याचा जिल्हा कलेक्टर अगर मंत्र्यांकरवी सभा भरवून शाल व पदक देऊन गौरव करावा, म्हणजे त्यांचा सामाजिक दर्जा वाढेल.

अशा अनेक गोष्टी शाहू महाराजांनी करून त्यांचा सामाजिक दर्जा वाढवला होता. व ही समाजसेवा करताना राज्यपद गेले, तरी त्याची त्यांनी तयारी केली होती.

मंत्र्यानी फेरनिवडणुकीची आशा न धरता लोककल्याणाकरिता अंधश्रद्धाळू लोकांना दुखवण्याची तयारी केली पाहिजे, म्हणजे तेवढचा काळात पुष्कळ सुधारणा होईल. ♠

प्राथमिक अवस्थेतून ते म. फुल्यांपर्यंतची विचाराची वाट

अगदी प्राथमिक अवस्थेत वारा, वादळ, पाऊस, महापूर, धबधबा, वीज, अग्नी व वडवानल वगैरे मानवांना आकलन न होणाऱ्या नैसर्गिक शक्तींच्या भीतीतून आत्मसंरक्षणासाठी आधार म्हणून देवदेवतांची निर्मिती झाली. ही शक्ती ज्याच्यात आहे, तो कोणीतरी महामानव असावा, असे समजून मानवाची मूर्ती करू लागला.

त्या देवाला आवळण्याकरिता साहजिकच प्रार्थना करू लागला, प्रार्थनेतून गाण्याचा उगम झाला. गाण्यामागोमाग हावभाव आले. हात जोडणं, पाया पडणं यातून नृत्यकलेचा जन्म झाला.

पुढे मूर्तिकारांनी मूर्ती कशा बनवाव्या, याचे नियम तयार करावे लागले. यातून त्याचे शास्त्र तयार झाले. त्या शास्त्राला आधार मानवी देहाचा . . . त्यासाठी उत्कृष्ट बांध्याची देहयष्टी, सुंदर चेहरा, चाफेकळीसारखं नाक, धनुष्याकृती भिवया, गाजराच्या रंगासारखे गाल, कुंद कळ्यांसारखे दात, केळीच्या सोटासारख्या मांड्या, सिंहकटी, हरिणाक्षी अशाप्रकारे निसर्गातील व पशुपक्षातील आकर्षक, सुंदर गोष्टींची निवड मूर्तिकलेत होऊ लागली. रंगाच्या शोधातून चित्रकलेला सौंदर्य येऊ लागले. रंग टिकाऊ कोणता, तात्पुरता कोणता हे अनुभवाने ठरू लागले. ते लिहून ठेवल्यामुळे त्याला नियमबद्ध स्वरूप प्राप्त झाले, तेच शास्त्र होय. यामुळे लेखन कलेला महत्व आले, साहित्य निर्माण झाले. पण बुद्धिवाद्यांनी साहित्याच्या साधनाने आपलं वर्चस्व इतर समाजावर स्थापन करण्याकरिता मूर्तींच्या ठिकाणी गुण लादले. दया, लोभ, सूड, प्रेम, मत्सर या मानवी भावनांना अनुसरून कलाकारांच्याकडून मूर्ती घडविल्या गेल्या.

मूर्ती मातीच्या, लाकडाच्या, दगडाच्या, पितळेच्या, तांब्याच्या, रुप्याच्या, सोन्याच्या–विज्ञानाच्या प्रगतीबरोबर करता येऊ लागल्या.

मूर्ती मानवी आकाराचा आधार घेऊन कराव्या लागल्या, म्हणून त्या मानवी आकाराच्या आतील सांगाड्याचा (स्केलेटनचा), त्यावरील मांसल आवरणाचा (अनाटॉमी) अभ्यास करावा लागला, यामुळे देहाचे प्रमाण (प्रपोरशन) ठरविले गेले.

शिल्पकलेच्या पाठोपाठ चित्रकला आली, पण अद्याप कागद व कॅन-व्हासचा शोध न लागल्यामुळे चित्रे भितीवरच काढावी लागली. त्यासाठी चित्रकार निरनिराळ्या रंगाची माती वापरू लागला. पांढरा शाडू, तांबडी, निळी, माती व कोळश्यातून काळा रंग वापरण्यात येऊ लागले त्या त्या रंगाचे गुणधर्म अनुभवाने पक्के कोणते, कच्चे कोणते ते समजू लागले. अजंठा लेणीत अशी चित्रे पाहता येतील. त्यात चित्रकाराचे रेषाप्रभुत्व वाखाणण्याजोगे दिसून येते. हजारो वर्षे झाली, तरी रंग टिकून राहिले, मात्र ती सर्व चित्रे धार्मिक व पौराणिक कथांतील प्रसंग दाखवणारीच आढळतील.

धर्मगुरूंनी आपलं वर्चस्व इतर समाजावर स्थापन करण्याकरिता दैवी चमत्काराच्या असंभाव्य गोष्टी खऱ्या वाटण्याकरता काढून घेतल्या. मारूतीने हातात डोंगर घेऊन आकाशातून निघाल्याचे, श्रीकृष्णाने एका करंगुलीवर डोंगर धरल्याचे, अशी चित्रे काढायला लावून अज्ञ समाजाची बुद्धीच गोठून टाकली! या अशा गोष्टी व चित्रे सर्व धर्मात हिंदू, ख्रिश्चन वगैरे धर्मात सुद्धा आढळून येतील. अद्याप कागद व कॅनव्हासचा शोध न लागल्यामुळे चित्रासाठी भितच वापरावी लागली. त्यामुळे मनुष्याला पुढे बसवून त्याच्या चेहऱ्यातील चढउतार, शेडलाईट पोर्ट्रेटमध्ये घालता आले नाहीत. सुंदर देखावा पाहून त्या देखाव्यासमोर बसून तो रंगवता आला नाही! समोरच्या, दूरच्या वस्तुतील अंतर दाखवता आले नाही. चित्रात एकच पातळी दाखवणे भाग पडले. पाश्चि-मात्य राष्ट्रांतील चित्रात, त्यांच्या हाती कागद व कॅनव्हास वापरायला मिळा-ल्यामुळे हा दोष राहिला नाही. त्यांच्या देखाव्यात वस्तुतील जवळचे व लांबचे अंतर व हवेचे होणारे परिणाम दाखवता आले, याला इंग्रजीत लीनियर पर-स्पेक्टिव्ह व एरियल परस्पेक्टिव्ह म्हणतात.

× × ×

कारागिरीची प्रवृत्ती मात्र भीतीतून निर्माण झाली असे नव्हे, जीव-नाच्या गरजेतूनच तिला चालना मिळाली.

पाणी ही प्राणधारणेला अत्यंत आवश्यक अशी गोष्ट. पाणी पिण्या-करता माणूस नदीच्या, तळ्याच्या अगर सरोवराच्या काठी जाऊन ओंजळीने

पाणी पिऊ लागला. पण ते सोयीस्कर वाटेना म्हणून त्याने मातीची मडकी तयार केली. साठा करण्यासाठी मोठे रांजण तयार केले. त्यात पाणी भरण्यासाठी घागरी कराव्या लागल्या. पुढे फुरसतीच्या, म्हणजे विश्रांतीच्या वेळी बुद्धीचा वापर करून त्या त्या जिनसांना विविध आकार देऊ लागला. या कारागिरीतून शिल्पकलेचा उगम झाला. याचा फायदा स्वार्थसाधू बुद्धीवाद्यांनी, धर्मगुरूंनी इतर समाजावर आपले वर्चस्व स्थापण्याकरता पूर्ण विचाराने करून घेतला.

धर्मग्रंथातून व पौराणिक कथातून निरनिराळ्या देवदेवतांची दयाळू, तशी क्रूर भावना दाखवणारी रूपे, मूर्तिकार व चित्रकारांकडून काढून घेतली त्यांच्या मनाला वाटेल तशा कथा रचल्या. त्या देवतांना प्रसन्न करण्याचं काम धर्मगुरु व पुरोहितांनी आपल्याकडे घेतले. ते देवाचे दलाल झाले. त्यांच्यावर ही कामगिरी कोणी सोपवली असे नव्हे. पण लोकांची अशी समजूत करून दिली की, देवांनीच ती सोपवून दिली आहे, देव हा त्यांनी आपल्या थापेबाजीला आधार घेतला. पण अज्ञानी लोकांना काय माहीत की, यांचा देव खोटा तशी थापेबाजी. थापेबाजी ती थापेबाजीच. हे सर्व पचायला व आपलं संरक्षण करायला राजे लोकांशी संगनमत केलं, त्यांनाही लोकांवर आधिपत्य गाजवायला देवाचा व धर्माचा आधार पाहिजेच होता. अशा रीतीने या फुकटखाऊ दोघांनी हातात हात घातले. भोंदू व बलिष्ठ, ब्राह्मण व क्षत्रिय, यांची जोडी काही काळ जमली. आपले वर्चस्व देव–धर्म व राजदंडाच्या आधारे जनतेवर बसवले.

या दोघांनीही प्रथम धर्मगुरूंनी, नंतर राजे लोकांनी शिल्पकार, चित्रकार, कारागीर यांचे सहाय्य घेऊन धर्मगुरूंनी पुराणकथा चित्रकाराकडून व देवाच्या मूर्ती शिल्पकाराकडून आपल्या मार्गदर्शनाखाली घडविल्या. राजे लोकांनी आपल्या ऐश्वर्याचा प्रभाव पडावा म्हणून आपले भव्य पोर्ट्रेटस्, घोडचावरचे लव्याजम्यासकट काढून घेतले धर्मगुरूंनी भव्य मंदिरे, कोरीव कामाने भरलेली उत्तुंग शिखराची तयार करून घेतली. राजे लोकांनी भव्य राजवाडे बांधून घेतले फ्रान्सच्या चौदाव्या लुईच्या वेळी हे एश्वर्य कळसाला पोचले. तसा प्रजेचा जुलूम पराकोटीला गेला. श्रीकृष्ण, ख्रिस्त व महंमद पैगंबर या सर्व धर्मसंस्थापकांनी राजसत्तेला पाठबळच दिलं आहे. अज्ञजनांनी त्यांची आज्ञा म्हणजे देवाचीच आज्ञा समजून पाळली. त्याला रूढी व परंपरेचे वेष्टण मिळून सर्वच समाज त्या विचाराने वेढला गेला.

या देवा-धर्माने माणसाची स्वतंत्रपणे विचार करण्याची बुद्धीच मारून टाकली. न ऐकणाऱ्याचे हाल हाल केले. अनन्वित छळवाद केला! ता भारतात तसा पाश्चिमात्य राष्ट्रात !

जुनी पिढी गेली, नवी पिढी आली. जनावरांना विचारच करता येत नाही, त्यांच्यात बुद्धी नाही. माणसात बुद्धी आहे. तो स्वतंत्रपण विचार करू शकतो. सर्वच 'जी हाँ' वृत्तीचे नसतात. त्यांचे विचार सक्तीने दडपले, तरी उसळी मारून बाहेर येतात तसे आले. पाश्चिमात्य राष्ट्रात जास्त. भारतात तसे सर्वांगीण क्रांतिकारक बोटावर मोजण्याइतकेही नाहीत.

× × ×

रशिया आणि चीनमध्ये लेनिन, स्टॅलिन, माओ हे सर्वंकष क्रांतिकारक होते. त्यांनी सत्ता हाती येताच राष्ट्रातून चालत आलेली राजकीय, धार्मिक, सामाजिक, आर्थिक गुलामगिरी मुळातच खरडून काढण्यास सुरुवात केली. राजेशाही, जमीनदारशाही, नेस्तनाबूत केली. त्यांचा वंशही शिल्लक ठवला नाही प्रथम फ्रान्सने पुढाकार घेतला. चौदाव्या लुईची जुलमी, भ्रष्टाचारी, व्यभिचारी प्रजेच्या पैशाची स्वतःच्या चैनीसाठी चाललेली उधळपट्टी कारकीर्द कारणीभूत झाली. त्यांनी राजाला राजवाड्यातून बाहेर काढून रस्त्यावर ठार केले पोरे-बाळे मागे राहिली, तर पुनः गादीवर बसण्याचा प्रयत्न करतील म्हणून त्यांनाही ठार करून राजबीज नाहीसा करण्याचा प्रयत्न केला. "तीच गोष्ट रशियाने करून राजवाडे ताब्यात घेतले. ते कामगारांना वापरायला दिले. काहीत दवाखाने काढले. हवेशीर इमारतीमध्ये सॅनिटोरियमस् काढले. येथेच थांबले नाहीत, धर्म व देव या आधारावरच राजशाही टिकून राहिली, म्हणून देवाचा मंदिरे उध्वस्त केली. त्यांच्यावरून नांगर फिरवला. देवस्थानच्या जमिनी कसण्यासाठी शेतकऱ्यांना वाटून दिल्या. पण देवाचा शाप लागेल, या समजुतीने जमिनी कोणी करीना. तेव्हा सरकारनेच नांगर घालून त्यात पीक काढले. साहजिकच लोकांची भीती गेली व ते जमिनी करू लागल. तसेच संत-महंत, बोवा-बाबा, धर्मगुरु शापाने आपल्या शत्रुंना भस्म करतात अशी लोकांची समजूत म्हणून ही समजूत काढून टाकण्याकरता त्यांना लोकासमक्ष चव्हाट्यावर फाशी दिले. प्रथम त्यांची गाढवावरून धिंड काढली. त्यांच्या प्रतांचे सांगाडे लोकांना दाखवण्याकरता प्रदर्शनात ठेवले. अशाप्रकारे लोकाच्या मनातली भीती साफ काढून टाकली." (मॅरिसहिंडस ह्युमॅनिटी अपरुटेड)

पाश्चिमात्त्य राष्ट्रात देव-धर्म हे सर्व झूट आहे असे सांगणारे धाडसी विचारवंत पुष्कळ निघाले. धर्मगुरूंनी म्हणज पोपनी त्यांना जिवे जाळले.

त्यांना फांशी दिले. त्यांची कातडी सोलली. त्यांचं वाङ्मय गळ्यात बांधून लोकांसमक्ष जाळले. खणलेल्या पेवात ढकलून त्यांना तिथं कुजवत ठेवले. त्यांच्या देहाला चापाचा तणाव लावून फाडले, तरी त्यांनी आपले विचार टाकले नाहीत.

सॉक्रेटीसने तर सत्यासाठी विषाचा पेला प्राशन केला. ब्रुनोला फासावर चढविले असताही त्याने आपले विचार टाकले नाहीत.

× × ×

भारतातला पहिला वैचारिक बंडखोर म्हणजे चार्वाक. वैज्ञानिक दृष्टीकोनाचे बीज प्रथम चार्वाकाने पेरले.

"वेद ही धूर्त आणि मूर्ख माणसाची करणी आहे ... हे सगळे पुरोहित एकजात कपटी व लबाड आहेत. पूर्वजन्म आणि पुनर्जन्म, स्वर्ग आणि नरक, कर्म आणि त्याचे फल या सगळ्या कावेबाज माणसाच्या लोणकढ्या थापा आहेत, वेदवचन सांगू नका. आम्हाला आमची बुद्धी ही प्रमाण. प्रत्यक्ष हेच प्रमाण. अनुमान हे प्रमाण नाही. ईश्वर म्हणून कोणी नाही. जगात दुःखे आहेत, पण तांदळासारखे सालपट काढून भात खातात तसे सुख भोगावे. वर्णभेद, जातीभेद अशास्त्रीय आहेत. जीव हा महाभुताचेच एक रासायनिक मिश्रण आहे."

आजही चार्वाकचे विचार अत्याधुनिकच आहेत. हे स्वीकारण्याची मजल किती लोकात गेली आहे ? चार्वाक हा बंडखोरांचा राजा होता. क्रांतिकारकांचा अग्रणी होता. 'राख होऊन गेलेला देह पुनः परत कोठून येणार ? देह गेला त्याबरोबर आत्मा पण गेला' हे मार्क्सचे विचार मार्क्स न वाचलेल्या चार्वाकने त्यावेळी मांडले, पण चार्वाकने प्रत्यक्ष कार्य कुठं केलेलं किंवा एखादी संस्था स्थापन केलेली मी वाचली नाही.

सावरकर, टिळक, गांधी हे राजकीय क्रांतिकारक. सावरकर हे हिंदुधर्मापुरते सामाजिक व धार्मिक क्रांतिकारक व स्वातंत्र्यासाठी जीव देणारे पण सर्वंकष क्रांतिकारक नव्हे. टिळक हे राजकीय क्रांतिकारक, पण सामाजिक व धार्मिक प्रतिगामी ! खरं म्हणजे ब्राह्मणमान्य पुढारी. म. गांधीजींनी राजकारणात अहिंसा वापरून यश मिळवले, पण इतर सर्वच बाबतीत विसंगती.

केशवसुतांनी आपल्या काव्यातून जनतेला इशारा दिला–

जुने जाऊ द्या मरणा लागुनि । जाळुनि किंवा पुरूनि टाका.
सडत न एका ठायी ठाका । सावध । ऐका पुढल्या हाका.

× × ×

या सर्वांहून अडाणी म्हणून समजलेले महात्मा फुले हे सर्वंकष क्रांतिकारक. मानवतावादी व विश्वकुटुंबवादी. प्रत्यक्ष कार्य करणारे. बोली-प्रमाणं कृती करणारे महापुरुष होते. त्यांनी नुसताच देवा–धर्मावरच हल्ला केला नाही, तर त्या देवा–धर्माच्या आधारावर पुष्ट होणाऱ्या राजशाही, जमीनदारशाही, सावकारशाही, भांडवलशाही व भटशाहीवर हल्ला केला. धर्मातील, पुराणातील व धर्मग्रंथातील बिंगे बाहेर काढून बहुजनसमाजाला जागे केले. शेतकऱ्यांच्या व मजुरांच्या संघटना तयार केल्या. जमिनी पाडल्या. मारेकऱ्याशी तोंड दिले. असा नेता पूर्वी झाला नाही, नंतरही झाला नाही, अद्याप झाला नाही.

महात्मा फुल्यांच्यात निवृत्ती व प्रवृत्तीचा तसेच बुद्धीझमचा व कम्यु–निझमचा समन्वय आढळतो.

त्यांनी लोकांची सद्सद्विवेक बुद्धी जागी केली व कार्यप्रवृत्त केले.

आताच्या राजकारणात समाजसेवा हे ध्येयच उरलेले नाही. येनकेन प्रकारेण मते मिळवून निवडून येणे, आमदारकी, खासदारकी, मंत्रिपद मिळविणे व त्या साधनेच्याद्वारे गडगंज संपत्ती मिळवून भावी पिढ्यांची ऐषारामात राहण्याची सोय करून ठेवणे हेच ध्येय होऊन बसले आहे. या मोहापासून जे अलिप्त राहतील, त्यांचेकडून कार्य झाले तरच होईल. समाजा-तील अंधश्रद्धा काढून टाकण्याचा हेच प्रयत्न करू शकतील.

ही अंधश्रद्धा काँग्रेस काढू शकली नाही, काढू शकणार नाही, जनता आघाडी तर मुळीच काढू शकणार नाही. तिथं प्राबल्य आहे आर. एस्. एस्. व जनसंघवाल्यांचं. ते तर जातिभेदावरच आतापर्यंत जगले आहेत. समाजवादी मार्क्सिस्ट व कम्युनिस्ट यांची अद्याप समजूत आहे की, आर्थिक प्रश्न सुटला की, सर्व प्रश्न सुटतील. पण भारतात आर्थिक प्रश्न सुटला तरी सामाजिक व धार्मिक विषमता जात नाही. म्हणून खऱ्या सत्यशोधक कार्यकर्त्यांकडूनच हे कार्य होऊ शकेल ! या दृष्टीने मी अस्पृश्य, दलित पँथर्स, कष्टकरी, शेतकरी व मजूर यांच्याकडे आशेने पाहतो. आज त्यातून खरे निर्भय सत्यशोधक पुढे येत आहेत. पण त्या सर्वांची एकजूट झाली पाहिजे, ती होईल. दलितांवरचे अन्याय, जुलूम जे आज पराकोटीला गेले आहेत, तेच एकजुटीला कारणीभूत होतील. उच्चवर्णियांपासून मात्र कसलीच अपेक्षा करण्यात अर्थ नाही.



रात्र वैऱ्याची आहे....
सत्यशोधकांनो, जागे रहा!

मी महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांना खरे सत्याशोधक समजतो. सत्याकडे ते सारखी वाटचाल करीत होते. पूर्वीचे विचार अनुभवाने बरोबर नाहीत असे दिसून आल्यास बदलत होते. म. गांधी हिंदू धर्माचे अभिमानी होते; पण सत्याच्या कसोटीला धर्माचे आचार बसत नाहीत असे ज्यावेळी वाटले,त्यावेळी त्यांनी ते आचार सोडून दिले. **सत्य म्हणजे परमेश्वर असे म्हणणारे गांधीजी 'गोरा' या नास्तिकाशी गाठ** पडल्यानंतर सत्य म्हणजे परमेश्वर ही वाक्यरचना टाकून **सत्य म्हणजे सत्य या विचारावर आले.** स्वतःला कट्टर हिंदू धर्मीय समजणारे गोळवलकरांचे मते, महात्माजी हे हिंदू धर्माचे उल्लंघन करणारे मानले जात होते. हिंदुस्थान हा केवळ हिंदुचा, तो इतर धर्मियांचा नव्हे, ही भूमिका अद्यापही जनसंघ व आर. एस्. एस्. वाल्यांनी सोडली नाही. याच त्यांच्या विचाराला बळी पडून नथुराम गोडश्याने राष्ट्रपिता महात्मा गांधीजीचा खून केला व आजही या खूनी गोडश्याचा, जनता पक्षाचे राज्य आल्यानंतर जयजयकार केला जात आहे! हिंदुत्ववाद्याना असं वाटतं की आता आपलं राज्य आलं आहे.

हक्कासाठी कंबर कसा

म. फुले, राजर्षी शाहू व पुण्यश्लोक डॉ. बाबासाहेबांचा द्वेष करणारे व त्यांना स्वातंत्र्यद्रोही म्हणणारे मनुचे अभिमानी हेच होते. अस्पृश्यांना माणसातून उठवणारे व जनावराहूनही नीच ठरवणारे हेच होत. तशी मुक्ताफळे कोल्हापूरला गोळवलकर आले असता ओकली आहेत. म्हणून ब्राह्मणेतर व अस्पृश्यांनी या नव्या राजवटीकडून कसलाही अपेक्षा न करता आपले हक्क मिळवण्याकरता कंबरा कसल्या पाहिजेत.

टिळकांच्या वर्चस्वाखाली त्यावेळची काँग्रेस होती. त्यांनी समाजसुधारक आगरकर वगैरेंना काँग्रसमधून बाहेर हाकलले. सामाजिक व धार्मिक सुधारणेला टिळकवाद्यांनी सतत विरोध केला. अस्पृश्यता निवारणेला विठ्ठल रामजी

शिद्यांना सहाय्य केलं नाही, या अनुभवामुळे ब्राह्मणेतर समाजाचे सत्यशोधक पुढारी, दे. भ. केशवराव जधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव या नेत्यांनी शेतकरी–कामगार पक्षाची स्थापना केली, पण काँग्रेसने लोकशाही समाजवादाचा स्वीकार केल्यानंतर जेधे, मोरे, तुळशीदास, र. के. खाडिलकर ही सर्व मंडळी व त्यांच्या बरोबरीचे अनेक कार्यकर्त्यांनी काँग्रेसप्रवेश केला. गांधी–नेहरू–शास्त्री यांची पुण्याई पाठीवर घऊन भारताचे राज्य करीत आलेली काँग्रेस आज राज्यसत्तवरून खाली आली व त्या ठिकाणी जनता पक्षाचं राज्य आलं.

यादवरावांची मुक्ताफळे

आज जनता पक्षात प्राबल्य आहे ते जनसंघाचं. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि त्याचा पूर्वीचा अध्यक्ष गोळवलकर व आजचे जनसंघाचे नेते हे मनुस्मृतीची विचारसरणी मान्य करून आपली संघटना बांधणारे आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संघटक श्री. यादवराव जोशी म्हणतात, श्री. जयप्रकाश नारायण यांचा प्रत्येक सल्ला व्यवहार्य असतोच असे नाही. सामाजिक समता आणि ऐक्य प्रस्थापित करण्यासाठी ब्राह्मणांनी जानवी तोडून टाकावीत, असा सल्ला जयप्रकाश यांनी पूर्वी दिला होता. आमच्या गुरूंनी (गोळवलकरनी) म्हटले होते, 'जानवे हे ब्राह्मण्याचे आणि हिंदुत्वाचे प्रतीक म्हणून टिकले पाहिजे. प्रत्येक गोष्टीसाठी त्यांची परवानगी घेण्याची गरज नाही. जयप्रकाश म्हणजे सरकार अथवा जनता पक्ष नव्हे. आम्ही अलिप्त राहू इच्छितो, हे आम्ही स्पष्ट शब्दात जाहीर केले आहे.' (केसरी १६–९–७७)

'जनता' चे सत्य स्वरूप

हा संघ व त्याचे नेते वर्णाश्रमवादी, अस्पृश्यांचे विरोधी, मनूचे अभिमानी. ज्यांनी ब्राह्मणी वर्चस्व अबाधित राखण्याकरता इतर वर्णांना आपल्या पायाखाली तुडवलं व त्यांनी त्या वर्णाचे, बंद कप्पे पाडले व त्या सर्वांखाली अस्पृश्यांना गाडलं माणसातून उठवलं व गावकुसाबाहेर ढकललं, ते जनता पक्षात बहुसंख्य आहेत.

आजचे जनसंघ नेते संस्कृतीचं पांघरूण घेऊन आपली संघटना वाढवत आहे. महत्वाची मंत्रिपदंही त्यांच्याच पुढाऱ्यांना दिल्यामुळं ज्या व्यक्तीने तत्वप्रणालीला भाळून राष्ट्रपिता महात्मा गांधीचा खून केला, त्या नथुराम गोडश्याचा निर्भयतेने जयजयकार करीत आहेत, त्या खुनीला हुतात्मा बनवण्याचा हा प्रयत्न आहे.

डॉ. आंबेडकर यांच्यावर देशद्रोही म्हणून शिक्का मारला व आता आपले राज्य आले, या तोऱ्याने जमीनदार व भांडवलदार यांनी अस्पृश्यांवर निर्घृण हल्ले करण्यास सुरवात केली आहे, तो पक्ष आपला असे सर्व ब्राह्मणेतर व सत्यशोधकांना वाटेल काय ?

स्वार्थसाधुंचा द्रोह

पण इतिहासात, प्रत्येक वेळी, केवळ स्वत:चा स्वार्थ साधण्याकरता देशाच्या व समाजाच्या शत्रुंना देशद्रोही सहाय्यभूत झालेच आहेत, तसेच काही बहुजन समाजातील व अस्पृश्य समाजातले स्वार्थांध जनता पक्षाला मिळाले, यात आश्चर्य वाटण्याचं कारण नाही. त्यांची दानत, शील आणि शुद्धता त्या भागातील लोक जाणतात. शे. का. पक्षाला ध्येयदृष्ट्या जनता व काँग्रेसपैकी कोणता पक्ष जवळचा असेल तर तो काँग्रेसच ! डॉ. आंबेडकरांनी तयार केलेली भारतीय घटना शेतकरी–कामगार पक्षाच्या ध्येयाशी मूळीच विरोधी नाही. 'लोकशाही समाजवाद व निधर्मी राज्य' ही देशाला लागू केलेली घटना कोणालाही अमान्य करता येण्याजोगी नाही.

जनसंघाची 'बगळानीती'

जनता पक्ष हा मात्र अठरा धान्याचं कडबोळ आहे. काँग्रेस व इंदिरा गांधी यांना सत्तेवरून खाली ओढणं या एका ध्येयासाठी जमलेले परस्पर विरोधी विचारांचे व आपल्या पक्षाचे ध्येय व विचारसरणी शाबूत ठेवून एकत्र जमलेल्यांचा हा बाजार आहे.

विविध मार्क्सवादी पक्ष हे आपलं ध्येयधोरण सोडणारे पक्ष नाहीत. समाजवादी पक्षातील सर्वच कार्यकर्त्यांनी आपला ध्येयवाद गुंडाळून ठेवलेला नाही. जनसंघ हा मात्र बगळ्याप्रमाणे सर्वांनाच गिळंकृत करू इच्छितो. या जमलेल्या पक्षांची एकजूट जनतेच्या कल्याणासाठी झालेली नाही, ती स्वत:च्या हितासाठी झालेली आहे.

सत्ताधिशांविरुद्ध पुरावा ?

काँग्रेसवर टीका करताना जनता पक्ष भ्रष्टाचाराचा आरोप करतो, पण यांच्या डोळ्यातलं मुसळ मात्र दिसत नाही आणि काँग्रेसमधील बदनाम, भ्रष्टाचाऱ्यांचे त्यांच्या पक्षात येताच मात्र बिनदिक्कत स्वागत करतो व जबाबदारीच्या जागेवर नेऊन बसवतो !

मनुष्यस्वभावच बदलेपर्यंत भ्रष्टाचार बंद पडणार नाही. पुराव्यानिशी सापडतील त्यांनाच शिक्षा करावी लागेल. श्रीमंताविरुद्ध व सत्ताधिशाच्या-विरुद्ध पुरावा मिळणं अशक्य होऊन जातं ! आज कोटयाधीश मंत्रिपदावर नाहीत असं म्हणता येणार नाही.

संघधार्जिणी नोकरशाही

काँग्रेसवर जनता असंतुष्ट झाली ती मुख्यत: नसबंदीच्या अविचारानं. कोणाची नसबंदी करावी, याचा विचार न करता केवळ आकडा वाढवण्याकरता वयाचा विचार न करता केलेल्या नसबंदीमुळे, पण ज्या अधिकाऱ्यांनी ही नसबंदी केली, त्यांनी काँग्रेसला बदनाम करण्याकरता केली नसेल कशावरून ? ते अधिकारी कोणत्या जातीचे होते याची टक्केवारी अद्याप जाहीर झालेली नाही काँग्रेसच्या उदार धोरणामुळे म्हणा अगर ढिलाईमुळे म्हणा, जनसंघ-धार्जिण्यांचा व सनातनी विचारसणीच्या नोकरांचा व अधिकाऱ्यांचा भरणा प्रत्येक खात्यातील मोक्याच्या जागी होत आला आहे. त्यांनी हा व्यूह रचून नसबंदी मुद्दाम लोकक्षोभ व्हावा या हेतूने केली नसेलच कशावरून ?

जनता पक्षातही भ्रष्टता !

आज जनता पक्षाच्या मंत्रिपदावर आरूढ आहेत, ते लोकमान्य आहेत असं काही म्हणता येणार नाही. त्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्ध आज वर्तमान-पत्रातून उघड उघड आरोप केले जात आहेत, त्यांची चौकशी का करू नये ?

ज्या फर्नांडिसांनी स्वत:च्या महत्वाकांक्षेला बळी पडून, आगगाडया, बसेस् वगैरे बंद पाडून सामान्यजनांचे व्यवहार बंद पाडले, घरोघरच्या जीवनाच्या गरजा मिळवणे अवघड करून, लग्न-व्यवहाराचे जथे स्टेशनावर खोळंबून ठेवले, त्यांनाच मंत्रिपद दिल्याने लोकाना आनंदाच्या उकळया फुटल्या असतील असं मानण्याचं कारण नाही.

जमीनदारांचे वर्चस्व

जनतेच्या उंचावलेल्या अपेक्षा जनता पक्षाला पुऱ्या करता येतील असे लोकांना आता वाटेना. अगदी सामान्य माणसही भाववाढीमुळे नाराज झाला आहे. खात्याखात्यातील लाचलुचपत पूर्वीप्रमाणेच चालली आहे. जनता पक्षातील मंत्री एकमेकांविरुद्ध निवेदने करीत आहेत. त्यामुळे जनता पक्ष हा कोणाला धार्जिणा हे ठामपणे कळणे अशक्य होऊन बसले आहे. अस्पृश्यांवरचे अत्याचार वाढले आहेत व आता आपले सरकार आले, असे बोलून दाखवण्यात

जमीनदार वर्ग पुढाकार घेत आहे. पेशवाईत प्रत्येक ब्राह्मण स्वतःला राजकर्त्याचा प्रतिनिधी म्हणून वागत असे, तसे हे जमीनदार वागू लागले आहेत.

यशवंतरावांचे कार्य

यशवंतरावजी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना अस्पृश्यांबाबत कल्याणाच्या गोष्टी झाल्या, तशा महाराष्ट्राव्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रांतात झाल्या नाहीत. ते डॉ. आंबेडकरांचे अभिमानी व दादासाहेब गायकवाड यांचे मित्र होते. ज्या सवलती अस्पृश्यांना दिल्या होत्या, त्या त्यांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केल्यानंतर बंद केल्या होत्या. यशवंतरावजींनी त्या पुन्हा सुरू केल्या.

गुलामी पद्धतीची महारवतन पद्धती नष्ट केली. या वतनामुळे महार समाजाचा अधःपात झाला होता. डॉ. आंबेडकरांनी ही पद्धत नष्ट करावी म्हणून प्रयत्न केला होता. ती आंबेडकरांची मनीषा यशवंतरावजींनी पूर्ण केली. ते नवबौद्धाबद्दल १९६० साली सांगली येथील भाषणात म्हणाले,

'महाराष्ट्रातील सामाजिक जीवनात महत्वाचा प्रश्न नवबौद्धांचा आहे, आपण सर्वांनीच विचार केला पाहिजे की, हजारो वर्षे आपल्या समाजाचा एक घटक अंधारात होता. तो आता जागृत झाला आहे. ते आपल्या हक्काची मागणी करू लागले आहेत, म्हणून त्यांचे माणुसकीचे हक्क त्यांना मिळाले पाहिजेत.'

नागपूर येथे ज्या जागेवर बाबासाहेबांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली होती, ती दीक्षाभूमी बौद्धांनी मागितली म्हणून त्यांना दिली, तिथं आज बाबांचे स्मारक उभे आहे.

दिल्लीत लोकसभागृहाच्याच पुढे बाबासाहेबांचा जो भव्य पुतळा उभा करण्यात आला आहे, त्या समितीचे अध्यक्ष यशवंतरावजीच होते.

यशवंतराव १९६९ च्या अहमदनगरच्या व्याख्यानात म्हणाले, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य थोर होते, ते आता आपण पूर्ण केले पाहिजे.'

स्वातंत्र्य सैनिकांनो, दंड थोपटा!

लोकशाही, समाजवाद व निधर्मी राज्याची आंबेडकरांनी पूर्ण विचारान्ती दिलेली घटना खरीखुरी अस्तित्वात आणण्यासाठी प्राण पणाला लावून झटले पाहिजे.

यावेळी स्वातंत्र्य सैनिकांना स्वस्थ बसता येणार नाही. स्वातंत्र्य-प्राप्तीहूनही हे कार्य बिकट आहे. सामाजिक व आर्थिक समता, यासाठी लढणाऱ्यांना आपल्या घरापासूनच विरोध होण्याची संभावना आहे. कारण मनुने व श्रीकृष्णाने इन्जेक्ट केलं हे विष आपल्या समाजातून गेलेलं नाही. खेडेगावी सत्ता आणि श्रीमंती वाटचाला आलेल्यांचाच जाच मुख्यतः अस्पृश्यांना होत आहे. हा वर्ग कार्यकर्त्यांच्या आड येणे अशक्य नाही, पण तरीही खंबीर मनाने त्याचा प्राणानिशी प्रतिकार केला पाहिजे. ♠

त्याचं अंग चिरून, तडकून फाटत आहे व पावसात भात काढीत असताना त्याचे पाय कुजून खत होत आहेत.

या अन्नदात्याशी कृतघ्न होऊन त्याच्या उपासमारीचा आपली मिळकत वाढवण्याकरता फायदा घेत आहेत ते नराधम होत. पालक तू आणि शोषक ते!

अन्नदाता शेतकरी : तसा वस्त्रदाता गिरणीचा मजूर व कोष्टी

आमची अब्रु राखण्याकरता तो गिरणीच्या भट्टीत उकळून निघत आहे. कापसाच्या पिंजरानं त्याची छाती फुटून आयुष्य कमी होत आहे. तो वस्त्रदाता आकाशात नाही, गिरणीत काम करीत आहे.

आणि थंडी–वाऱ्यापासून संरक्षण करणारे, श्रीमंतांना गगनभेदी हवेल्या बांधून देणारे, दगड फोडणारे वडर, गवंडी, सुतार, लोहार हे आसरा देणारे होत. आकाशातला कल्पित देव कुणाला आसरा देत नाही, उलट तुम्हाला कापायची मेंढरे बनवतो.

... आणि तुमच्या माता–पित्यांच्या ठिकाणी कोण ?–

देव्हाऱ्यातले टाक नव्हेत : आपल्या मातेला का पूजता? म्हणताना?– की आई, तू मला लहानाचं माठं केलंस. हागलो. मुतलो. तुझ्या मांडीवर, तू न्हाऊन–पुसून मांडीवर घेतलंस. दूध पाजून पुष्ट केलंस. घर सारवून लक्क ठेवलंस, गटारेही साफ केलीस.

पण हेच काम करणाऱ्या महार–भंगी, ढोर–चांभार यांना जवळही येऊ देत नाही. भंग्यानी काम केले नाही, महारांनी रस्ते झाडले नाहीत, तर रोगराई होऊन समाजाचा जीव धोक्यात येईल. पण माता–पित्यांच्या ठिकाणी असलेल्या अस्पृश्य समाजालाच आपण शत्रू म्हणून समजतो. कल्पित राक्षसाहूनही त्यांचा छळवाद करतो, याची जाणीव नास्तिकवादी करून देतील.

पण हा अन्याय फार काळ सहन केला जाणार नाही, याचा सहस्त्रपटीने मोबदला घेतला जाईल.

लोकांना याची जाणीव झाली.... ते पूर्ण नास्तिकवादी बनले की, यांची सद्दी भरून येते.

रशिया–चीन ही समाजवादी राष्ट्रे नास्तिक बनली व या सर्व परान्नपुष्ट माजलेल्या चोरांना त्या जागृत समाजाने जमिनीत गाडले.

फ्रान्सच्या चौदाव्या लुईला व त्यांच्या कुटुंबियांना राजवाड्यातून ओढून बाहेर काढून त्यांची व त्यांच्या थोराबाळांची कत्तल केली. त्यांनी

केलेल्या छळवादाचा क्रूरतेने घेतलेला हा सूड होय. रूसो व्हॉलटेअर हे फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक होय. तथापि या क्रांतीचे श्रेय लुईच्या जुलमी राजसत्तेलाच द्यावे लागेल. जनता त्याची उपभोग्य वस्तू झाली होती. ऐश्वर्याची परिसीमा गाठली होती. त्याने आपल्या अमदानीत बांधलेला व्हर्सेलिसाचा राजवाडा हे सर्व जगाचे आकर्षण बनले होते. त्यावर केलेल्या पैशांची उधळपट्टी आवाक्याबाहेर गेली होती. याचेच अनुकरण युरोपच्या इतर राष्ट्रात होऊ लागले. जणु त्या काळाचा तो महिमाच होता. भारतात मोगल सम्राटांनी बांधलेल्या दिल्ली-आग्रा येथील किल्ले, राजवाडे, ताजमहाल, फत्तेपूर–शिक्री येथील इमारती कमी दर्जाच्या ठरणार नाहीत, पण राजांची ही टोलेजंग वैभवसंपन्न निवासस्थाने वाढली, तशी कष्टकरी सामान्यजनांची घरे भुईसपाट झाली लोक अक्षरशः रस्त्यावरच्या खडीप्रमाणे चिरडले गेले, त्या घर्षणातून क्रांतीच्या ठिणग्या बाहेर पडू लागल्या. अन्यायाचं, पापाचं पेव काठोकाठ भरलं. त्यात अखेरची ठिणगी व्हाल्टेअर रुसोने टाकली व भडका उडाला. त्यात राजघराण्याची राख झाली. त्याच राखेतून 'स्वातंत्र्य, समता, बंधुता' यांची महान पवित्र घोषणा बाहेर पडली.

रशियात झार, झारिना व तिच्या प्रियकरांनी, सरदारांनी. धर्मगुरूंनी व पुरोहितांनी जनतेचे जीवन जुलूमाने जर्जर करून टाकले होते. क्रांतीची भूमिका भुसभुशीत करून ठेवली होती. शेतकरी, सैनिक व नोकरही बिथरले.

मार्क्स एंगल्सच्या विचाराने कामगार क्रांतीचे बीज पेरले व श्रमिकांच्या नव्या युगाची ग्वाही दिली. लेनिन या महान नेत्याने तिला प्रत्यक्ष स्वरूप दिले.

रशिया व चीनच्या कम्युनिस्ट नेत्यांनी धर्मगुरूंची देवाच्या नावावर अज्ञानी जनतेला फसवणाऱ्या व स्त्रियांना भ्रष्ट करणाऱ्या बोवांची गाढवावरून धिंड काढली. जमावादेखत त्यांना फाशी दिले व दैवी शक्तीचा आभास निर्माण करणाऱ्या या प्रेषितांची प्रेते रस्त्यावर फेकून दिली आणि हाडाचे सांगाडे प्रदर्शनाकरता ठेवले. देवालये हा त्यांचा आधार, त्यावर नांगर फिरवून सपाट केली. देवस्थानच्या जमिनी शेतकऱ्यांना वाटून दिल्या सुरवातीला देवाच्या जमिनी आपण केल्या, तर देवाचा शाप लागेल, म्हणून शेतकरी करायला भीत होते. पण इतर शेतीप्रमाणेच तेथे धान्य आले त्यांच्या पोटाचा प्रश्न सुटला. धनधान्य पदरात पडले. त्यामुळे देवावरचा विश्वास खालच्या अज्ञ-जनतेतून समूळ नष्ट झाला.

रशिया व चीनने धर्मगुरु व पुरोहितशाही तशीच राजशाही नष्ट केली.

पण इटली व जर्मनीत क्रांतीच्या पुढाऱ्यांनी मुसोलिनी व हिटलरने जनतेत विदेशी राष्ट्राभिमान व वंशाभिमान जागा करून, साम्राज्यशाहीची महत्त्वाकांक्षा निर्माण करून सर्व सत्ता आपल्या हाती घेतली व अनिर्बंधित हुकूमशाही प्रस्थापित करून पुनः राजशाही जुलमालाही मागे टाकले! पण एका क्रांतीने जागे झालेल्या व स्वतःच्या शक्तीची जाणीव झालेल्या जनतेने तीच गत यांची केली. मुसोलिनीला मारून त्याचे प्रेत रस्त्यावर फेकून दिलें. हिटलरची गत पण तीच झाली.

इंग्लंडने पहिल्या चार्लसला त्याच्या राजवटीला विटून मुख्यतः त्याचे सैन्यच त्यांच्यावर फितरले. आणि त्याला राजवाड्याबाहेर काढून लाकडाच्या ठोकळ्यावर पडायला लावून त्याची मान कुऱ्हाडीने तोडली. पण त्यानंतर लोकराज्य निर्माण करण्याऐवजी क्रामवेलने आपल्या हाती सत्ता घेतली. पण सनदशीर पार्लमेंटरी राज्यव्यवस्थेत मुरलेल्यांनी ती सत्ता टिकू दिली नाही. फ्रेंच क्रांतीनंतर नेपोलियन सत्ताधारी बनला. पण अखेर त्यालाही सत्तेला मुकावं लागलं व त्याचा अंत एका बेटावर झाला.

ब्रिटनमध्ये राजसत्ता व इटलीच्या पोपची सर्वंकष सत्ता यात विरोध आला, म्हणून आठव्या हेनरीने आपला पोप निर्माण करून इटलीच्या पोपचं अधिराज्य संपुष्टात आणलं.

जगात सारखा बदल होत आहे. सत्य हेही अबाधित नाही. एका वेळचं सत्य, दुसऱ्या काळी असत्य ठरले आहे.

प्रत्येक काळाच्या त्या त्या वेळच्या सत्यशोधकांनी एक एक पाऊल पुढं टाकले. त्या त्या नवविचारवंतांचा त्या त्या समाजव्यवस्थेतील विचारात व समाजरचनेत गुरफटलेल्यांनी समाजद्रोही, धर्मद्रोही म्हणून छळ केला आहे.

ख्रिस्त, महमद, साक्रेटीस यांचाही सुरवातीला त्या वेळच्या धर्माभिमान्यांनी धर्मद्रोही म्हणून छळ केला आहे. पण कालांतराने त्यांची मते पटल्यामुळे द्रोह करणारेच त्यांचे अनुयायी व स्तुतिपाठक झाले.

जग पुढं चाललंच आहे.

त्या धर्मसंस्थापकांच्या शिकवणुकीत व वागणुकीत नव्या विचारवंतांना जे दोष दिसू लागले, त्याविरुद्ध त्यांनी उठाव केला. लूथरसारख्या धर्मसुधारकाला धर्मद्वेष्ट्याला नव्हे, तसाच छळ सोसावा लागला. हा जुन्या–नव्याचा संघर्ष सारखा चालला आहे.

संघर्षामुळे जग बदलत चालले आहे.

महंमद पैगंबरने विश्वबंधुत्वाची घोषणा केली, पण त्यांनी तिला आपल्या अनुयायापुरतीच संकुचित केली. लोकांनी आपले विचार ऐकावेत, मान्य करावेत. म्हणून एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात तरवार घेऊन विश्वबंधुत्वाचा प्रचार केला. सर्वांवर तरवार चालवता येणे अशक्य होईल, म्हणून स्वतःलाच देवाचा अवतार बनवले व नव्या विचारांनी कुराणावर आक्रमण करू नये, म्हणून त्यात बदल करण्यास बंदी करून समाजाची प्रगती थोपवून धरली. स्वर्ग–नरकाची हिंदु धर्माप्रमाणेच भीती व आमिष दाखवले. स्त्री स्वातंत्र्यावर तर भयंकर आघात केला. त्यांची स्थिती केविलवाणी करून टाकली. अफगाण व तुर्कस्थानने इस्लाम धर्मात क्रांतिकारक बदल घडवून आणला. आता भारतीय स्त्रिया हक्कासाठी झगडू लागल्या आहेत. अनेक विचारवंत त्यांना पाठिंबा देत आहेत. आज अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी पुढे प्रिय होत आहेत.

महात्मा गांधी स्वतःला हिंदुधर्माचे अभिमानी म्हणवून घेत

पण त्यांच्या विवेचकबुद्धीला न पटणाऱ्या हिंदुधर्माच्या आज्ञा ते पाळत नसत. शंकराचार्याच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेत ते मुख्य पाहुणे म्हणून बसले असताना, शंकराचार्याच्या विचारसरणीला व अस्पृश्यतेच्या समर्थनाला त्यांनी सभेत विरोध करून आपल्या मारवाडी समाजाला 'शंकराचार्यांच्या आज्ञेला मानू नका,' असे सांगितले ते त्यांना पुढे खटकल्यामुळे त्यांच्या श्रद्धेत बदल होत गेला आहे. ज्या धर्माज्ञा त्यांना पटल्या नाहीत, त्या त्यांनी झुगारून दिल्या आहेत. धर्माहून त्यांनी सत्यालाच महत्त्व दिले आहे. जुन्या हिंदुधर्माच्या चौकटीत ते बसत नसल्यामुळे जनसंघवाल्यांनी त्यांना शत्रू समजून गोडसे या त्यांच्या पुढाऱ्याने महात्माजींचा खून केला. या हिंदुधर्माभिमान्यांनी बुद्धधर्मियांचीही हत्त्या केली आहे.

पण कोणाला विचारावर बंदी घालता आली नाही. प्रत्येक काळी विचारवंत नवे विचार मांडतात, प्रथम ते नावडते होतात, कालांतराने ते पटले की, ते स्वीकारले जातात व ते मग रूढ होत जातात.

सर्व जगात त्या त्या युगात एक सांचाचीच समाजव्यवस्था व विचार आढळून येतात.

समाजाच्या प्राथमिक अवस्थेत देवाची कल्पना जवळजवळ एक सांचाचीच होती. ती निसर्गाच्या भीतीतूनच निर्माण झाली. पुढे निसर्गावर

ताबा बसवून, आपल्या बुद्धिसामर्थ्यानेच त्यावर ताबा बसवून कामास लावल्यानंतर दैवी आभास नाहीसा झाला !

औषधातील संशोधनाने रोग बरे होतात, हा प्रत्यक्ष अनुभव घेत गेल्यानें नवस, सायास, अंगारा त्यांच्यावरचा विश्वास कमी होत गेला. मऱ्याईला आंबील दिल्याने कॉलरा जात नाही, तो इंजक्शनने जातो. असाध्य वाटणारा मलेरिया औषधी उपायाने जवळजवळ नाहीसा झाला आहे, हे प्रत्यक्ष अनुभवास आल्यामुळे देवावरची अंधःश्रद्धा आता पुष्कळ कमी झाली आहे.

देव तुमचं चांगलं–वाईट करीत नाही, त्याचं अस्तित्वच नाही. त्यावर अवलंबून राहू नका, हेच नास्तिकवादी सांगतो आहे.

राजशाहीचा अंत तर जगातील बहुतेक राष्ट्रात झाला आहे. ब्रिटनमध्ये नामधारी राजा निव्वळ देव्हाऱ्यात बसवला आहे. इतरत्र राहिलेले पथास लागले आहेत. भारतात रक्तक्रांतीशिवाय ते खलास केले आहेत. पण धार्मिक बाबतीतील अंधःश्रद्धा समूळ नष्ट झाली नाही. धर्माच्या बाबतीत वल्लभभाईसारखा कणकर, निर्भय नेता अद्याप भारताला मिळाला नाही. धार्मिकबाबतीत इंग्रजाचं समझोत्याचं धोरण आमच्या नेत्यांनी स्वीकारलं आहे. अद्याप सर्व धर्मियांना, स्त्री–पुरुषांना एकच कायदा लागू केला नाही.

सर्व धर्म सहिष्णुतेने निधर्मी राज्य प्रस्थापित होणार नाही. ♠

समाज सेवा

समाज सेवा हा फार व्यापक शब्द आहे. यात सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय विषयांचा समावेश होतो. पण या लेखाची मर्यादा प्रमाणाबाहेर वाढेल म्हणून मी सामाजिक व धार्मिक विषयालाच या लेखात अधिक महत्त्व देऊ इच्छितो. वस्तुतः हे सर्वच विषय एकमेकात इतके गुंतले आहेत की, त्यांची एकमेकापासून फारशी फारकत करता येणार नाही.

तशी फारकत टिळकांनी राजकारणात केली होती. राजकीय उद्दिष्टांपासून म्हणजे स्वराज्य आणि स्वातंत्र्यापासून सामाजिक–धार्मिक स्वातंत्र्य अलग पाडले ! त्यामुळे ती चळवळ एकांगी झाली ! म्हणून त्या स्वातंत्र्याच्या आणि स्वराज्याच्या चळवळीपासून म्हणजे त्यावेळच्या काँग्रेसपासून, बहुजन समाज व अस्पृश्यातले, दलित वर्गातले पुढारी फुले, शाहू महाराज, आंबेडकर व त्यांना मानणारा बहुसंख्य समाज त्या राजकीय चळवळीपासून बाजूस राहिला. त्यांना 'नव्या स्वरूपात पेशवाई येईल व इंग्रजांच्या गुलामगिरीतून सुटून त्याहूनही भयंकर गुलामगिरीत पडू,' अशी भीति वाटू लागली! त्यावेळची काँग्रेस ही फक्त उच्चवर्णियांची, विद्वानांची, वाक्पंडितांची अन् अभ्यासूंची होती ! बहुजन कष्टकरी अन् दलित समाजाला पुढे सरकायला तीत वाव नव्हता.

गांधीजींच्याकडे नेतृत्व आल्यानंतर काँग्रेसचा कायापालट झाला. त्यांनी काँग्रेसच्या उद्दिष्टापासून व कार्यक्रमापासून कोणताही विषय बाजूस ठेवला नाही सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, अस्पृश्यतानिवारण, मंदिरप्रवेश वगैरे जीवनाच्या आवश्यक अशा सर्व विषयांना स्थान दिले व काँग्रेसही बैठ्या सुधारकांची अन् पुस्तकी पंडितांची न राहता देशासाठी झिजणाऱ्या, लढणाऱ्या, प्रसंगी प्राणाची आहुती देणाऱ्या लढावू कार्यकर्त्यांची बनवली.

त्यामुळे आतापर्यंत बाजूस राहिलेले महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे नेते केशवराव जेधे, शंकरराव मोरे, तुळशीदास जाधव, दिनकर जवळकर वगैरे महाराष्ट्रातील प्रमुख मंडळी काँग्रेसमध्ये शिरली व पुण्यातील केळकरांच्या

जागतिक पक्षाचा प्रभाव कमी झाला व पुढे नष्ट झाला. नेहरूंनी गांधीजींच्या पुढचे पाऊल टाकून भारताला समाजवादाची दिक्षा दिली व त्या समाजवादाला लोकशाहीची जोड देऊन चीन व रशियापासून निराळचा भारतीय समाजवादाची प्रतिष्ठापना केली. त्या समाजवादाला व्यवहारवादी अहिंसेची जोड देऊन पंचशीलेला जगाची मान्यता मिळवून घेतली.

इंदिराजींनी आपल्या पिताजींच्या पुढचे पाऊल टाकून त्यांच्या ध्येयवादाला प्रत्यक्ष स्वरूप आणण्याकरता पिताजींची समझोत्याची भूमिका टाकून समाजवाद 'याच देही, याच डोळा' पाहण्यासाठी व आणण्यासाठी कणखर भूमिका स्वीकारली.

नेहरू धार्मिकदृष्टचा गांधीजींच्याहून पुरोगामी. देव, धर्म, ईश्वर, पूर्वजन्म, पुनर्जन्म, दैववाद, अंतरीचा आवाज वगैरे गूढवादापासून संपूर्ण अलिप्त !

गांधींना पूर्वसंस्कारापासून हिंदुधर्माच्या बंधनातून मुक्त होता आलं नाही ! धर्माकडे अन् देवाकडे, शास्त्रीय दृष्टीकोनातून पाहण्याचा त्यांनी विचार केला नाही, त्यामुळे समाजातील अंधश्रद्धा ते काढू शकले नाहीत ! उलट ती घट्ट केली ! वर्णाश्रम धर्माला व्यापक स्वरूप देण्याच्या निमित्ताने, ती जुनी पकड कायम ठेवली. त्यामुळे अस्पृश्यतानिवारणेचा प्रयत्न करूनही, ते अयशस्वी ठरले ! त्यांचे प्रेम अस्पृश्यांपेक्षा हिंदु धर्मावर जास्त होतं ! त्यामुळे सर्व जातींना, भेदाभेदांना, सामाजिक विषमतेला घट्ट आवळून धरणाऱ्या हिंदुधर्मापासून त्यांना अस्पृश्यांची सुटका करता आली नाही. 'हरिजन' हे नाव देऊन त्यांच्या 'हरीची' पकड अस्पृश्यावर बसवली व उच्चवर्णियांनीच नव्हे तर, सर्व हिंदु समाजाने गांधीच्या 'हरिला'च अस्पृश्य करून टाकले! अस्पृश्यांची सुटका अपमानी जिण्यापासून गांधीजींना करता आली नाही ! ती फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरच करू शकले, कारण ते अस्पृश्यांच्या जीवनाशी समरस झाले होते. त्यांची सुखदुःखे त्यांनी प्रत्यक्ष भोगली होती. ते खूप शिकले. जगात विद्वान म्हणून मान्यता पावले. पण महार म्हणून लागलेला व चिकटलेला शिक्का ते अस्पृश्य समाजात म्हणजे हिंदुधर्मात असेपर्यंत त्यांना घालवता आला नाही !

अस्पृश्य लखोपती झाला, तरी तो महार, मांग, चांभार, ढोरच ! तो अस्पृश्यच ! अस्पृश्य बी. ए., एम्. ए, पीएच्. डी., बॅरिस्टर झाला, तरी

समाजात तो महार, मांग चांभार, ढोरच ! तो कलेक्टर झाला, डी. एस्. पी., डी. आय. जी. झाला, आमदार, खासदार, मंत्री, राष्ट्राध्यक्ष झाला, तरी हिंदु समाज त्याला महार मंत्री, मांग मंत्री म्हणणार. भारताचे संरक्षण करणारा मंत्री झाला तरी तो अस्पृश्यच !

काँग्रेसने अस्पृश्यतानिवारणेचे कार्यक्रम हाती घेतले, तरी ते रहाणार अस्पृश्यच ! अस्पृश्यांची सामाजिक सुधारणा, शैक्षणिक सुधारणा, आर्थिक सुधारणा, हाती घेतली तरी ते राहणार अस्पृश्यच !

एकच खरा मार्ग अस्पृश्यतानिवारणेचा. या घाणीतून बाहेर पडण्याचा. तो एकच !

सर्व अस्पृश्यांनी बुद्ध धर्माचा स्विकार करणे. बाबासाहेबांनी सर्व अनुभव घेतल्यानंतर ते या नित्कर्षाला आले–

"अस्पृश्यांनो, तुम्ही बुद्ध धर्माचा स्विकार करा ! म्हणजे अस्पृश्यातील महार, मांग, चांभार, ढोर, भंगी हे भेद, या जाती नष्ट होतील व अस्पृश्य बुद्धधर्मीय म्हणून सर्वांची बलवत्तर अशी लढाऊ संघटना निर्माण करू शकतील व पुनः बुद्धेतर वर्गाच्या जुलुमाचा संघटितपणे प्रतिकार करू शकतील."

गांधी दिनानिमित्त होणाऱ्या कोणत्याही कार्यक्रमाने अस्पृश्यांची बलवत्तर संघटना होणे शक्य नाही. अन् काँग्रेस संघटनेवर गांधींनी दिलेल्या कार्यक्रमाची एवढी प्रचंड छाप आहे की, काँग्रेस संघटना, काँग्रेस सरकार व मंत्री स्वतंत्रपणे या प्रश्नांचा विचारच करू शकत नाहीत. त्यांची स्वतंत्र बुद्धी व विवेचक शक्ती गांधीच्या छापाने मारून टाकली आहे, नाही तर त्यांनीच अस्पृश्यांना उपदेश केला असता.

"अस्पृश्यांनो, माणूस म्हणून तुम्हाला भारतात इतरांच्या बरोबर स्थान मिळवायचे असेल, तुमच्यातील संघशक्ती वाढवायची असेल, विवेचक बुद्धीची राखण करायची असेल आणि स्पृश्यांच्या अन्यायाला जबर टोला द्यावयाचा असेल, तर सर्वांनी बुद्ध धर्माचा स्विकार करावा."

वस्तुतः हा उपदेश काँग्रेसतर्फेच व्हायला पाहिजे.

काँग्रेसच्या 'गरीबी हटाव' ला खरं मूर्तस्वरूप आणणारी शक्ती या बुद्ध धर्म स्विकारलेल्या समाजातूनच निर्माण होईल. कारण हाच खरा प्रोलिटेरिअट आहे. सामाजिक, धार्मिक, आर्थिक सर्व दृष्टचा छळलेला, पिळलेला, पिडलेला हा जगातला एकमेव समाज आहे. इथे क्रांतीची शक्ती आहे. गरीबी हटावला 'अंधश्रद्धा हटाव'ची जोड देणारा हाच खरा समाज आहे.

अस्पृश्यांच्याकडे भूतदयेने पहाणारे महाभाग आम्हाला नको आहेत, उपकार बुद्धीने पाहणारे नको आहेत.

अस्पृश्यांकडे उपकार बुद्धीने पाहण्याची आपल्यातली सवय जात नाही. मंत्र्यांनी कार्यक्रम जाहीर करायचे, पण त्यात स्वतः सहभागी व्हायचं नाही.

स्वतः त्यांच्या वस्तीत जाऊन कधी रहायचं नाही. त्या गरीबांच्या घरची चटणी–भाकर प्रेमाने आपलं घर समजून कधी खायची नाही.

महारवाडे साफ करा, म्हणून फतवा काढायचा. पण त्या अस्पृश्या-बरोबर हातात झाडू घेऊन कधी सहभागी व्हायचं नाही. परीट घडी कपडचाला घाण लागू न देता परोपदेशपांडित्य करण्याची संवय मंत्र्यानीही टाकायला पाहिजे. आपण सामान्यांतूनच वर आलो, सामान्यांनीच आपल्याला निवडले आहे, ही जाणीव मंत्री होताच नाहीशी होते.

गांधीचं नाव घ्यायचं, आचरणानं उलट वागायचं असं होता कामा नये. लोकाना आपले धनी मानून सेवाभावाने वागणारी संस्था व पुढारीच देशाचे नेतृत्व करू शकतील– सुदैवाने असं नेतृत्व इंदिराजींच्या रूपाने आज भारताला मिळालं आहे. म्हणून भारताचं भवितव्य उज्वल आहे. ♠

सत्यशोधकांचा समता संघर्ष

श्रीमती गेल आमव्हेद यांनी संशोधकांच्या दृष्टीनें ब्राह्मण–ब्राह्मणेत्तर चळवळीचा अभ्यास केला आहे. मी संशोधक नाही, पण एक महात्मा फुले वगळले असता सत्यशोधक व ब्राह्मणेत्तरातील सर्व पुढारी माझे समकालीन होत. बहुतेक सर्व पुढाऱ्यांशी माझा कमी अधिक संबंध आला आहे. काही तर माझे जिवलग स्नेही. शाहू छत्रपती, ना. भास्कररांव जाधव, रा. ब. लठ्ठे व मुकुंदराव पाटील वगळले, तर वयाने मी इतरांहून जास्त.

ना. भास्कररांव जाधव

मुंबईस शाहू महाराजांच्या बंगल्यात ७ वर्षे रहात होतो. त्यामुळे त्यांच्या आचारविचार व स्वभावाची बरीच ओळख होऊ शकली. रा. ब. लठ्ठे यांचा प्रजा परिषदेच्या लढ्यात पुष्कळ संबंध आला. ना. भास्कररांव जाधवांचा, सत्यशोधक चळवळीत व लेखक म्हणून किर्लोस्कर यंत्राचे ज्ञानमंदिर, र. धो. कर्व्यांचे 'समाजस्वार्थैय' यात संबंध आला, माझ्याशी ते समाजवादी विचारसरणीवर नेहमी चर्चा करीत. माझ्या 'बेकारी व तीवर उपाय' या मराठीतील पहिल्याच समाजवादी ग्रंथाला त्यांनी प्रस्तावना लिहिली. तशीच 'महात्मा फुले हेच आमचे मार्गदर्शक' या ग्रंथावर नामदार पोथीनिष्ठ सत्य-समाविष्ठ नव्हते. ते त्यापुढे जाणार होते. मी सभासद होताना ठराविक साचाच्या काही गोष्टी मान्य केल्या नाहीत. तरी ते आड आले नाहीत. इतकेच नव्हे तर, 'सत्यशोधक हीरक महोत्सव ग्रंथाचे' संपादकत्व त्यांनी मलाच दिलं. 'कालाप्रमाणे आपण पुढं गेलं पाहिजे.' अशी वाक्ये त्यांनी प्रस्तावनेत लिहिली होती शाहू महाराजांनी ब्राह्मण शंकराचार्याच्या ठिकाणी क्षात्रजगद्गुरु उभा केला, याला त्यांनी व मुकुंदराव पाटलांनी विरोध केला होता. माझा कल मार्क्सवादाकडे असूनही त्यांनी मला सभासद करून घेतलं व सत्यसमाज सस्थेच्या महामहोपाध्यायांची जागा मला देऊ केली होती. आमच्या मराठा समाजात त्यावेळी हेच एक ब्राह्मण पंडिताची बरोबरी करणारे संस्कृत पंडित होते.

केशवराव विचारे

यानंतर खरा सत्यशोधक आणि अखेरचा म्हणजे केशवराव विचारे. खरा फुल्यांचा अनुयायी, प्रचारक. त्यांनी अगदी अडाण्यातून, अशिक्षितातून आणि मागासलेल्या जनीतून प्रचारक तयार केले. काही खेड्यातून देवाचं साफ उच्चाटन केलं, हेच कार्य नार्वेकरांनी कोल्हापूर जिल्ह्यात चालू केलं होतं. हे कार्य चालू ठेवण्याकरता मी बागल मंत्रिमंडळाकडून बारा हजार रुपये देऊ केले होते. पण नार्वेकर राजकारणात पडले आणि त्यांचे कार्य थांबले.

बाळासाहेब देसाई सत्यशोधक समाजाचे अध्यक्ष झाले आणि त्यांनी फुल्यांच्या तत्त्वज्ञानावर शेण–गोळा फिरवला व सत्यसमाज संस्थेची इतिश्री केली.

शंकरराव मोरे

हे सत्यशोधक समाजाचे केव्हाच मेंबर नव्हते, तरी ब्राह्मणेत्तर समाज त्यांना आपले पुढारी समजे. ते शेतकरी कामगार पक्षाचे जनक. सत्यशोधक समाजाच्या पुढाऱ्यांचे संबंधित. विद्वान, पट्टीचे वक्ते, भाषा सोपी, मांडणी मुद्देसूद. 'जनसत्ता' हे पक्षाचं म्हणून साप्ताहिक काढलं. बोचक लिहिणार. बोचक बोलणार, पण अलिप्तता असणार नाही. भाषण केव्हाही कंटाळवाणे असणार नाही. 'दाभाडी प्रबंध' हा त्यांच्या विचाराचा गाभा. शेतकरी कामगार पक्षाला रशियाने भारतातला एकमेव कम्युनिस्ट पक्ष म्हणून मान्यता द्यावी ही त्यांची महत्त्वाकांक्षा, पण ती सफल झाली नाही. पक्षातील बरोबरच्या लोकांना त्यांनी दुखवलं. त्यामुळे पक्ष दुभंगला व काँग्रेसला शह देण्याइतकी शक्ती दुर्बल झाली. शंकरराव हताश होऊन काँग्रेसमध्ये गेले. खासदारीचं तिकीट मिळालं. त्यांना निवडून आणण्याकरिता मी प्रचार–दौऱ्यात भाग घेतला होता. ते निवडून आले. पण तिथंही त्यांची महत्त्वाकांक्षा पुरी झाली नाही. तिथं गेल्यावर त्यांनी Machinery for Rural planning हे पुस्तक लिहिलं, त्याचा जवाहरलाल नेहरूंनी पुरस्कार केला.

तुळशीदास जाधव व र. के. खाडिलकर

दोघेही आज हयात आहेत. जाधव फारसा शिकलेला नव्हे. कट्टर सत्यशोधक नव्हे. पण दांडगा प्रचारक, चिकाटीचा व्याख्याता. चार तास न कंटाळता बोलणार, लोक कंटाळले तरी. स्वातंत्र्यासाठी जीव देण्याची तयारी– सोलापुरला मार्शल लॉ पुकारला होता. त्यावेळी एका सोल्जरने त्यांच्या छातीवर बंदूक रोखून 'गांधी टोपी काढ, नाहीतर गोळी घालतो' म्हणून धमकी दिली, पण गांधी टोपी काढली नाही. छाती पुढे करून उभे राहिले.

र. के. खाडिलकर

डाव्या विचारसरणीचे शे. का. पक्षातील 'ब्रेनसेंटर' बहुतेक सर्व ठराव यांनी लिहून काढायचे. शे. का. पक्षानंतर किसान मजूर पक्ष काढला, पण त्याची वाढ झाली नाही. संयुक्त महाराष्ट्रलढ्यात भाग घेतला. शे. का. पक्षात ते मला फार जवळचे झाले. त्यांच्यात जातीवादाचा लवलेशही नव्हता. पण अखेर तेही काँग्रेसमध्ये गेले. खासदार झाले. चीनला भेट दिली. तेथल्या अनुभवाचं पुस्तक लिहिलं. इंदराजींनी त्यांना मंत्रिमंडळात स्थानही दिलं. आज ते निवृत्त आहेत.

क्रांतिसिंह नाना पाटील

मराठा समाजातील राजकारणातली प्रचंड शक्ती त्यांनी व्यासपीठावर चढल्यानंतर शड् ठोकून 'शिवाजी महाराज की जय' म्हणून डरकाळी फोडली की श्रोत्यांकडून तितकीच गगनभेदी साथ मिळणार. पण हे त्यांना राजकीय स्थान मिळाल्यानंतर–पण प्रथमावस्थेत त्यांनी अगदी साध्या लग्न–समारंभातून पुरोहिताचं वर्चस्व काढून टाकण्याचा कार्यक्रम हाती घेतला. तसा त्यांनी म. फुल्यांच्या चरित्राचा व विचाराचा अभ्यास केला होता असंही नाही. पण राजर्षि शाहुंची चळवळ कानावर पडलेली. त्यांनी पुरोहितांचं वर्चस्व काढून टाकलेलं हे त्यांनी ऐकलं होतं, तेवढंच भांडवल.

मी छत्रपतींच्याच राज्यातला. सत्यशोधक. मी गांधीच्या कार्यक्रमाचा दौरा काढला होता. वाळवे तालुक्यात त्यांच्या मच्छिद्र गावाजवळ आलो होतो. त्यांनी माझ्यासाठी घोडं पाठवून नेलं व माझ्या अध्यक्षतेखाली एक लग्नसमारंभ पार पाडला. वधू-वरांनी एकमेकांच्या गळ्यात हार घालायचा. लोकांनी टाळ्या वाजवायच्या.

नंतर कोल्हापुरात रूईकर कॉलनीत डेटिस्ट माने यांच्याकडे उतरले असताना माझं 'बेकारी व तीवर उपाय' हे पुस्तक वाचून दाखवून समाजवादाचे प्राथमिक धडे दिले.

पण ते कुठल्याही पक्ष बंधनात सुरवातीला न पडता स्वतंत्रपणे देश स्वतंत्र करण्याच्या कार्यास लागले. सातारा जिल्हा जवळजवळ मुक्त केला. पोलिस व सोल्जरांनी त्यांची भीती घेतली. खेडुतांची पिळवणूक करणाऱ्यापासून सुटका करणें, हा आपल्या लढ्यातल्या एक भाग समजून खोटे कागद करून शेतकऱ्यांच्या गालकीच्या जमिनीत घशात घालणाऱ्याच्याकडून कागद–

पत्र फाडून मालकांच्या ताब्यात दिल्या. ज्यांनी शेतकऱ्यांना फार छळलं व त्यांना प्रतिकार केला, त्याची स्वतः चौकशी करून पायात पट्या ठोकल्या, म्हणून 'पत्री सरकार' असं त्याचं नाव पडलं. पण ही चळवळ म. गांधीजींना नापसंत असल्यामुळे त्यांनी कायदेभंगाचा सत्याग्रही मार्ग स्वीकारला. काँग्रेस–नंतर ते शे. का. पक्षात आले. त्यांचेबरोबर मी अनेक व्याख्याने दिली. बहुतेक सभेत मीच अध्यक्ष असे. मोरे, जेधे ही सुद्धा मंडळी असत. यानंतर ते कम्युनिस्ट पार्टीकडे झुकले. त्यांना खासदारकीला उभे केले. निवडून आले. पार्टीने त्यांना रशियात पाठविले. खासदारीत त्यांचे मन रमले नाही. मोकळचा जंगलात वावरणारा वाघ पिंजऱ्यात अडकून पडावा तसे झाले. प्रकृती ढासळली. मधु-मेहानें पायाला जखम झालेली बरी झाली नाही, म्हणून पाय कापावा लागला. मी मिरजेस भेटावयास गेलो होतो. थोडे बरे वाटल्यानंतर ते पंढरपूरला जाऊन राहिले. मूळचे वारकरी. आजार वाढला, पुनः मिरजेला आले व तेथेच त्यांची आजारातून कायमची सुटका झाली.

केशवरावजी ठाकरे

यांचं आत्मचरित्र वाचायला मिळालं. त्यांनीही माझ्यावर लोभ केला. ते आमचे कुटुंबीय झाले होते. मला ते 'बाबुराव' याच घरच्या नावानं हाक मारीत. ते इतिहास संशोधक होते. पण त्यांना साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद मिळालं नाही. ती मक्तेदारी अद्याप मोडत नाहीत.

प्रभातकार वालचंद कोठारी

यांनीही तितकेच प्रेम केलं. संयुक्त महाराष्ट्र लढ्यात तर 'प्रभात'–मध्ये दर आठवड्यालाच नव्हे, तर आठवड्यातून अनेक वेळा माझे लेख अ-ेत. मी त्यांच्या घरी उतरत असे.

कर्मवीर भाऊराव

भाऊरावांनी म. फुल्यांच्या शिक्षणकार्याला मूर्त स्वरूप दिलं. कोल्हापुराला आले की मला भेटणार. मी साताऱ्याला माझे स्नेही राजे भोसले यांचेकडे आल्याचं कळलं की सुजऱ्या पायासकट चालत येऊन आपल्या घरी नेणार. त्यांनी मोरारजींच्या विरुद्ध सभा घेतल्या. त्यांचेवर जाळापोळीचा आरोप केला होता. ग्रँट बंद केली होती, पण न डगमगता लोका–श्रयावर संस्था चालवली. निषेधाच्या सभा घेतल्या. त्यात मी, मोरे–जेधे व्याख्याते म्हणून होतो. अखेरच्या काळी सिव्हील हॉस्पिटलमध्ये पुण्यास भेटी–करता मला बोलावून घेतले. 'माधवराव' आता जातो' असं म्हणाले.

विद्वत्त शिरोमणी भारत भाग्यविधाते पुण्यश्लोक डॉ. आंबेडकर

यांचे माझे संबंध तसे जवळचे आले नाहीत. तरी मला ते आपला समजत. प्रजा परिषदेला यश मिळाल्यानंतर मुंबईत ३०-४० संस्थांनी आमचा सत्कार केला. त्यावेळी छ. ताराबाई राणीसाहेबांनी मला शिवतीर्थावर ठेवून घेतलं होतं. त्यावेळी बाबासाहेब ग्रँट रोडवरील सेंट्रल स्टेशनावर गाडीच्या स्पेशल डब्यातच मुक्कामी ठेवीत. मला त्यांनी बोलावून घेतलं, जेवायला ठेवून घेतलं! मला म्हणाले, 'माधवराव, मला थोड्या पैशाची गरज आहे, तुमचं सरकार काही देऊ शकेल काय ?' त्यांनी मागितलेली सर्व रक्कम मी बागल मंत्रिमंडळातर्फे पाठवून दिली. कोल्हापूरला प्रजा परिषदेविरुद्ध सरकारने अस्पृश्यांना उठवून आमचे विरुद्ध निषेधाची सभा भरवण्यासाठी बाबांना बोलावून घेतलं होतं. पण त्यानी बोलण्यास साफ नकार दिला. त्या पुण्यपुरुषाचा त्यांच्या हयातीतच आणि अखिल भारतात प्रथमच पुतळा बसवण्याचे श्रेय मला मिळालं. त्या या 'भारतभूषण' नेत्यांचं मराठवाडा विद्यापीठाला नाव दिल्याने मराठवाडचाला भूषण ठरलं असतं, पण उपकारकर्त्याशी कृतघ्न होऊन तेथील सवर्णांनी विरोध करून नावाला काळोखी लावून घेतली, तथापि ते नाव लावलं जाईलच! सरकार कायमची बदनामी करून घेणार नाही. अद्याप ब्राह्मण-ब्राह्मणेतर तेढ गेली नाही, ती व्यासपीठावर गेली आहे. पण मनातून व वागणुकीतून गेली नाही. त्याला स्पृश्य-अस्पृश्येतर असं भीषण स्वरूप येऊ लागलं आहे. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद हा काही आजचा नाही, पुरातन काळापासून चालत आला आहे. मनूने आणि कृष्णाने त्या विषवृक्षाचं पेरलेले बीज अद्याप जिवंत आहे. ते उखडून समूळ नष्ट करण्याचं कार्य आजच्या पुरोगामी तरुणांनीच करायचं आहे. ती नवी पिढी तयार करण्याचं पवित्रकार्य शिवाजी विद्यापीठाकडून केलं जाईल, अशी मी अशा करतो व मला माझे विचार मांडण्याची व जुन्या कार्यकर्त्यांची ओझरती ओळख करून देण्याची संधी दिल्याबद्दल कुलगुरु डॉ. भणगे यांचेबद्दल कृतज्ञता व्यक्त करून चर्चेचं उद्घाटन केल्याचं जाहीर करतो. ♠

बुद्धिझम व कम्युनिझमचा समन्वय झालाच पाहिजे

एकंदर जनतेची, अर्थात भारतीय जनतेची परिस्थिती पाहून, मला काय लिहावं हेच समजत नाही. हे आपखुशीनं गुलाम झाले आहेत. हजारो वर्षे झाली तरीही मानसिक गुलामगिरी फेकून देत नाहीत. राजकीय गुलामगिरी-हून मानसिक गुलामगिरी अधिक भयंकर !

भारताने राजकीय गुलामगिरी फेकून दिली, पण सामाजिक व धार्मिक, म्हणजे देवाधर्माची गुलामगिरी मात्र त्याला टाकून देता आली नाही.

इंग्रजी शिकलेल्या भारतीयांनी पारंपारिक कपडे टाकून दिले, पण पारंपारिक विचार, अंधश्रद्धा टाकून दिली नाही. इंग्रजी पोषाख घालून, पण कपाळाला गंध लावून देवालयाला फेरी घालणारे व आपल्या थोबाडीत मारून घेणारे मी रोज पाहतो आहे. डोकीवरती हॅट व कपाळावर गंध हे 'कॉमिक' दगड भक्तीत झाकून जातं !

शिवाजी विद्यापीठाचे एक कुलगुरु खिशात देवाची मूर्ती घालून नेहमी हिंडत. काही संकट आल्यास दगडोबांना पुढं ढकलत असल्यास कोण जाणे.

भागवतधर्मीय संत, ज्ञानदेव, तुकाराम, नामदेव, चोखामेळा वगैरेंनी, उच्चवर्णीयांनी केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करण्याचं धाडस (?) न करता नुसता आक्रोश केला आहे.

तुकाराम म्हणतात, 'मी कुणबी झालो हेच बरं झालं !' नाहीतर 'दंभेच असतो मेलो' दारिद्र्य हेच त्यांना सुखावह वाटलं !

दलित वर्गाच्या महत्त्वाकांक्षा, त्यांचे पौरुष्य मारून टाकले, 'कोणी इमल्यात राहतील, पालखीतून मिरवतील, पण आपल्याला 'झोपडी हेच बरी'' असं म्हणतात.

नामदेवांनी धावत जाऊन कुत्र्याला आपल्या पुढचीं भाकरी दिली. पण ज्या कामगारांना कष्ट करूनही पोटापुरती भाकरी मिळत नाही, त्यांच्यासाठीं हे संत कधी झगडले नाहीत किंवा झगडा म्हणून उपदेश केला नाही !

त्यांनी देवाची गुलामगिरी स्वीकारली– तशी उच्चवर्णियांची, जमीनदाराची व राजाची स्वीकारली !

कृष्ण, मनू, ख्रिस्त, महमंद पैगंबर या सर्वांनी, पोप व धर्मगुरूंनी, राजा हा देवाचाच अवतार आहे. त्यांची आज्ञा म्हणजे ईश्वराची आज्ञा अशी स्वतःची खात्री दिली. कष्टकरी, शेतकरी, कामगार, शूद्र यांना पिळवणूक करणाऱ्याच्याच पायाखाली घातले !

पोप म्हणतो,

'राजा दुष्ट असला तरी त्याला ईश्वरानेच अधिकार दिला असल्याने त्याची आज्ञा अवमानणे म्हणजे ईश्वराची आज्ञा अवमानणे होय.'

आईने मुलाचे ऐकलं नाही म्हणजें बागुलबोवाची भीती घालावी तसल्यातलाच हा प्रकार.

कोणताही धर्म असो, त्याने पिळवणूक करणाऱ्यांचीच राखण केली आहे. त्यानें नरकाची व अमानुष शिक्षेची भीती घातली आहे !

चर्चिसनी गुलामीच्या उच्चाटनास करता येईल, तितक्या काल विरोध केला आहे. आर्थिक समतेला विरोध केला आहे, समाजवादाला विरोध केला आहे. हे जे जे सांगतील, ते मुकाटचानं ऐकलं पाहिजे– शंका घेता कामा नये.

बायबल म्हणते, 'जो संशय घेईल तो नरकात पडेल.'
कृष्ण म्हणतो, 'संशयात्मा विनश्यन्ति।'

मानवेंद्र रॉय म्हणतात,

'ज्या लोकांची मनोवृत्ती ईश्वर–प्रामाण्यादी आहे, त्याला लोकशाही कधीच प्रस्थापित करता येणार नाही.'

या देवाधर्माच्या मानसिक गुलामगिरीतून बुद्धिवादी बुद्धधर्माने मुक्त केलं. बुद्ध धर्म हा बुद्धिवादी आहे. हे बुद्ध धर्माच्या अभिमान्यांनी विसरू नये.

ख्रिस्तमस हन्फ्रे म्हणतो,

"बुद्धिझमला जरी बुद्धधर्म असं मानलं जातं, तरी तो मूलतः जीवनाचा मार्ग आहे. ते एक तत्व आहे आचाराची पद्धती आहे. गौतम सिद्धार्थ हा देव नव्हता, माणूस होता. आणि जे एका माणसाने केलं, ते इतर कोणीही माणूस करू टाकतो.

बुद्धीपासून बुद्ध हा शब्द आहे.

बुद्धिझममध्ये हटवादीपणा नाही व मताचा आग्रह नाही.

"कम्युनिझम् व बुद्धीझम यांच्या तत्वात साम्य आहे."

हे बऱ्याच बुद्धिस्टांना मान्य नाही. हा आग्रहवाद dogmalism ज्यांना प्रगती थांबवायची नाही, त्यांनी टाकला पाहिजे.

आर्थिक प्रश्न सुटला की सर्व प्रश्न सुटतात, हा डॉगमॅटिझम् कम्युनिस्टांनी सोडला पाहिजे, या दोन्ही इझमचा संयोग होणे भारताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे.

बुद्धाने हिंदु समाजावरचे देव–ईश्वर, आत्म, स्वर्ग–नरक व कर्मविपाकाचे जोखड फेकून दिले. हे अज्ञ समाजावर त्यांचे अगणित उपकार झाले आहेत. पण त्यांच्याकडून आर्थिक प्रश्नाची सोडवणूक झाली नाही.

आणि कार्लमार्क्सला वर्णाश्रम, 'जातिभेद व अस्पृश्यता, श्रीकृष्ण व मनूचे डावपेच यांची पूर्ण कल्पना आली नव्हती.

म्हणूनच बुद्धिझम व कम्युनिझम यांचा समन्वय होणं अत्यंत आवश्यक आहे.

बुद्धांनी भांडणे व शत्रुत्व नाहीसे व्हायचे असल्यास इस्टेटीचा मोह टाकून द्या, असा उपदेश केला आहे! तो पूर्ण अव्यवहारी आहे. बेकार, दारिद्री, दलित या वर्गाला इस्टेटीचा मोह टाका, म्हणायला त्यांच्याकडे इस्टेटच नाही.

धनिकांना हा उपदेश केव्हाही मान्य होणार नाही. त्यांनी सुखाने आपली इस्टेट जमिनी, धन व सत्ता केव्हाही सोडली नाही. ती त्यांना सोडायला लावायची, तर लेनिन व माओचाच मार्ग स्वीकारला पाहिजे. सत्यासाठी शस्त्र वापरणं हीं हिंसा नव्हे. स्वथ बसण्यानं आहेरे वर्गाला हिंसा करण्याची मोकळीक देणे होय.

पुण्यश्लोक बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्ध धम्माचं पुनरूज्जीवन केलं व ते नवबुद्ध झाले बाबासाहेबांनी स्वच्छ सांगितलं, मला जर कोणी विचारल की, आर्थिक क्रांती अगोदर की धार्मिक क्रांती अगोदर, तर मी म्हणेन धार्मिक क्रांती अगोदर, मग आर्थिक क्रांती.!

याचाच अर्थ–

बुद्धिझम व कम्युनिझमचा समन्वय झाला पाहिजे.

गोब्राह्मण प्रतिपालक नव्हे–
पीडितांचे, सामान्यांचे शिवाजीमहाराज !

अन्यायाचा प्रतिकार करण्याकरताच शिवछत्रपती लढ्यात पडले. तो अन्याय, तो जुलुम, प्रथम मराठे, जहागिरदार, जमीनदार व राजे यांचाच दिसला. मुसलमानांचा, मुसलमान राजांचा व बादशहांचा नव्हे. खरे शत्रू दिसले ते कष्टकरी, गरीबांना छळणारे मराठे जहागिरदार.

शिवराय म्हणतात– बळकट व्हावे दुसऱ्या घ्यावे, दावे–दरोडे करावे, हा यांचा सहज हव्यास, परचक्र आले म्हणजे वतनाच्या आशेने अगोदरच सलोखा करतात, स्वत: भेटतात. तिकडील भेद इकडे व इकडील तिकडे करून. राज्यात शत्रूस प्रवेश करतात. देश मारतात.

शिवबांचा वर्गसंघर्ष

यावरून स्वच्छ दिसून येते की, शिवाजीमहाराजांचा लढा हिंदू धर्माचे संरक्षण करण्याकरता नव्हता, गोब्राह्मणांचे प्रतपालन करण्याकरता नव्हता, तो वर्गसंघर्ष होता. कष्टकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्याविरुद्ध होता. त्यावेळी वर्गसंघर्षाला चालना दिली. याचे कम्युनिस्टांना व समाजवाद्यांना आश्चर्य वाटेल. हिंदूसभावाले व जनसंघीय मात्र घोटाळ्यात पडतील. मुसलमाना–विरुद्ध हिंदुंना चेतवायला अवघड पडेल. ब्राह्मणांनी शिवाजीस आपल्या स्वार्थासाठी आपल्या विचारसरणीत. ओढून घेतले, तरी तो त्यांचा नव्हता. त्या लढ्यात कौटुंबिक स्वार्थही नव्हता, जातिस्वार्थही नव्हता. तो दीनदलितांचा पालनवाला होता.

अनेक मराठे व रजपूत राजांनी दिल्लीचे व विजापूरच्या आदिलशहाचे मांडलिकत्व पत्करून आपल्या मुलीसुद्धा त्यांच्या जनानखान्यात ढकलल्या व त्यांचेकडून मानसन्मानाची पदे मिळवली. त्या गुलामगिरीचाही त्यांना अभिमान वाटे. फार काय शिवाजीमहाराजांचे वडील, शहाजीमहाराज हेही विजापूरकरांचे मांडलिकच होते. त्यांना आपल्या मुलग्यानें मालकाविरुद्ध बंड

करू नये, आदिलशहाच्या मुलुखावर स्वारी करून तो मुलूख घेऊ नये, अशी आज्ञा केली तेव्हा शिवबा त्यांना लिहितात –

'आम्हाला यवनाचे चाकर म्हणून अन्न सेवन करावयाचे नाही, तेव्हा आमचे पुंडपणात वडिलाची विपत्ती होणार ऐशास त्यांचे दैव आपण ज म दिला, परंतु कर्म दिले नाही.'

शिवबांना ही शिकवण कोणी दिली? मार्गदर्शन कोणी केले? रामदास आले होते काय इथे? रामदासांची भेट तरी झाली होती काय? शास्त्रशुद्ध-रीत्या गादी व र बसेपर्यंत शिसोदिया घराण्यातील या राजबिंडयाला शूद्र म्हणून संबोधले. गागाभटाने शास्त्रशुद्ध अभिषेक केल्यानंतर मात्र गोब्राह्मण प्रतिपालक म्हणून गौरविले! त्या गागाभटाला सामील करून घेण्याकरता महाराजांना एका युद्धाला खर्च करावे लागेल इतके धन द्यावे लागले.

माझ्या दृष्टीने हे करायला नको होते. तलवारीच्या जोरावर राज्य मिळवल्यानंतर यांच्या राज्यपदाला बहुसंख्य कष्टकऱ्यांनी मान्यता दिलीच असती. विरोध केला असता तो ब्राह्मणांनी. त्यासाठी गागाभटाला इतकी लाच देण्याचे काहीच कारण नव्हते. मुसलमान झालेल्या फलटणच्या निंबाळकराला भटांच्या सँक्शनशिवाय हिंदू करवून घेऊन त्यांच्याशी रक्तसंबंधही घडवून आणला, त्या महाराजांनी गागाभटाला लांच देऊन राज्यभिषेक करवून घेण्याचे काहीच कारण नव्हते. शाहुंनी आपल्या अधिकारात क्षात्र जगद्गुरु नाही का निर्माण केला! महाराजांनीसुद्धा एक पुढचे पाऊल टाकले एवढेच. पण ब्राह्मण जगद्गुरुच्या ठिकाणी मराठा जगद्गुरु आणला! पण कालांतराने त्यालाही कोणी विचारीना!

स्वातंत्र्याच्या आड आले, ते मुसलमान कापून काढले, तसे हिंदू पण कापून काढले. आप्त व रक्तसंबंधितांनाही कापून काढले. त्यांच्याशी ज्यांनी सहकार्य केले, त्यांची जात न बघता त्याच्यावर मोठमोठ्या जबाबदाऱ्या टाकल्या.

संभाजी शत्रूला मिळाला असे कानावर पडताच त्यासही अटकेत टाकले. विजापुरी अंकित असलेल्या आपल्या सावत्र बंधु व्यंकोजीवर चाल करून गेले. स्वातंत्र्यद्रोही चंद्रराव मोरे व बाजी घोरपडे यांना कापून काढले. पण प्रामाणिक एकनिष्ठपणे ज्यांनी सहकार्य केले, त्या मुसलमानांना जबाबदारीच्या जागेवर नेमले. दौलतखान व सिद्धीमेस्त्री या मुसलमानांना आरमार प्रमुख केले. आरमाराची कल्पना तर अगदीच नवीन. तरी त्यावरसुध्दा मुसलमान नेमला.

शिवबांना हिंदू सारखे... मुसलमान सारखे!

शिवाजीविरुद्ध अनेक हिंदुंनी विजापूरच्या सुलतान आणि दिल्लीचा औरंगजेब या मुसलमान शासकांना मदत केली आहे. शिवाजीचा पिता शहाजी यास कपटाने कैद करून विजापुरी सुलतानासमोर आणणाऱ्या मुस्तफाखान व अफझलखान यांच्याबरोबर मुधोळचा बाजी घोरपडे हाही होता. अफझल-खानचा विश्वासू वकील होता- कृष्णाजी भास्कर कुलकर्णी नावाचा ब्राह्मण. अफझलखानास ठार केल्यावर हाच कृष्णाजी शिवरायांवर चालून आला नि त्याने महाराजांच्या मस्तकावर तलवारीचा वार केला. खोच पडली. शिरस्त्रा-णामुळे महाराज बचावले. त्यावेळी समर्थ रामदासस्वामी अफझलखानाचा विश्वासू सरदार बाजी घोरपडे यांच्याच आश्रयास होते. (मा. म. देशमुख)

पन्हाळा येथील सिद्दी जोहारच्या वेढ्यातून सुटका करून घेण्यासाठी सूर्यराव सुवे याचा त्यांना पराभव करावा लागला. औरंगजेबाचा मामा शाई-स्तेखान शिवाजीवर चालून आला,तेव्हा जोधपूरचा जसवंतसिंग त्यांच्या मदतीस आला. दक्षिणेतील माहूरची रायबागन मुळची ब्राह्मण विधवा आपल्या अनुयायां-सकट औरंगजेबास मिळाली! पुरंदरच्या तहात २३ किल्ले औरंगजेबास मिळ-वून देणारा मिर्झा राजा जयसिंग हिंदूच होता. विजापूरचा आदिलशहा किंवा दिल्लीचा औरंगजेब यांचे देशमुख, देशपांडे आणि पाटील हे हिंदूच होते.

आग्रा येथे महाराज औरंगजेबाचे कैदेत असताना स्वतःचा जीव धोक्यात घालून शिवरायाची सुटका करणारा मदारी मेहेतर हा मुसलमान होता.

खुद्द औरंगजेबाचा पुत्र मुआजम याच्याशी महाराजांचे स्नेहसंबंध होते. शिवाजीमहाराजांचे वडील शहाजी व चुलते शरीफजी हे एका अवलीया पीराच्या प्रसादाने झाले. या समजुतीने त्यांची नावे मुसलमानी ठेवली.

शिवबांचे मुस्लीम चाहते

हमीद दलवाई म्हणतात, 'असे असताही शिवाजीमहाराज आज लोकांसमोर जे चितारले जातात ते मुसलमानांचे विरोधक म्हणून! त्यामुळे हिंदुराष्ट्रवादी व इतर शिवाजीमहाराजांचा आपापल्या स्वार्थासाठी उपयोग करून घेतात.

शिवाजी पाटगावच्या मौनीमहाराजांना आपले गुरु मानीत. तसे केळशीचेयाकूबबाबा यांनाही गुरु मानीत. महाराज कुराणाचा मान राखत.

त्यांनी पीराला उत्पन्ने करून दिली आहेत. आपल्या सैन्याने कुराणाचा अपमान करावयाचा नाहीं. मशिदी व पीरांना इजा द्यावयाची नाही. मुसलमान स्त्रियांनाही संरक्षण द्यावयाचे असा हुकूम दिला होता.

बाळ ठाकरे एका ठिकाणी म्हणतात की, शिवाजीमहाराजांची धार्मिक सहिष्णुता आणि मुसलमानांकडे बघण्याचा दृष्टीकोन ही त्यांच्या कार्याची फार महत्वाची अंगे होत. त्यांच्या लढाया जरी धर्मवेडचा मुसलमान राजाशी झाल्या, तरी त्यांनी आपल्या राज्यातील मुसलमानांना त्रास दिला नाही. यातूनच त्यांच्या आचारविचारांची घडण बनली होती.

शिवछत्रपती भोवतालची परिस्थिती, शेतकऱ्यांवर होणारे अन्याय व जुलूम पाहून अस्वस्थ होत.

पोर्तुगीज लेखक कास्मे डि गाडा म्हणतो; १५ वर्षांचा असतानाच शेजारपाजाऱ्यांचे हाल पाहून शिवाजी विचारमग्न होत असे. या जुलूमाचा प्रतिकार करण्यासाठी त्याने मावळचांची संघटना केली व प्रबळ सैन्याला प्रत्यक्ष तोंड न देता गनिमी प्रकारच्या युद्धाला सुरूवात केली.

हा गनिमी युद्धप्रकार चीन या माओने चंगकैशाकविरुद्ध स्विकारून त्याच्या सैन्यास हैराण केले.

ब्राह्मणी श्रेष्ठत्वाचा रामदासी प्रयत्न

महाराजांना दादोजी कोंडदेवने युद्धशास्त्र शिकविले नाही, रामदासाने तर नाहीच नाही. त्यांच्या अंगी ती पात्रता नव्हती. आणि राज्यारोहणापर्यंत रामदासाची व शिवछत्रपतीची गाठही पडली नव्हती.

शिवाजीमहाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या प्रयत्नाला हिंदुंचे राज्य स्थापन करण्याचा प्रयत्न म्हणजे सर्वस्वी चुकीचे आहे. (प्रा. नरहरी कुरुंदकर) किकेड म्हणतो– शिवाजी हा अलौकिक असा दूरदृष्टी, सर्वश्रेष्ठ मुत्सद्दी व राजकारण धुरंदर होता. राष्ट्रीय स्वातंत्र्य हे त्याचे एकमेव ध्येय होते.

केशवराव ठाकरे म्हणतात– शिवाजीला गोब्राह्मण प्रतिपालक ठरविण्याचा बूट ब्राह्मणांनी रचला. शिवाजीच्या पत्रव्यवहारात गाई आणि ब्राह्मण यांना स्थान नव्हते.

अर्जुनराव केळकर म्हणतात, 'स्वतःस राज्यभिषेक करून घेण्याचा निर्धार केल्यानंतर मगच मातुश्रींची संमती घेतली. नंतर महाराष्ट्रातील संतांना भेटले रामदास हे त्यापैकी एक होते. बापाची सल्लामसलत घेण्याचा प्रसंग त्यांना कधीच आला नाही. उलट बापाने विरोध केला असता त्यांनी तो मुळीच मानला नाही.

रामदास हा तर महाराजांचा राज्याभिषेक होईपर्यंत केव्हाच भेटला नव्हता व त्यांची व महाराजांची गाठही पडली नव्हती. शिवाजीमहाराजांचे मार्गदर्शन करण्याची त्यांच्या अंगी पात्रता नव्हती. त्यांच्या मार्गदर्शनाने समाजाची संघटनाच करता आली नाही.

ब्राह्मणाचे श्रेष्ठत्व राखण्याचा अतिहीन प्रयत्न रामदासाने केला. ब्राह्मणाखेरीज इतर हिंदुंना रामदासाने अगदी हीनच लेखले.

डोके वर काढणाऱ्यांना लाथा मारायच्या व त्याचे पुढारीपण प्रस्थापित झाले की, त्यांच्या पायावर डोके ठेवायच!

त्यावेळी नांगरणीला ट्रॅक्टर्स नव्हते, नांगरणीसाठी शेतकऱ्यांना बैलाची अत्यंत जरूरी होती बैलांची पैदास गाईशिवाय होणे शक्य नाही. यादृष्टीने शिवाजीमहाराज गोपालन राष्ट्राला आवश्यक म्हणून पहात. गोपालन झाले नसते, तर शेतकऱ्याला व त्यांच्या कुटुंबियांना जगणेच अशक्य झाले असते.

पण ब्राह्मण वर्ग गोपालनाकडे स्वार्थी दृष्टीने पहात होता शेतावर जाऊन नांगरणी-कुळवणी करणारा हा वर्ग नव्हे. स्वतःच्या जमिनी ब्राह्मणेत्तरांना लावून कष्टाशिवाय जगणारा हा वर्ग गोपालनामुळे दूधदुभत्याची यांची चंगळ! गोपालनाबरोबर ब्राह्मणपालन होऊ शकत होते, म्हणून त्यांनी महाराजांना 'गोब्राह्मण प्रतिपालक' हा किताब देऊन टाकला.

महाराजांच्या व ब्राह्मणांच्या दृष्टीतला हा फरक होता. महाराजांची दृष्टी राष्ट्रीय होती,ब्राह्मणांची जातीय होती. ती रामदासांच्या खालील श्लोकातून अगदी स्पष्टपणे दिसून येते-

गुरु तो सकलाशी ब्राह्मण । जरी तो झाला क्रियाहीन ॥
तरी तयासीच शरण । अनन्य भावे असावे ॥
ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवत ॥

पूर्ण होती मनोरथ । विप्र वाक्यें करूनी ।।
असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथें मानव बापुडे किती ।।
जरी ब्राह्मण मुढमति । तरी तो जगद्वंद्य ।।
अंत्यजे शब्दज्ञाता बरवा । परि तो घेऊन करावा ।।
ब्राह्मण सन्निध पूजावा । हे तो न घडे कधी ।।

हे वाचल्यानंतर या गृहस्थाला कोणीही संत अगर साधू म्हणणार नाही. काय शिकविले रामदासाने?

अशा प्रकारचे विचार, अज्ञ ब्राह्मणेतरांच्या डोक्यात ठासून घातल्यामुळे यांनी विनाश्रम दूध मिळण्याची सोय करून घेतली व शिवाजीमहाराजांना 'गोब्राह्मण प्रतिपालक' हे चिकटवून टाकले. पण कोणत्याही बखरीत महाराजांनी हे विशेषण स्वत:ला लावून घेतलेले नाही.

'गोब्राह्मण रक्षक' म्हणवीत नसत

याच भटानी राज्यारोहण होण्यापूर्वी महाराजांना शूद्र म्हणून राज्यारोहणाला मान्यता दिली नव्हती.

चढणाऱ्यास खाली ओढायचे
चढलेल्यांचे पायावर डोकं ठेवायचे, ही यांची नीती.

इतिहाससंशोधक शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरु डॉ. पवार मुंबई युनिव्हर्सिटीत केलेल्या भाषणात म्हणतात, 'पूर्वीच्या बखरीत अगर ऐतिहासिक कागदपत्रात महाराजांना मी 'ब्राह्मण प्रतिपालक' असे विश्लेषण लावलेले अगर त्यांनी लावून घेतलेले कोठेच आढळत नाही. उलट राजा जयसिंहाला लिहिलेल्या पत्रात शिवाजीने घोडचाची शपथ घेऊन विश्वास पटवण्याचा प्रयत्न केला आहे. गुन्हचाच्या बाबतीत ब्राह्मणाचे पालन करण्याची हमी शिवाजीने दिली नव्हती. अशा खास सवलती पेशव्यांनी दिल्या होत्या. असा पक्षपात शिवाजीनें आपल्या राज्यातील प्रजाजनाबद्दल केला नव्हता.

'त्यांच्यात धर्माभिमान नव्हताच असे मी म्हणणार नाही. पण तो धर्माभिमान मुसलमानांचा द्वेष करीत नव्हता. देशाला गुलामगिरीतून मुक्त करण्याकरता होता, पण याचा विचार ब्राह्मणांनी केला नाही व त्यांच्या राज्यारोहणाला ते शूद्र मानून त्यांनी विरोध केला. पण गागाभटाकटून मंत्रशुद्ध राज्याभिषेक करवून घेतल्यानंतर यांना 'गोब्राह्मण प्रतिपालक' म्हणण्यास सुरुवात केली व राज्यारोहण झाल्यानंतर रामदासाला गुरुपद दिले.

रणजीत देसाईंची खुशामत

या गटात मराठी कादंबरीकार रणजित देसाई सामील झाला व त्याने इतिहासाची पाने ब्राह्मणांना खूष करण्याकरता सत्याची फिरवाफिरव करून लिहिली. मराठा समाजाला अभिमान वाटेल अशी त्यांची लेखणी आहे भाषा सोपी आहे. रचनाकौशल्य आहे. एखादी स्त्री रुपवान आहे, पण तिने ते सौंदर्य धनप्राप्तीसाठी विकले असल्यास लोक तिचा तिटकाराच करतील.

रणजित देसाई याने रामदासाला राज्याभिषेकाला अगोदर आपल्या कादंबरीत आणला. ती कादंबरी असली तरी त्या साधनाने इतिहासाचा विपर्यास करणे हा गुन्हा आहे. पण त्याला ब्राह्मण पुढाऱ्याकडून व त्यांच्या वर्तमानपत्राकडून गौरव करून घ्यायचा होता तसा त्यांनी गौरव केला रामदासाचा आशीर्वाद घेऊन म्हणे ते सिंहासनारूढ झाले!

समर्थांची भेट घेऊन राजे रायगडी येत होते. महाराज म्हणतात, 'मोरोपंत, हत्तीवर अंबारी बरी चढवली?'

राज्याभिषेकानंतर देवदर्शनाला अंबारीतून जावे लागले. त्यासाठी हत्ती सजवले. (याचा अर्थ राज्याभिषेकापूर्वी रामदासांची गांठ पडली होती असे रणजित वर्णन करतात) त्या कादंबरीचे पान २१५- जिजाबाई रामदासाला म्हणतात, महाराज, 'आपण आलात, दर्शन घडलं महाराज काळजी वाटते शिवबाची आम्ही निघालो. आता त्याला मायेचे कोणी राहिले नाही. ती जबाबदारी आपली. आम्ही आता त्याला तुमच्या ओटचात टाकतो त्याला सांभाळा-'

शिवबा हेच मुळी प्रजेचे पालनकर्ते होते. त्याला रामदासाच्या ओटचात टाकण्याइतकी रामदासाची पात्रता नव्हती, हा सर्व शिवभक्तांचा व शिवाजीचा रणजितने अपमान करून अक्षम्य गुन्हा केला आहे

'शिवाजी दि प्रॅगमॅटिस्ट' (के. एल् महाल्ये, एम् ए. विदर्भ महाविद्यालय- इतिहास विभाग) लिहितात, 'शिवाजीमहाराजांच्या जीवनावर कथा-कादंबऱ्या लिहून अगर चित्रपट काढून शिवभक्ती दाखविणे हे हास्यास्पद व मूर्खपणाचे होय.'

रियातकार सरदेसाई यांनी दिलेली माहिती- 'रामदासाची व महाराजांची राज्यारोहणापूर्वी गाठही पडली नव्हती व ओळखही नव्हती, हे

पुराव्यानिशी सिद्ध होते– १६५९ नोव्हेंबरला अफझलखानचा वध झाला.

त्यांची प्रेरणा स्वयंभू होती

अफझलखानाच्या वधापूर्वीचे म्हणजे १८ फेब्रुवारी १६५९ चे भास्कर गोसाव्याचे, दिवाकर गोसाव्यास आलेले पत्र उपलब्ध आहे. ते पुढील-प्रमाणे– मी शिवाजी राजेचे भेटीस गेलो होतो. त्यांनी विचारले, 'तुम्ही कोणकोणत्या ठिकाणी असता?' आम्ही रामदासी श्री समर्थाचे शिष्य चाफळास राहतो.' ते कोठे राहतात?' याचा सरळ अर्थ यावेळेपर्यंत शिवाजींना राम-दास हे कोण हे माहीत नव्हते.

पुढे केव्हा तरी रामदास महाराजांची भेट घ्यायला आले असताना रामदास शिवाजींना खालील वाक्य टोचून बोलले, 'तुमचे देशी वास्तव्य केले पण वर्तमान नाही घेतले.' हे स्वत: रामदासच म्हणतात. असे असताना राज्यारोहणाआधी रामदासाची गाठ कादंबरीत लिहून त्यात घालणे किती कृतघ्नपणा!

गोविंद चिमणाजी भाटे म्हणतात, '–शिवाजीमहाराजांनी रामदासाची गांठ पडण्यापूर्वीच स्वराज्याची स्थापना केली होती. तोपर्यंत शिवाजीमहारा-जांनी ज्या संघटना बांधल्या, छापे घातले, लढाया केल्या, किल्ले हस्तगत केले, जगाला थक्क करणारी रणनीती व राजकीय मुत्सद्दिगिरी दाखवली, तिचा व रामदासांचा काडीचाही संबंध नव्हता–'

प्रा. न. र. फाटक म्हणतात, 'शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेची प्रेरणा कोणाकडूनही घेतली नव्हती. परिस्थितीनेच त्यांना प्रेरणा दिली.'

डॉ आंबेडकर चरित्र, कीर, पान १४४– '–रामदासाची सामाजिक भूमिका माणसाची मूल्ये ओळखणारी नसून ती ब्राह्मणांची वर्णवर्चस्वाची नि ब्राह्मण जातीची महती गाणारी होती. रामदासी पंथाचे लोक तर पहिल्या-पासूनच जातीदुराभिमानी व कडवे म्हणून प्रसिद्ध आहेत.'

आचार्य भागवत म्हणतात, '–शिवाजीच्या कर्तृत्वाचा उगम रामदासांकडे आहे, असे म्हणणे निराधार आहे. शिवाजीचे कर्तृत्व पाहूनच रामदासाला राजकीय विचार सुचले, एरवी सुचले नसते–'

डॉ. पवार, कुलगुरु शिवाजी विद्यापीठ म्हणतात, '–शिवाजीमहाराजांना रामदासांची शिकवण होती, ही गोष्ट संपूर्ण निराधार आहे. ज्यांना शिवाजी-

महाराजांचे मोठेपणा खपत नाही व ज्या वर्गाने त्यांच्या हयातीत त्यांना त्रास दिला, तोच वर्ग अद्याप हा उपहासच करीत आहे. रामदासांची शिकवण शिवाजीने घेतली असती तर महाराष्ट्राचे ऐक्य त्यांना केव्हाच साधता आलें नसते–'

रामदास हे शत्रुंचे हेर होते

इतकेच नव्हे तर हिंदुतील ब्राह्मणेतर अस्पृश्यांची एकी घडवून आणता आली नसती. आणि महाराष्ट्राला गुलामगिरीतून मुक्त करतां आले नसते.

वीर उत्तमराव मोहिते म्हणतात, 'रामदास हे शिवाजीचे गुरु तर मुळीच नव्हते. ते आदिलशहा व औरंगजेबाचे हेर होते. नेताजी पालकर मोंगलांच्या छावणीतून गप्तपणे निसटला. आणि साताऱ्यास शिवाजीस भेटला. शिवाजीने त्याला आपल्या अधिकारात हिंदू करून घेतले, हे क्रांतीकारकच कृत्य होय–'

'लोकांच्या त्यावेळच्या समजुतीप्रमाणे राज्याभिषेकाशिवाय राजा नव्हे.' असे असल्यामुळे त्यांनी राज्याभिषेक करवून घेतला. तथापि, शिवाजीनें यापूर्वीच रायगड जिंकल्यावर ते स्थळ राजधानी म्हणून निश्चित केले व तेथे जरूर त्या इमारती बांधावयास सुरुवात केली होती. रायगड राजधानी करावी, हा निश्चय राज्यारोहणापूर्वीच झाला होता परंतु हा विधी समंत्रक यथाविधी करावा व स्थापित राज्यास धर्मराज्याचे स्वरूप द्यावे, राजासही आपल्या प्रजेच्या कल्याणाप्रीत्यर्थ करावयाच्या कृत्यासंबंधी राजाने स्वतःस धर्मबंधनांनी बांधून घेऊन राज्याभिषक विचार व्हावा, हा विचार गागाभटाचा.

त्यानें राजास व राजाने इतरास सांगितला. तो सर्वास मानवला व तसा राज्याभिषेक विधी झाला. अखिल भारतोय विद्वानांत गागाभटास स्थान होते, म्हणून त्याच्या कवीस प्रांतिक किंवा स्थानिकपणा राहिला नाही. (श्री. रा. बि. ओतुरकर)

रामदासांचे कार्य ही कल्पनेची दौड

येथे रामदासांचा कोठेही संबंध येत नाही. पण हे अनेक दुष्टात्म्यांना पहावले नाही व पहावत नाही. ते रामदासाला शिवाजीच्या डोक्यावर नेऊन बसवतातच.

माझा अनुभव. १९२५ सालची गोष्ट. त्यावेळी राजाराम हायस्कूल शुक्रवार पेठेत होते. त्या हायस्कूलचा हेडमास्टर अय्यर नावाचा ब्राह्मण होता. त्याने त्रैमासिक काढले होते. त्यावर चित्रकाराकडून एक चित्र काढून घेतले होते. शिवाजी व रामदास असे. रामदास उभा आहे व शिवाजी नतमस्तक होऊन त्याला प्रणाम करीत आहेत रामदास त्यांना आशिर्वाद देत आहे तो कसा? तर त्यांच्या डोक्यावर हात ठेवून नव्हे, तर पायाचा पंजा मस्तकावर ठेवून! बेशरमपणाची परमावधी!

गुणसागर शिवाजी

हे चित्र नजरेस येताच आमच्या 'हंटर' साप्ताहिकात त्याची भरपूर हजेरी घेतली. बेळगावच्या राष्ट्रवीरचे संपादक शामराव देसाई, पुण्याच्या विजयी मराठ्याचे संपादक श्रीपतराव शिंदे यांनीही खुपच हजेरी घेतली. अखेर अय्यरला माफी मागावी लागली. चित्रपटातही असाच देखावा दाखवला गेला होता. तेव्हा अमरावतीच्या नागरिकांनी तो पडदा फाडून टाकण्यास धाव घेतली. (फुले चरित्र, धनंजय कीर – २५३)

भारतात नवीन युग सुरू करणारा शिवाजी हा एक महापुरूष होता. रामदास शिवाजीचा गुरू आणि मार्गदाता होता. येथपर्यंत ब्राह्मण इतिहासकारांनी इतिहासातले सत्य ताणावे हे योग्य नव्हे रामदास हा चिपळुणकर–टिळक पंथाचा गुरू होता. रामदास रामोपासक होता, तर शिवाजी शिवभक्त होते शिवाजी महाराजांच्या स्वराज्यविषयक कर्तृत्वामुळे समर्थांची सल्ला मसलत नव्हती, तर गुप्तपणे मदतही सुरू होती असे म्हणण्यापर्यंत अर्वाचीन स्वयंभ किंवा संप्रदाय दीक्षित समर्थभक्तांनी मजल मारली अशा तऱ्हेची फारच मोठी कामगिरी समर्थांच्या झोळीत टाकण्याचे कौशल्य, आपल्या कल्पनेची बेफाम दौड मारणाऱ्या अर्वाचान समर्थभक्तांनी दाखवली आहे. समर्थांच्या चाफळ येथील देवस्थानाला जसे शिवाजीचे शत्रु दिनायतराव आणि बाजा घोरपडचाचे साह्य लाभले, तसे मोऱ्यांचेही साह्य मिळावे म्हणून रामदास शिवरायाकडे ये – जा करीत होते.

धनंजय कीर म्हणतात, 'शिवाजी हा आदर्श नेता होता. नेता हा चारित्र्यवान, त्यागी व सदाचारी असला पाहिजे, तरच तो संघटना बांधू शकतो व केडर निर्माण करू शकतो आजचे सर्वच नेते या आदर्शापेक्ष

पोचू शकतील असे नाही. आजच्या या नेत्यांना हे कळले पाहिजे की, राजसत्ता ही स्वतःच्या नातेवाईकांच्या स्वार्थसिद्धीसाठी नसते, तर ती जनतेच्या कल्याणासाठी असते.


शिवाजीमहाराज म्हणजे अथांग गुणांचा सागर. त्यांच्या भूतदया आणि मानवतावादावर लिहावे, नीतीशास्त्रावर लिहावे, रणनीतीवर लिहावे, व्यवहारी जीवनावर लिहावे, ध्येयवाद व्यवहार आणि मुत्सद्देगिरी यावर लिहावे. त्यांचे चरित्र म्हणजे अनेक विषयांचा वस्तुपाठ.

तीनशे वर्षे होऊन गेली तरी शिवनामाची जादू जिवंत आहे.... ती स्फूर्ती देत आहे.

'शिवछत्रपती शिवाजीमहाराज की जय' ही घोषणा कानावर पडताच सारा खेडूत विजेचा धक्का बसल्याप्रमाणे जागा होतो झोपी गलेले वाघ डरकाळ्या देत बाहेर पडतात. शाहीरांचा हात नकळत डफावर पडतो हलग्या वाजू लागतात. रणशिंग फुंकले जाते. पोरे नाचू लागतात. म्हातारे तरुण होतात. मिरवणुकीत भाग घेण्याकरिता स्त्रिया धांदल करतात.

उत्स्फूर्त गाणे अंतःकरणातून बाहेर पडते...

शिवबा ये रे ये ।
राष्ट्ररणी व्हावयास सेनानी
शिवबा ये रे ये ।।



चिरंजीव आमचा शाहुराया

अनुभवी ज्ञाता -

कार्यकर्ता मरत नाही. देह नष्ट होतो केलेले कार्य नष्ट होत नाही. शाहू महाराजाबद्दल थोर शिक्षणाग्रणी विदर्भ नेते पजाबराव देशमुख म्हणतात,

'शाहू महाराजाएवढा थोर पुरुष जन्माला आला नाही. सांस्कृतिक क्रांतीची मुहुर्तमेढ प्रथम शाहू महाराजांनी लावली. छत्रपती शाहू महाराज राजा नव्हता, तो महान् द्रष्टा होता.

कट्टर नास्तिक, धर्मद्वेष्टे अमरावतीचे वीर उत्तमराव मोहिते, छत्रपतीस भक्तीभावे वंदन करतात. "वंदितो जनगणपती । शाहू छत्रपती लोक जागृती । कराया स्फूर्ती । पसरली तव किर्ती । भारती ॥ शिकविला बुद्धीवादातून । कुर्तकोटी हीन । दिला हाकलून । पराक्रमी राया । लागतो पुन्हा मी पाया ।"

मद्रासचे 'जस्टिस पत्र' म्हणते, The Maharaja of Kolhapur the decedent of the great Shivaji was a Prince among men and aman among Princes.

नरसिंह चिंतामन केळकरांनी 'केसरी' पत्राचे रकाने शाहू महाराजांच्या टीकेनें भरून काढले होते. टिळक त्यात सहभागी होते. पण महाराजांच्या निधनानतर हे केळकर लिहितात,'शरीर सामर्थ्य' बुद्धिमत्ता,मुत्सद्देगिरी, मनुष्य स्वभावपरीक्षा, उद्योगप्रियता, मतप्रचाराची हौस जितक्या प्रमाणाने शाहू छत्रपतींच्यात एकत्र आढळली तितक्या गेल्या पन्नास वर्षात दुसऱ्या कोणत्याही संस्थानिकात आढळली असेल असे मला वाटत नाही कोहिनूरसारखा एखादा हिरा दैवयोगानेच एखाद्याच वेळी खाणीत कामगारांच्या हाती लागतो संस्थानिकांच्या खाणीतही शाहूमहाराजासारखा पुरुष यदृच्छेनेच निर्माण झाला असे म्हटले पाहिजे."

कुठं कोल्हापूर संस्थान, कुठं मद्रासचं राज्य! तसा महाराष्ट्राचा वा वा मद्रास राज्याचा काही संबंध नाही. पण महाराजांनी आपल्या सेवेचं साम्राज्य महाराष्ट्र स्थापून कर्नाटकापर्यंत भिडवलं. हुबळी येथे भरलेल्या सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान त्यांनी स्वीकारले होते. लोकांचा एवढा प्रचंड उत्साह व भक्ती की त्यांनी मिरवणुकीचा रथ स्वत:च ओढायला सुरूवात केली : 'मी माणसाचे जनावरे करायला आलो नाही''त्यांनी मिरवणुकीचा रथ माणसांना ओढू दिला नाही.

१९२२ फेब्रुवारी १६ ला दिल्ली येथे अखिल भारतीय अस्पृश्य परिषदेने महाराजांना अध्यक्षपद दिले होते. शिवाजीमहाराजांनी दिल्लीपर्यंत धडक मारून औरंगजेब बादशहाला हादरा दिला तर शाहु महाराजांनी सामाजिक मुलूखगिरी करीत दिल्लीपर्यंत दौड मारली होती. त्यामुळे मुंबई सरकार अस्वस्थ झाले होते. त्यांनी महाराजांना प्रचारासाठी संस्थानाबाहेर जाऊ नये अशी विनंती केली होती. त्यावेळी ते सर सबनीस दिवाणाना म्हणाले : 'सरकार रागावेल असे तुम्ही म्हणता, रागावो बिचारे. गरजवंतांना मदत केल्याबद्दल आणि मराठ्यांचा उद्धार करण्याकरिता माझी शक्ती खर्च केल्याबद्दल लार्ड यांनी तर काय पण खुद्द ब्रह्मदेवाने अथवा यमाने धमकी घातली आणि भ्यालो तर माझे पूर्वज माझ्याकडे पाहून हसतील. भित्र्या भागुबाईप्रमाणे मी माझी मते सोडणार नाही किंवा जीव बचावण्यासाठी शरण जाणार नाही.'

सामान्य सारखे, सरदार सारखे

शाहुराया राजा असूनही त्यांना राज्यपदाचा ताठा नव्हता. ते सामान्यापासून कधीही निराळे झाले नाहीत. गावातील सामान्य माणसांना, अस्पृश्यांना आपल्या चौकडीत बरोबरच्या सीटवर बसवून घेऊन गावातून चकरा मारीत. गर्दीच्या सबबीवर सरदार जहागिरदार यांना रथाच्या पायरीवर उभे करून पेठेतून नेत. पण आत आपल्याबरोबर अरब शहा, रसूल, गोविंदा मांग गणेशाचार्य महार व चौकडीच्या पायरीवर सेनापती कापशीकर, अप्पासाहेब कागलकर, नेसरीकर ही बडी मंडळी उभी असत. नागरिकांना हा समतेचा एक वस्तुपाठ होता.

शेतकरीच माझे मालक

ते शेतकऱ्यांनाच आपले मालक समजत. ते शेतकऱ्यांना म्हणत, 'छत्रपतीची गादी तरी कोणी मिळविली? मावळे वगैरे घोंगडचा शेतकऱ्यांनीच

ना? शेतकरी म्हणवून घेण्याचा मला अभिमान वाटतो. त्यांच्या विषयीचे प्रेम माझ्या धमन्याधमन्यातून खेळत आहे. माझ्याकडून सेवा करून घेण्यास तुम्ही कचरू नका.

अशा या थोर महात्म्याला तत्कालीन ब्रह्मवृन्दानी, सोवळेकऱ्यांनी शूद्र म्हणून हिणवले व वेदोक्ताने धर्मविधी करायला नाकारले.

राजोपाध्ये हा तर महाराजांचा वतनी नोकर. पण त्यांनी वाड्यावरचे धर्मविधी करण्यास नाकारले. जे विजापूरकर इंग्रजी पदवीधर तेही महाराजांचे नोकर. पगार घेत असलेले. पण त्यांनीही वेदोक्ताला मान्यता दिली नाही. उलट समर्थ महाराजांना धमकी दिली. सोवळेकरांनी शिवाशिव होईल म्हणून महाराजांनीच बांधून दिलेल्या शेडच्या आत खुद्द महाराजांनाच येऊ दिले नाही. यातूनच ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वाद सुरू झाला. पुणे कोल्हापूरात वाकुड-पणा आला.

या संदर्भात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी म्हटले आहे. 'शाहू महाराजांच्या जीवनाचा अर्थ ज्या माणसांना कळला नाही त्यांना करंटी माणसे म्हटले पाहिजे. महाराजांना टिळकांचा पाठिंबा मिळाला असता तर वैदिक परंपरेचे वर्चस्व वाढले असते. परंतु तसे घडले नाही हे बरेच झाले.' तसे झाले झाले असते तर शाहू महाराज ब्राह्मणी धर्मांचेच पुरस्कर्ते झाले असते व आम्ही बहुजन समाजीय त्यांना मुकलो असतो!

या वेदोक्तामुळेच महाराजांच्या जीवनात क्रांती घडली. अगदी फडतूस सोवळ्याकरांनी सुद्धा त्यांचा अपमान केला. पण त्याची प्रतिक्रिया मात्र सात्विक झाली. अधर्मनिष्ठेने निर्माण झालेल्या सामाजिक विषमतेकडे त्यांचे लक्ष केंद्रित झाले. दृष्टी अस्पृश्यांच्या जीवनाकडे वळली. एकदा ते बॅरिस्टर केळवकरांना म्हणाले, 'केळवकर संस्थानभर दौरा काढावा आणि प्रत्येक खेचा-तल्या महारवाड्यात जाऊन त्यांची चटणी भाकर खावी. त्यांच्या पोरांना जवळ घ्यावे असं मला फार वाटतंय.'

'असं वाटायचं कारण काय महाराज?'

'त्याचं असं झालं बघा केळवकर. मी एकदा सातारला गेलो होतो. जेवण आम्हा मंडळीसाठीच चाललं होतं. सोवळकरी ब्राह्मणच होते. जेवायची वेळ झाली. मी स्नान करून जेवण कुठपर्यंत आलंय हे पाहण्याकरिता हिंडू

लागलो. बरेचसे हंडे शिजत होते. त्यामधे अंतर बरेच होते. एक अगडबंब सोवळकरी हातावर मांजर घेऊन हिंडत होता. त्यानं मला पाहिलं आणि म्हणाला, 'महाराज इकडून हिंडता येणार नाही आपल्याला. शिवाशिव झाली म्हणजे साराच घोटाळा उडून जाईल.'

'हे शब्द कानावर पडताच माझं काळीज चिरल्यासारखं झालं! त्या मांजरापेक्षाही मी हीन दर्जाचा! मी छत्रपती असूनही माझा असा अपमान होतो, तिथं अस्पृश्यांना कोणती वागणूक मिळत असेल? म्हणून मला वाटतं त्यांच्यात जावं. त्यांच्या पोरांना जवळ घेऊन जेवावं'

या प्रसंगाने महाराजांच्या जीवनात पालट घडून आला. ते आत्मोपम्य दृष्टीने अस्पृश्यांचे जीवनाकडे पाहू लागले. अस्पृश्यांच्या अंतर्मनात त्यांनी प्रवेश केला. अपमानाची प्रतिक्रिया सात्विक झाली. महाराज अस्पृश्यांच्या दुःखांशी समरस होऊ लागले. विचाराबरोबर आचाराला चालना मिळाली. ते निव्वळ बोलके पुढारी नव्हते. अस्पृश्यता पाळू नका असा निव्वळ उपदेश करून स्वतः मात्र सोवळे राहिले नाहीत. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अनेक उपाव :

त्यांनी अस्पृश्यांना जवळ घेतलं. आपल्या घोड्याच्या उघड्या खड-खड्यात घेऊन हिंडू लागले मिरवणुकीच्या हत्तीचा माहुत अस्पृश्य ठेवला. त्याला सोन्याच्या अंबारीपुढे बसवला. अस्पृश्य बांधवाला मोटार ड्राय-व्हिंगच्या कोर्सला पाठवून महाराणीसाहेबांच्या अक्कासाहेब महाराज व युवराजांच्या मोटारीवर ठेवले. आपल्या पंक्तीत महार, मांग, चांभार, मुसल-मान ह्यांना घेऊन जेऊ लागले. काहींना दरबारात सरकारी अंगरखा, तरवार पट्टा व जरीचा फोटो देऊन सरदार व मानकऱ्यांच्या रांगेत नेऊन बसवले. त्यांना स्वतःचे शरीर संरक्षक म्हणून नेमले. थोडेसे शिक्षण झालेल्या अस्पृश्य बांधवांना कारकून व रजिष्ट्रारच्या जागा दिल्या. डॉक्टरी कोर्ससाठी काहींना मिरजेला पाठवून देऊन, वाड्यावर व पर्सनल डॉक्टरही अस्पृश्यच नेमले. त्यामुळे सर्वांना त्यांच्याकडून औषध घेणे भाग पडले. फिरतीवर स्वतःबरोबर अस्पृश्य डॉक्टरला घेऊन जाऊ लागले. अस्पृश्यांना वकिलीच्या सनदा दिल्या. कायद्याच्या उच्च ज्ञानाची फारशी जरूरी लागत नाही अशा जमिनीच्या केसेस आपणच त्यांचेकडे पाठवून त्यांना तसे मिळवून दिले. अशा अस्पृश्य बांधवांपैकी एकाला, गणाचार्याला माझ्या वडिलांकडे खंडेराव बागल बी. ए. एल. एल.बी. कडे कायद्याचे ज्ञान घेण्याकरता पाठवून दिले. त्यांचा तो सल्ला घेत असे. अस्पृश्य म्हणून ओळखू येणारी अस्पृश्यांची आडनावे बदलून ती खानदानी

हौदावर कांबळे पाणी पित आहे हे हौदावरील नोकरांच्या नजरेस येताच ते त्याच्या अंगावर धावून गेले व त्यांनी त्याची पाठ चाबकाने फोडून रक्तबंबाळ केली. कांबळे तसाच महाराजांकडे गेला व त्याने महाराजांना आपली पाठ दाखविली. बरोबर काही अस्पृश्य मोतदारही होते. महाराज त्याची रक्ताने भिजलेली पाठ पाहून गोरे–मोरे झाले. ज्यांनी मारलं त्या सर्वांना महाराजांनी बोलावलं. गंगारामच्या समोर उभं केलं व त्यांची पाठ स्वत: महाराजांनी चाबकाने फोडून काढली. कांबळेला नोकरीतून मुक्त केलं व चहा फराळाचे दुकान काढून दिले. त्या दुकानासमोर चौकडी उभा करून महाराज स्वत: रोज चहा–फराळाचं घेत व इतरांना देत. हे दृश्य शेजाऱ्यांनी पाहिलं व तेही त्या दुकानात जाऊन चहा–फराळ घेऊ लागले.

अस्पृश्यतेबद्दल वटहुकूम :

मनात सारखे घोळत असलेले विचार महाराजांनी प्रत्यक्ष अंमलात आणले. त्यांनी सार्वजनिक जागा, पाणशेत, धर्मशाळा, रेस्ट हौसींस, नदीचे पाणुते, सार्वजनिक विहिरी, येथे कोणच्याही मनुष्यप्राण्याचा विटाळ मानावयाचा नाही असा वटहुकूम काढला. अस्पृश्य लोकांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा असताना त्या सर्व बंद करण्यास सांगितले. आणि सर्व जातींच्या व धर्माच्या मुलांना व अस्पृश्यांच्या मुलांना एकत्र बसवण्यास सांगितले. सरकारी दवाखान्यांत इतरांप्रमाणेच अस्पृश्यांची सोय व्हावी असा नियम केला. खेडचावर कुलकर्णी हाच सर्व सत्ताधीश होता. त्या ठिकाणी पगारी तलाठ्यांच्या नेमणूका केल्या.

कामगार राज्याची जाणीव :

मुंबईस भरलेल्या कामगारांच्या सभेत महाराजांनी समाजवादी विचार मांडले. 'इंग्लंडमध्ये आता मजूर पक्ष अधिकारावर आला आहे. जगभर हे वारे आता वहात आहे, हे जाणून तुम्हीही आपल्या चळवळीची दिशा आखा असे त्यांनी सांगितले. भारतात कम्युनिष्ट पक्ष स्थापन होण्यापूर्वीची ही महाराजांची भाषा आहे. '–येथेही इंग्लंडप्रमाणे मजुरांचे संघ झाले पाहिजे. सर्वांस आपले हक्क काय आहेत हे कळले पाहिजे. जेथे भांडवलवाल्या ब्राह्मण व वैश्य वृत्तीच्या लोकांचाच भरणा विशेष आहे, त्यांना दाबात ठेवल्याशिवाय मजुरांची उन्नती होणार नाही–' म्हणूनच धनंजय कीरांनी लिहिले आहे. '१८१७ साली लेनिनने केलेले भाषण व परेल येथे शेतकऱ्यांच्या मेळाव्यात शाहू महाराजांनी केलेले भाषण यांत साम्य आहे.'

मूर्तीपूजा व महाराज :

अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद नागपूर ३० मे १९२०. त्या काळात मनुष्याच्या बुद्धीस नीचपणाप्रत नेणारी मूर्तीपूजा फार वाढली. तीर्थाचे काल्पनिक महत्त्व वाढवण्यात आले होते. त्यामुळे तीर्थाच्या ठिकाणच्या नामधारी पुरोहितांना द्रव्यप्राप्तीही फार होऊ लागल्यानें त्यांच्यात आळस व दुर्व्यसन वाढली. मनुष्य उपजल्यापासून तो मरेपर्यंत त्याच्याकडून निरनिराळ्या रूपानें पैसे मिळण्याकरिता व्रते, दाने वगैरे विषयीचे ग्रंथ तयार केले गेले. इतकेच नव्हे, तर मेल्यावरही मृतास पोचवण्याकरता म्हणून श्राद्ध, म्हाळ, दान मिळावे, याकरता गरूड पुराणासारखे गारूडी ग्रंथ तयार केले होते. फल ज्योतिष शास्त्र वाढवून निरनिराळ्या ग्रहांची भीती घालून पैसे उपटण्याच्या युक्त्या निघाल्या. अमुक दिवस वाईट, अमक्या दिवशी प्रवास करावा, लग्न अमुक मुहूर्तावर करावे अशी थोतांडे काढून अनेक वेडगळ समजुतींचा पगडा जनमानसावर बसवला गेला. आणि हाच आपला धर्म अशी सर्वसामान्य अज्ञानी बहुजन समाजांची समजूत करून देण्यात आली.

पण महाराज या सर्व जंजाळातून बाहेर पडले होते. मृत्युपूर्वी दोनच वर्षे त्यांनी जाहीर केले की, अगोदर 'आम जनतेला शिक्षण द्यावे. स्वत:चे जीवनमान उंचावण्याला तिला उद्युक्त करावे व सर्व अंधश्रद्धा नष्ट कराव्यात आणि जिच्यामुळे समाजात एक विलक्षण कृत्रिमता आली आहे. त्या विषमतेची कारणेच समूळ नष्ट करावीत, या हेतूने इतकी वर्षे मी जिद्दीने सतत प्रयत्न करीत आलो आहे. हे काम सोपे नाही. लहान-सहान नाही. जाडच्या गतीहीनता दूर करावी लागणार आणि जुने पार बदलावे लागणार.'

महाराजांची कृतज्ञता बुद्धी व उपकारांची जाणीव :

पुण्याला सूडबुद्धीने, महाराजांची बेअब्रू करण्याकरिता, महाराजावर मारामारीची फिर्याद केली गेली. केस सुरू झाली म्हणजे इतर आरोपीप्रमाणे त्यांना कोर्टासमोर उभे रहावे लागणार होते व शिक्षा झाली, तर महाराजांची भारतात बदनामी होणार होती.

आपल्यावर पुण्याच्या कोर्टात केस चालणार तेव्हा काय करावे म्हणून सल्ला घेण्याकरता कोल्हापुरातील नामांकित वकीलांना महाराजांनी सोनतळीवर बोलावून घेतले. त्यावेळी मुक्काम कोल्हापूर जवळ सोनतळीवर होता. माझे वडील खंडेराव गोपाळराव बागल बी. ए. एल.एल. बी. हे पहिल्या दर्जाचे वकील होते. इतर निमंत्रित वकिलांनी महाराजांना सल्ला दिला की,

महाराष्ट्रातील पहिल्या दर्जाच्या वकिलांना व युरोपियन बॅरिस्टरांना केस चालवण्यास बोलवावे. वडीलांनी सुध्धता पाळली तेव्हा महाराज म्हणाले, 'बागल, तुम्ही स्वस्थ का बसलात? तुमचा सल्ला काय आहे?' वडील म्हणाले, 'महाराज, विचार करून उद्या सांगतो.'

घरी आल्यावर वडिलांनी सम्राट बादशहानी संस्थानिकांशी केलेले करार वाचले. त्यात बादशहांच्या संमतीशिवाय संस्थानिकांवर भारतातल्या कोणत्याही कोर्टात केस घालता येणार नाही. संस्थानिक हे बादशहांचे मांडलिक आहेत असे वाचले. या नंतर वडिलांनी सोनतळीस जाऊन महाराजांची गाठ घेतली व त्यांना सांगितले, 'महाराजांना केस चालवण्याची मुळीच आवश्यकता नाही. साम्राज्य सरकारच्या खास परवानगीशिवाय आपल्यावर कोणासही कोर्टात केस चालवता येत नाही.' अखेर वडिलांच्या मताप्रमाणेच कोर्टाने निकाल दिला. ही केस आपल्या कोर्टाच्या कक्षेबाहेरची आहे. म्हणून न्यायाधीशांनी काढून टाकली.

केसचा निकाल रात्री बाराच्या सुमारास तारेने कळवला गेला. तो कळल्यावर महाराज आपल्या चौकडीतून शुक्रवार पेठेतील आमच्या घरापुढे आले व मोठ्याने 'बागल' म्हणून त्यांनी हाका मारायला सुरवात केली. आम्ही सर्व माडीवर झोपलो होतो. हाकेमुळे वडील खडबडून जागे झाले व खाली पाहिले तो छत्रपती शाहू महाराज गाडीत ! वडील धावत खाली गेले. व जमिनीपर्यंत लवून मुजरा केला. महाराज हर्षभराने म्हणाले, 'बागल तुमच्या म्हणण्याप्रमाणे झालं. कोर्टाने मी राजा असल्यामुळे, आपल्या कोर्टात केस चालवता येत नाही, असं म्हणून केस काढून टाकली. बागल मी उद्या गाडी पाठवतो. सोनतळीस या.'

महाराजांच्या आज्ञेप्रमाणे वडील सोनतळीस गेले. महाराज वाट पाहातच होते. वडिलांनी पुढे होऊन महाराजांच्या पायाला हात लावून नमस्कार केला. जवळच शिवाजी महाराजांचे कुटुंब इंदुमती राणीसाहेब उभ्या होत्या. त्यांच्याकडे पाहून महाराज म्हणाले, 'अग पाहतेस काय ! बागलांना नमस्कार कर. त्यांनी मला संकटातून वाचवले. माझी अब्रू राखली.'

'महाराज आम्ही आपल्या पायाचे नोकर इंदूमती देवींना नमस्कार कर असे सांगू नये आपण.'

'का सांगू नये ? मी छत्रपती असलो तरी माणूसच आहे. तुमचे उपकार मी कसे विसरेन ?'

घरी आल्यावर सर्वांना ही गोष्ट सांगून वडील कृतज्ञतेने गहिवरून अश्रू गाळू लागले. आजही महाराजांची आठवण झाली की; त्यांचं व्यक्तिमत्व नि कर्तृत्व आठवून डोळे आदराने पाणावतात. आणि धनंजय कीरांनी लिहिलेले शब्द आठवतात. 'छत्रपती शाहू महाराजांनी आपल्या राज्यात मानवी स्वातंत्र्याची घोषणा केली. पददलितांची गुलामगिरीतून मुक्तता केली. लोक-नेता असून राजर्षी असणारा आणि जनसागराच्या लाटेवर आरूढ होऊनही राजवैभवात विलसणारा शाहू छत्रपतीसारखा राजर्षी दुर्मिळच. लोकशाहीचा पाया भक्कमपणे भरणारा हा नव्यायुगातील राष्ट्रपुरुष होता. ज्ञानाची ज्योत सर्व महाराष्ट्रातून पेटती ठेवणारा हा ज्ञानदीप होता. कामगार राज्याचे स्वप्न पाहणारा हा लोकनेता होता. सहकारी तत्वाचा उद्‌गाता होता.' ♠

मराठ्यांच्या आडनावासारखी केली. गावात नष्टांशाची जागा पडल्यास ती अस्पृश्यांना देऊन अस्पृश्यांची वस्ती गावात आणली. कागल शहरातील मांग जातीच्या अस्पृश्य बांधवांना राजारामपुरीत शाहू मिलजवळ वसाहत घालून दिली. या वसाहतीतील आया बायांच्या पोटापाण्याची सोय शाहू मिल–मध्ये नोकरीस लावून केली. काहींना घोड्यावर बसण्यास शिकवून 'जॉकीज' तयार केले व हजारो रुपये मिळवून दिले. शहर म्युनिसीपालिटीतल्या चेअर–मनची जागा डी. एस्. पवार या चांभार जातीच्या बांधवास दिली. प्रौढांना व मुलांना साक्षर करण्यासाठी स्टेशन बंगल्यावर शाळा काढून त्यांच्या खाण्या-जेवण्यांची तेथेच सोय केली.

महाराजांचा ठसका :

महाराजांच्या डोक्यातून स्पृश्य–अस्पृश्य हा भेद नाहीसा झाला होता पण नोकर लोकांच्यातून तो गेला नव्हता. सोनतळी कँपात पाण्याची स्पृश्यां–नाच टंचाई होती. हौद एकच होता एका महार महिलेने डोळा चुकवून त्या हौदावर आपली घागर भरली. तो दृष्टोत्पत्तीस येताच नोकरांनी त्या बाईला घागरीसकट महाराजांससोर उभी केली. तिचे हे धाडस पाहून महाराज तिच्या-वर भयंकर उखडले व सर्वांसमक्ष तिच्यावर भडीमार केला. इतका की त्यामुळे त्यांना एकदम ठसका आला! जीव कासावीस झाला अरे पाणी आणा' म्हणून महाराज ओरडू लागले. तेव्हा त्यातल्याच एका नोकराने त्याच घागरीतले पाणी पेल्यात ओतून महाराजांच्या हातात दिले. ते महाराज घटाघटा प्याले व सुटकेचा श्वास टाकून म्हणाले, 'लेको तुम्हीच मला त्या महारणीच्या घागरीतले पाणी पाजलात आणि तुम्हीच तेवढे शुद्ध राहिलास व्हय?' हे शब्द ऐकताच सर्व नोकरांनी त्या महार महिलेची घागर 'मी तू' करून महाराजांच्या देखतच संपवली.

सहभोजन :

महाराज शिकारीस गेले होते. त्या जंगलात बेरडांची तुरळक वस्ती होती. त्यांनी आपल्या झोपड्या मुद्दाम अंतराअंतरावर बांधल्या होत्या. पोलिसांच्या छापा आल्यास इतरांना पळ काढता यावा. त्याकाळी मांग, बेरड या गुन्हेगार जाती म्हणून समजल्या जात होत्या. गुन्हा केला असो वा नसो जवळच्या गावी चावडीत जाऊन त्यांना रोज हजेरी द्यावी लागे, हा त्या जातीवर मोठा अन्याय होता. (पुढे महाराजांनी काढून टाकला.) शिकारीस आलेले महाराज थकून भर वस्तीत एका झाडाच्या पारावर बसले.

सभोवार हाकेवाले व सरकारी नोकर बसले होते. कँप दूरवर होता. बरोबर फराळाचे काही घेतले नव्हते, दाट जंगलात व आसपास कोणी माणूस अगदी झोपडी दिसत नव्हती. काही वेळाने तेथे एक माणूस टेहळणी करीत असल्याचा दिसला. तो कोणी चोर दरोडेखोर आहे असं न दाखविता महाराजांनी ओरडून त्याला हाक मारली. 'अरे कोण आहे रे तिकडे? अरे शिव्या बेरड असला तर त्याला म्हणावं शाहू छत्रपती तुला जरा बोलावतोय. शिव्याच्या कानावर महाराजांचा ओळखीचा आवाज पडताच तो धावत आला. महाराजांच्या पायावर डोकं ठेवलं. हात जोडून उभा राहिला व म्हणाला, '–काय हुकूम आहे महाराज?' '–शिव्या मला फार भूक लागली.आरं काय कोरडचास असलं तर आण–'

महाराज बेरडाच्या घरचं कोरडचास मागताहेत असं समजताच सारे हुरळून गेले. जो तो आपल्या खोपटाकडे धावत गेला. मिळेल ते घेऊन आला. कोणी चटणी, भाकर, दही, ताक, आंबील, कोणी अंडी शिजवून आणली. महाराजांनी त्या प्रत्येकाने जे आणले त्यातले थोडं थोडं खाऊन उरलेलं सर्वांना वाटून दिलं. महाराजांनी स्वत:च बेरडाचं अन्न खाल्ल्यावर 'मला नको' असं म्हणण्याची कोणाचीच छाती झाली नाही. शेजारगावच्या आलेल्या हाक्यांनी सुद्धा त्या सहभोजनात भाग घेतला. जेव्हा महाराज परत निघाले, तेव्हा शिव्याला म्हणाले, 'शिव्या तू माझ्याबरोबर चल–' पुढे त्यांनी शिव्याला आपला शरीरसंरक्षक नेमला व बेरडांची हजेरीचा वटहुकूम काढून रद्द केला.

देशभक्त महार :

वाडचावरचा एक महार घोडेवाला फार देवभक्त होता. नेहमी एक तारीवर भजन करीत असे. त्याला महाराजांनी नोकरीच्या जबाबदारीतून मुक्त केले,पण त्याचा पगार चालू ठेवला. इचलकरंजीकरांच्या बंगल्यावरून एक वाट बावडे बंगल्याला व एक न्यू पॅलेसला जाते. त्या नाक्यावर महाराजांनी त्या देवभक्ताला झोपडी बांधून दिली. जेवणाचे ताट त्याला रोज वाडचावरून पोचते करण्याचा हुकुम दिला. तेथे तंबाखुची धुणी नेहमी पेटलेली ठेवली. बावडचाच्या लोकांची व वाडचावर येणाऱ्या जाणाऱ्यांची तीच वाट. सर्वांची ती एक विश्रांतीची जागा झाली. आता या महार बंधूंच्या चिलमीची ओली छापी तोंडाला लावून जो तो झुरका मारून जात होता.

गंगाराम कांबळे :

गंगाराम कांबळे वाडचावर मोतदार होता. एकदा आपले जेवण झाल्यावर तो पाणी पिण्यासाठी हौदावर गेला. तो हौद स्पृश्यांचा होता. त्या

राजकीय क्षेत्रात –

'अशी होती संस्थानी राजवट'

'दक्षिण महाराष्ट्रातल्या आणि विशेषतः कोल्हापूर संस्थानामधल्या प्रजेने जुलमी राजेशाहीपासून स्वतःला मुक्त करण्यासाठी जो घनघोर संग्राम केला, त्याचे सेनापती भाई माधवराव बागल हे होते. संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्यासाठी माधवरावांनी आपली उभी हयात खर्ची टाकली आणि त्यात आपल्या सर्वस्वाचे बलिदान केले. म्हणून दक्षिण महाराष्ट्रातली ही संस्थाने धुळीस मिळाली आणि लोकशाहीचे झेंडे त्यांच्यावर दिमाखाने फडकू लागले.

संस्थाने हा भारतमातेच्या देहावरचा एक भयानक महारोगच होता. संस्थानातल्या प्रजाजनांना ज्या अनन्वित नरकयातना भोगाव्या लागत होत्या, त्याची कल्पना त्यावेळी खालसा मुलखात राहणाऱ्या जनतेला येणे अशक्य होते. जुलमी संस्थानिकांच्या राजवटीत प्रजेचे प्राण, अब्रू, संपत्ती आणि संसार यापैकी एकही गोष्ट सुरक्षित नव्हती. त्याकाळी हिंसा श्वापदांनी, सर्पांनी आणि गिधाडांनी व्यापलेल्या एखाद्या जंगलात राहणे जास्त सुरक्षित झाले असते. संस्थानी अत्याचाराच्या ज्या एक एक भयानक कथा माधवरावांनी ह्या कथा–संग्रहात सांगितलेल्या आहेत, त्या वाचून रक्ताला उकळ्या फुटतात आणि मेंदूच्या अक्षरशः चिंधड्या उडतात.

दक्षिण महाराष्ट्रातल्या संस्थानी जनतेने अत्याचारी राजेशाहीविरुद्ध हे जे बंड पुकारले त्याच्या अग्रभागी भाई माधवराव बागल हे असल्याने त्यांनी लिहिलेल्या हचा गोष्टी म्हणजे संस्थानिकांच्या अमानुष अत्याचारातून जनतेच्या स्वातंत्र्याच्या चळवळीचा कसा उगम झाला आणि त्याचे पर्यवसान ही संस्थाने नष्ट होऊन त्यांचे विलीनीकरण स्वतंत्र आणि लोकशाही भारतात कसे झाले हा त्यांच्या स्वानुभवाचा इतिहास आहे असे म्हणायला हरकत नाही.

माधवराव हे जातिवंत कलावंत असल्याने, त्यांच्या लेखणीशी त्यांच्या कुंचलीचा मेळ होऊन त्यांनी रंगवलेल्या हचा शब्दचित्रामध्ये शब्दापेक्षा विविध ठळकपणा जास्त उमटलेला आहे. त्यामुळे संस्थानी अत्याचार मूर्तिमंत डोळचापुढे उभे रहातात आणि वाचताना मस्तक भणाणून जाते. आणि सर्वांगाची लाही लाही होऊन जाते. परतंत्र भारतातील संस्थानिक हें किती राक्षसी पशू होते, त्याचे भयानक दर्शन उपलब्ध करून देणारा हा माधवराव बागलांचा कथासंग्रह भारतीय वाङ्मयात तरी अपूर्व आहे. तो वाचल्यानंतर संस्थाने नष्ट करण्यात लोकशाहीनें केवढा विजय मिळवला हे लक्षात येईल. संस्थानी जनतेच्या लढचात माधवरावांनी स्वतःस जाळून घेतले. त्या वेळच्या त्यांच्या निवासातल्या निखाऱ्याची धग हचा कथांच्या ओळीओळीमधून चटके देते. अनुभवाच्या अंगारातून असे ज्वलंत आणि जिवंत वाङ्मय निर्माण करणाऱ्या माधवरावांचे लोकशाहीवर अनंत उपकार आहेत.'

शिवशक्ति
ता. १३ ऑगस्ट १९६४

प्रल्हाद केशव अत्रे
(अशी होती संस्थानी राजवट : प्रस्तावना)

राजकीय पुढारी माधवराव बागल

'राजकीय चळवळीत पडण्यापूर्वी माधवरावांनी खादी प्रचाराला सुरुवात केली. त्यांनी 'महात्माजींची कामधेनू' हे त्यावर पुस्तक लिहिले. खादीवरची श्रद्धा लोकांना पटवण्यासाठी इस्लामपूरच्या एका सभेत स्वतःस ७-८ शे रुपये किंमतीचे कपडे व शाहू महाराजांनी दिलेला भरजरी मंदिल, सर्जचा उंची सूट जाळून टाकला ....

आयुष्यभर कर्तृत्वाच्या कुंचल्याने चित्रे रंगवली, ती हरिजनांच्या उद्धाराची.

शेतकरी आणि मजूर यांची उन्नती कोल्हापूरात १९४० च्या आगेमागे शेतकऱ्यांचे प्रचंड मोर्चे काढून आणि कामगारांच्या विविध संघटना उभारून केली.

माधवरावांनी पत्नीचे आजारीपण पाहिले नाही. मुलाच्या लहानपणाकडे पाहिले नाही.

राजाराम महाराजांनो 'तुला काय हवे ते माग' असे विचारले. त्याच दिवशी माधवराव माझ्याकडे आले होते. दुसरे दिवशी आले नाहीत. त्यांना

अटक झाली होती. माधवरावांना कितीवेळ तुरुंगात जावे लागलं हे त्यांनासुद्धा सांगता येणार नाही.

करवीर इलाखा खादी संघाच्या अध्यक्षापासून ते दक्षिणी संस्थानच्या प्रजापरिषदेच्या अध्यक्षापर्यंत आणि तेथून संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीच्या नेतृत्वापर्यंत आपण कुठे कुठे अध्यक्ष झालो तेही चटकन सांगता येणार नाही, बहुजन समाजाच्या पायातल्या बेड्या, त्याचे स्वरूप धार्मिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक व दुसरे कोणतेही असो तोडण्याकरता झगडायचे! या झगडचात स्वत:च्या पायात बेड्या पडल्या तर त्यांना त्याची कधीच फिकीर वाटली नाही. कोल्हापुरातल्या सुंदर दृश्याची चित्रे काढण्याकरता हातात कुंचला घेऊन तो रंगात बुडवणाऱ्या या हळुवार मनाच्या कलावंताला, पायात बेड्या, अंगात जाडी भरडी बंडी आणि डोक्यावर तशीच टोपी घालून हातात खराटा घेऊन कोल्हापूरातले रस्ते झाडावं लागले! उलट संस्थानी अंमलात कैदी म्हणून सरकारी पाहुणचार स्वीकारणारा हा स्वातंत्र्याचा निस्सीम सेवक त्याच संस्थानचा मुख्यमंत्री या नात्याने सरकारी पाहुणचार घेऊ लागला.'

वि. स. खांडेकर
(किर्लोस्कर १९५६)

जीवनप्रवाह (आत्मचरित्र) माधवराव बागल

धनंजय कीर :

आपले आत्मचरित्र वाचले. अतिशय आनंद झाला. मराठी आत्मचरित्र-वाङ्मयात एका प्रभावी, प्रतिभाशाली नि आत्मनिरीक्षणनिष्ठ आत्मचरित्राची भर पडली. आपल्या मनाच्या आणि पराक्रमाच्या उत्कर्षांचा तो प्रतिभेने नि देशभक्तीने रसरसलेला तो इतिहास आहे.

दत्तो वामन पोतदार :

तुमच्या जीवनप्रवाहात जाग्रण करून स्नान केले. बंधनातही पडलो. आणि कंटाळा कसला तो आला नाही. तुमची लेखणी हाडाच्या कलावंताची आहे. तेथे झोपेला अवकाश कुठला! जनतेने जी अपूर्व साद तुम्हाला दिली तिचे भावपूर्ण वर्णन तुम्ही जागजागी केले आहे. ते जिवंतसे वाटले? वाचताना मला.

वि. स. खांडेकर :

माधवरावांचे मोठेपण मी एकाच गोष्टीत मानतो. सुखवस्तू किंवा संधिसाधू पुढारीपणाचा अवलंब त्यांनी कधीच केला नाही. गुलामगिरीची, मग ती धार्मिक रूढीची असो वा संस्थानी सरंजामशाहीची असो, त्यांना तिची उपजतच चीड आहे. त्यांच्या कलावंत मनाने हा स्फुलिंग फुलवला. त्याची ज्वाला झाल्यावर ती आपल्याला भाजून काढील प्रसंगी जाळून टाकील या कल्पनेने ते कधीही कचरले नाहीत. ज्या ज्या अन्यायाने त्यांना व्यथित केले आणि संतप्त केले त्यांच्या त्यांच्याशी टक्कर देण्याकरता ते उभे राहिले. ही टक्कर साध्या भितीशी आहे की, प्रचंड खडकाशी आहे याचा त्यांनी विचार केला नाही. ही समर्पित जीवनाची वृत्ती त्यांच्या विरोधकांना सुद्धा वंदनीय वाटेल.

केशव सिताराम ठाकरे :

२५–३० वर्षाचा कोल्हापूर संस्थानचा हा जिवंत इतिहास आहे. माधवराव बागलांनी तो जिवंत वाणीने सांगितला आहे. त्यातील अनेक रोमांचकारी घटनांचे साद नि पडसाद त्या घडीला पाहून, ऐकून नि वाचून थरारलेली, चिडलेली, संतापलेली व्याकूळ अथवा हर्षभरित झालेली जनता आज महाराष्ट्रात आहे.

लोकमान्य : (अग्रलेखात)

कोल्हापुरात माधवरावांनी जो स्वातंत्र्याचा झेंडा उभारला तो सिंहाच्या गुहेत शिरून सिंहाची दाढ हिसकण्याच्या प्रयत्नासारखा धाडसी प्रयत्न होता. माधवरावांनी आपल्या भावनापूर्ण अंतःकरणानुसार राष्ट्रीय स्वातंत्र्य व लोकशाही यासाठी सतीचे वाण पत्करले आणि नाना यातना सोसून दक्षिण महाराष्ट्रात त्याग व सेवा याची स्फूर्तिज्योत निर्माण केली. दक्षिण महाराष्ट्रातील अलिकडच्या राजकीय व सामाजिक जागृतीच्या इतिहासात माधवराव बागलांचे नाव पूजनीय आणि अमर राहील.

श्री. रा. टिकेकर :

तुमच्या जीवनप्रवाहात तुम्ही आपले जीवनसर्वस्व ओतले आहे.

इंग्रजी वाक्प्रचार वापरायचा तर तुम्ही ते आपल्या रक्तानें लिहिले आहे. असे म्हटले पाहिजे काही छाप्पं नाही, छप्पं नाही. खाजगी नाही, आडपडदा नाही. इतक्या मोकळेपणाने लिहिलेले आत्मचरित्र माझ्या तरी पाहण्यात नाही. त्या प्रवाहाला काय वेग आला म्हणून सांगू ! इतका तद्रुप मी कुठल्याच पुस्तकात झालो नाही.

कॉम्रेड एस्. एस्. मिरजकर

(सेक्रेटरी कम्युनिस्ट पार्टी महाराष्ट्र व व्हा. प्रे. ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस.)

प्रिय कॉम्रेड माधवराव,

महाराष्ट्राच्या राजकारणातील प्रमुख व्यक्तीनी लिहिलेली जी काही थोडी आत्मचरित्रे उपलब्ध आहेत, त्यात आपल्या लिखाणाने उत्कृष्ट अशी भर टाकली आहे. आपल्याकडे चरित्रे पुष्कळाची आहेत पण आत्मचरित्रे फारच थोडी. त्यात स्वतःचे खरे दर्शन लोकांना होऊ नये हीच इच्छा बलवत्तर होऊन आडपडद्याची भाषा. म्हणूनच आत्मचरित्र मला विशेष आवडले. सुरुवातीपासून शेवटपर्यंत जणू काही माधवराव बागल वाचकांना आपला जिवलग मित्र मानून मनमोकळेपणाने त्यांच्याशी बोलत आहेत. असा भास ते वाचताना होतो.... स्वतःचे खासगी जीवन, अनेक प्रसंगी मनात उडालेली खळबळ व हेलखावे यांच्यासहित आत्मचरित्रात आपण मांडले आहेत व जनतेशी खरोखर एकरूप झाल्याची साक्ष दिली आहेत, याबद्दल अभिनंदन केले पाहिजे.

राजकारणाला व श्रमिक जनतेच्या लढ्याला वाहून घेतलेल्या आपल्यासारख्या व्यक्तीचे आत्मचरित्र म्हणजे एका व्यक्तीच्या जीवनाचा इतिहास नसून कोल्हापुरच्या जनतेने ब्रिटिश व संस्थानी राजवटीत स्वतःच्या लोकशाहीच्या हक्कासाठी व पिळवणूक–जुलमाविरुद्ध दिलेल्या लढ्याचा इतिहासही त्यात बेमालुम गुंफलेला आहे. महाराष्ट्रातील राजकारणाच्या प्रत्येक अभ्यासकाच्या दृष्टीने हे आत्मचरित्र त्यामुळें महत्त्वाचे आहे.

सभा– स्वातंत्र्याच्या हक्कापासून ते लोकशाहीसाठी व कामगार–किसानाच्या नेतृत्वाखालील राजवट स्थापण्याच्या जाणिवेपर्यंत कोल्हापूरच्या जनतेची चळवळ कशी वाढत गेली. त्याची उत्कृष्ट ओळख या चरित्राने होत.

जुलूम (कथासंग्रह) भाई माधवराव बागल

The Maratha, Poona—

Every one of his story has a tale to tell. His fiction is grim fact. His stories are stark realities. His satire is a lash of sccorpion. His shocks us into a sudden and vivid realisation that something is wrong in the state of our society. His book is a noble contribution to the literature of human against inhuman injustice. His style is simple, direct and natural.

सकाळ :

या प्रकाशनात अनेक जुलुमांची हृदयविदारक चित्रे ग्रथित केली आहेत. जणुकाय दिवसा ढवळ्या चाललेल्या जुलुमांचा रक्तरंजित चित्रपटच ते आपणास दाखवत आहेत. वाङ्मयातील मुक्या खेडुतांचा दुभाष्या–त्यांचा लेखकही बागलांना प्रिय असलेली खिरापत तर त्यांना लाभेलच पण प्रामाणिक व स्पष्ट नवे विचार मांडून नवयुग निर्माण करणाऱ्या विचारवंतांच्या श्रेणीत त्यांना मानाचे स्थान निःसंदेह लाभेल. (चौथे चित्र) मराठी कथा वाङ्मयात चिरस्थान मिळतील यात शंका नाही.

संसार – भाई माधवराव बागल

अभिप्राय – मामासाहेब उर्फ भा. वि. वरेरकर

लेखन पथ्यकर व्हावे, गुणकारी व्हावे, रोगहारी व्हावे असे ज्याला अंतःकरणपूर्वक वाटत असेल त्याने सुबोध भाषेने आपली वाङ्मयाची मांडणी करण्याची कला हस्तगत केली पाहिजे. कुठल्याही कलाविलासाची लेखनाला जर आवश्यकता असेल, तर ती याच. ही अत्यंत कठिण कला माधवरावांना साधली आहे. त्यांनी सुंदर आणि परिणामकारक वाङ्मय निर्माण केले आहे. पांढरपेशे वर्गाला अपरिचित झालेल्या समाजाची कुणालाही सहज कळेल अशा सुबोध भाषेत काढलेली प्रचारात्मक चित्रे निर्माण करण्याचे जे अद्वितीय कार्य माधवरावांनी सुरू केले आहे ते वाखाणण्याजोगे आहे यात शंका नाही. विपुलते-

बरोबर वैचित्र्य साधणे काही सोपे नाही. पण ते दुष्कर कार्य करून माधवराव यशस्वी झाले आहेत, याचा प्रत्यक्ष पुरावा म्हणजे हा 'संसार' होय.

कोल्हापूरचे कलावंत – माधवराव बागल

अभिप्राय – ना. सी. फडके

एक एका चित्रकारावरील आपला परिचयात्मक लेख अत्यंत वाचनीय झाला आहे. आपल्या लिहिण्यात मार्मिकता आहे, जिव्हाळा आहे आणि स्पष्ट-वक्तेपणाही आहे. आपले सर्व लेख मी काळजीपूर्वक वाचले आणि आपले अभिनंदन केल्याशिवाय रहावेना म्हणून हे पत्र लिहित आहे.

शंकरराव किर्लोस्कर :

हा ग्रंथ केवळ वाचनीयच नव्हे, तर अत्यंत संग्राह्य आहे. या पुस्तकामुळे चित्रकलेची आवड असणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांना स्फूर्तिही मिळू शकेल व त्यामुळे महाराष्ट्रात नवे चित्रकार उदयास येण्यास अंशतः तरी मदत होईल असा मला विश्वास वाटतो. त्यामुळे या पुस्तकाच्या द्वारे आपण महाराष्ट्रातील कलेला उत्तेजन दिले आहे, याबद्दल मी आपले अभिनंदन करतो. ♠



विचारतरंग

मी विशिष्ट हेतू मनात धरून पेन उचललं नाही. उचललं आणि ते चालू लागलं. माझं पेनवर फार प्रेम आहे. ते जवळ नसलं की मी अगदी अस्वस्थ होतो. ते शोधण्यासाठी त्याच्या साऱ्या ठराविक जागा धुंडाळतो. सापडलं की कोण आनंद होतो म्हणून सांगू! जणु फार दिवस न भेटलेला मित्र भेटावा, मग त्याला प्रेमानं कुरवाळतो.

पण ते काही विश्रांती घेत नाही. लगेच माझ्या हाताचा आधार घऊन चालू लागतं. मलाही आपोआप विचार सुचू लागतात.

ज्या वस्तू आसपास दिसतील त्या विचार देतात. नाही तरी जड वस्तु-तही चैतन्य असतंच, ते सर्वसामान्यांना दिसणार नाही. पण दृष्टी आणि बुद्धी यांची जोडी जमली की तिचे अंतरंग उकलू लागते.

नभात लुकलुकणाऱ्या चांदण्या वस्तुतः जडच आहेत. त्या हात-पायाला लागत नाहीत, पण स्पर्शाशिवाय आनंद देतात. आपल्या प्रेयसीचा वियोग झाला, तरी तिची आठवण आनंद देतेच की. सहवासाशिवायही प्रेम करता येतं.

सूर्याला पाहताच सूर्यकमल उमलतं ते का?

कुठे सूर्य अन् कुठे कमल! कठीण लाकूड पोखरणारा भोंगा कमलदल तोडून बाहेर का येत नाही? कसल्या प्रेमात सापडला असतो तो?

घराभोवतीच्या कुंड्यातून चढाओढीने आपल्या रंग-वैभवाचे प्रदर्शन करणाऱ्या पुष्पगुच्छाकडे पाहून मी मुदित झालो आहे.

माझ्या समोरून, दुडदुड पळत व पडत जाणाऱ्या बालकाने मातेला

आपल्या इवल्याशा हातानी बोलवताना, मातेने पटकन् पुढे होऊन त्याला प्रेमानं कवटाळताना व त्याचा पापा घेताना पाहून माझं हृदयही फुलून गेलं आहे. आपणही त्याला मातेच्या कडेवरून जवळ घ्यावं वाटतं.

सौंदर्यवेडा माणूस सुंदर स्त्रीकडे पाहात राहण्यात इतरांना कामुकता दिसेल, पण त्याच भावनेनं प्रभातसमयी आकाशात उधळलेली फुले व जल-पृष्ठावरून नदीच्या किनाऱ्यावर आणून टाकलेली रत्ने पाहण्यात तो स्वतःच्या अस्तित्वालाही विसरतो. अस्ताचलानंतरच्या शांत वातावरणात स्वतःही एक-जीव होऊन सात्विक समाधीचा आनंद भोगू शकतो.

सुंदर स्त्रीकडे रोखून पाहण्यात कामुकता असतेच असं कसं म्हणता येईल?

भावनाप्रधान मनुष्य समाजातील दुःखाशी तसं सुखाशी समरस होत असतो. यातूनच त्याला क्रांतीची प्रेरणा होते. तसंच अन्याय पाहून क्रांतीच्या ठिणग्या शब्दातून आकार घेतात.

समोरचं दृश्य पाहून माझं पेन एकदम थांबलं.

मालानं गच्च भरलेल्या हातगाड्या ओढताना, घामाने थबथबलेला चेहरा व अंगावरचा फाटक्या, मळक्या कुडत्याने थांबून थांबून अंग पुसत चाललेला हमाल पाहून वाटलं- आपण जावं आणि त्याला हातभार लावावा.

याचवेळी एक भली लांबलचक मोटार आणि त्या हमालाला धक्का देऊन भर्रकन् पुढे गेली. ती हातगाडी धक्क्यानं उलटली व हमालाचा हात निखळला! यामुळे सारा हमाल खवळला.

श्रीमंताची बेपर्वाई व गरीब श्रमजीवांची दुर्दशा!!
चीड, त्वेष, द्वेष यानं माझं अंग थरथरू लागलं.

सर्व समाजाचं चित्र डोळ्यासमोर उभं राहिलं! हे पाहून स्वस्थ बसायचं काय?

हे पाहूनच रुसो, व्हॉल्टेअर यांच्या भडकलेल्या हृदयातून आग ओकली गेली व क्रांतीचा वणवा पेटला. त्यात राजशाहीची राख झाली, 'समता बंधुता व स्वातंत्र्य' या तत्वांचा जन्म झाला. कार्ल मार्क्सने त्याला जोपासले, वाढवले व मार्गदर्शन केले. भारताची झोप अद्याप उडाली नाही!

मराठवाड्यात अस्पृश्यांवर होणाऱ्या अन्यायाने ही ठिणगी पेटवली आहे.

आर्थिक, सामाजिक व धार्मिक अन्यायामुळे व मनुस्मृतीच्या धार्मिक शिकवणुकीमुळे अस्पृश्य व बौद्ध समाजाची शिकार चाललेली आहे! सरकारने त्यांना दिलेल्या सवलती स्पृश्यांना असह्य झाल्या आहेत. भारताला नवयुगात नेऊन सोडणारी लोकशाही समाजवाद व निधर्मी राज्याची घटना ज्याने करून दिली, त्याचे नावही त्यांना खपेना! सरकारला हा राक्षसी उद्रेक आवरेना, म्हणून स्पृश्य दलित, अस्पृश्य दलित, बुद्धधर्मीय दलित पुरोगामी पक्ष व व्यक्ती यांनी एकी करून त्या संघटनेच्याद्वारे ही भयानक विषमता नष्ट करण्यासाठी कंबर कसली पाहिजे.

अहिंसामय सत्याग्रहाचा मार्ग गांधीनी दाखवला आहे.

स्पृश्यातील सर्वसामान्य जनतेची अशी समजूत आहे की, अस्पृश्यता ही देवाने निर्माण केली आहे. आंबेडकर हे अस्पृश्यच. त्यांचं नाव मराठवाडा विद्यापीठाला देणे म्हणजे त्यामुळे अस्पृश्य आमच्या बरोबरीला येऊन बसत आहेत. राखीव जागा दिल्यामुळे पंचायतीत खुर्ची लावून बसत आहेत! हे सर्व धर्मबाह्य आहे, असह्य आहे.

हे सर्व हिंदुच्या देवाधर्माविरुद्ध आहे. म्हणून आपण करतो ते योग्यच आहे, अशी स्पृश्य अडाण्यांची आणि शिकलेल्या अडाण्यांचीही समजूत आहे.

उच्चवर्णीय विद्यार्थीही– आमच्याहून कमी मार्क मिळाले तरी पास होतो. मेडिकल व इंजिनियरिंग कॉलेजमध्ये त्याला प्रवेश मिळतो. म्हणून हा वर्गही दंग्यात सामील झाला आहे म्हणतात. पण हजारो वर्षे अस्पृश्यांना सवलती तर राहू देच, पण साधी माणुसकीची वागणूकही त्यांना मिळाली नाही, याचा त्यांना विसर पडतो. म्हणून त्यांची दृष्टीही बदलली पाहिजे.

यासाठी प्रचारकार्याची फार जरूरी आहे.

ज्या देवाची ते भीती घेतात व आधार घेतात, तो त्यांच्या कल्पनेतला देव मुळी अस्तित्वातच नाही. तो निव्वळ दगड आहे, तो चांगलं–वाईट करू शकत नाही. त्या दगडाचा वापर करावा तसा त्याचा उपयोग होतो.

पण या दगडोबाची भक्ती काढण्याचा प्रयत्न कोणी करीत नाही. पुढारी करीत नाहीत. आमदार, खासदार, मंत्री करीत नाही. उलट ती घट्ट करतात कारण मत देणारा समाज हा अडाणी व देवभक्तच असतो. त्याला दुखवल्यास मते मिळणार नाहीत ना?

म्हणून सत्तेपासून अलिप्त अशा कार्यकर्त्यांनीच हे कार्य हाती घेतले पाहिजे. ♠

मी समाजवादी कसा बनलो!

मी समाजवादी कसा झालो व का झालो हे मी सांगणार आहे. मला कोण गुरु भेटला व त्याने मला समाजवादाची दिक्षा दिली असे झाले नाही. तसेच मूर्तिपूजा प्रार्थना याने देव पावतो व संकट निवारण करतो, यावरचाही विश्वास उडून गेला. तोही कोणी नास्तिक भेटला म्हणून नव्हे. या अगदी बालपणापासून. त्यावेळी ग्रंथ वाचण्याइतके माझं वय नव्हते, असं असूनही मला शिकवलं ते मला मिळालेल्या अनुभवानं.

अन्यायाची चीड हा माझा स्वभाव. त्या अन्यायाविरूद्ध प्रतिकार करण्यासाठी मन धाव घेई. माझ्यावर झाला म्हणून नव्हे. दुसऱ्यावर झालेला पाहिल्यावर किंवा ऐकल्यावर मन अस्वस्थ होई. पण प्रत्यक्ष कृती करणं मला शक्य नव्हतं. मी १०-१२ वर्षाचा पोर. मी काय करणार! माझं प्रत्यक्ष असं वाकडं कोणीच केलं नव्हतं.

मी जन्मलो ते "Silver spoon in my mouth." मी मामलेदाराचा मुलगा. माझं वय आता ८६. त्या काली मामलेदाराचं ऐश्वर्य आजच्या जिल्हा कलेक्टरनं हेवा करण्याजोगं. मामलेदारच्या घरी आठ पट्टेवाले शिपाई कामाला. आम्ही म्हणजे युवराज! संध्याकाळी आमची स्वारी घोड्यावर बसून फिरायला निघणार. आम्ही घोड्यावरून खाली कोसळू नये म्हणून धरायला एक शिपाई. घोडा उधळू नये म्हणून त्याला काठीने आवरणारा व घोड्याबरोबर पळणारा एक पट्टेवाला असणार. शहरातून युवराज निघाले की, लोक वाकून मुजरा करणार. हे वातावरण तर समाजवादी विचार डोक्यात यायला मुळीच अनुकूल नव्हतं, उलटच होतं.

पण! मी लाडका म्हणून वडील मला फिरतीवर बरोबर घेऊन जाणार. ते ज्या गावी मुक्काम करतील, त्या गावचे शेतकरी त्यांना भेटून आपली

गाऱ्हाणी सांगणार. आपल्याला सावकाराने खोटे दस्तैवाज लिहून घेऊन, दहाचे शंभर, शंभराचे हजार करून, आपले घरदार, जमीन–जुमला लुबाडून कसे दरवेशी केले, जमीनदाराने, सुकाळ असो वा दुष्काळ असो, सक्तीने फाळ वसूल कसा करून घेतला, बायका पोरांना कसे राबवून घेतलें, कसे अत्याचार केले ते डोळ्यात पाणी आणून, तर स्त्रिया ओक्साबोक्सी रडून सांगणार. ते ऐकून माझेही अंतकरण भरून येई.

यामुळे त्या बालवयातही सावकारशाही व जमिनदारशाही विषयीचं शत्रुत्व माझ्या हृदयात ठाम बसलं. अशारीतीने समाजवादाची पार्श्वभूमी माझ्या मनात तयार झाली. ती दुसऱ्यांचे हाल पाहून. मी हळव्या मनाचा भावनाशील. बालपणीच मी सावकारशाहीचा व जमीनदारशाहीचा द्वेष्टा झालो. परिस्थितीमुळेच मला समाजवादी विचारसरणीकडे खेचून नेले व प्रतिकारासाठी मनाची तयारी केली.

याच सुमारास माझी आई क्षयाने आजारी पडली. तिचे हाल मला बघवेनात.

वडील धार्मिक. रोज नियमाने देवपूजा करणार, तांम्हणात अनेक देव-देवतांच्या मूर्ति ठेवून त्यांना स्नान घालणार, फुले वाहणार. गीतेचा एक अध्याय रोज म्हणणार, प्रार्थना करणार. यांचा संस्कार माझ्या मनावर झाल्याखेरीज राहिला नाही. पाहुणे-पै, स्वतः संबंधी हे सर्वच अंधश्रद्धाळू. कोणी अंगारा आणत. कोणी पीराला जा म्हणत. डॉक्टर व वैद्यापेक्षा या लोकांचा विश्वास देव–देवतावर व भविष्यवाद्यावर. याचा परिणाम माझ्यावर झाल्याखेरीज राहिला नाही.

प्रार्थनेने देव पावेल अशी अशा मलाही वाटू लागली. व मी रात्री सर्व झोपल्यावर एकांती उठून देवाची प्रार्थना करू लागलो. 'देवा मला ने पण माझ्या आईला वाचव.' हे सांगत असताना माझ्या डोळ्यातून अश्रू वहात. जणू देव माझ्या समोरच उभा आहे. हा दिनक्रम माझा रोज चाले, दिवसा आईकडून देवापुढे ठेवण्याकरता पै–पैसा रोज मागून घेई व शाळेला जाताना रोज शेंदूर फासलेल्या देवापुढे त्या पैशाचा कापूर लावी. देवळातल्या देवासमोर बसलेल्या भटाला दक्षिणा म्हणून जवळचे पैसे देई. पण महिन्याने आईचा आजार वाढला व ती मला कायमची सोडून गेली! माझ्या आयुष्यात मला हा फार मोठा धक्का बसला. देव व प्रार्थना सर्व झूट आहे अशी माझी खात्री

पटली. त्या देवांचा असा राग आला की, वडिलांनी पूजेला घेतलेले सारे देव घ्यावेत व गटारात टाकून द्यावेत; पायाखाली ठेवून कचाकचा तुडवावेत. देवाविषयीची भीती व आदर मनातून संपूर्ण नष्ट झाली. वडिलांचाही राग आला. इतकं शिकून व एल.एल. बी. होऊनही त्यांना समजत कसं नाही ?

या प्रसंगाने देवाविषयीची भीती व आदर जो नष्ट झाला ती कायमचा. पुनः या अखेरच्या कालापर्यंत, ८६ वर्षापर्यंत देव व प्रार्थना याचा पगडा मनावर बसला नाही. म्हणजे बालवयातच सावकारशाही, जमीनदारशाहीचा व देवाचा मी द्वेष्टा झालो.

समाजवादाची पार्श्वभूमी कसलेही वाचन न करता मिळालेल्या अनुभवाने झाली.

वडील वारल्यानंतर मी राजारामपुरीतील मातंग वसाहतीत रहायला आलो. जवळच फलांगावर शाहू मिल. यामुळे अस्पृश्य व गिरण मजुरांची परिस्थिती मी स्वतः अस्पृश्य अगर मजूर नसतानाही मला समजू लागली.

अन्यायाची चीड येणं व प्रतिकारासाठी मन धडपडणं हा तर माझा जन्मस्वभाव.

अस्पृश्यांना उच्चवर्णीय माणूस म्हणूनही वागवत नाहीत. जनावराहूनही कमी लेखतात, शिवाशिव करीत नाहीत. हिंदू असूनही देवळात घेत नाहीत, हे मी पाहिले. मी हा भेदाभेद मुळीच मानला नाही. माझ्या घरी येत नाही. स्वयंपाक घरापर्यंत जात. माझी बायको त्यांना जेवायला वाढी. खरकटे काढी, त्यातले काही माझे जिवलग मित्र झाले. त्यातल्या अनेकांना कुलगुरू डॉ. पवाराना सांगून नोकऱ्या देवविल्या.

कोल्हापूरच्या जगदंबा देवालयात त्यांना प्रवेश नव्हता. मी जाहीरसभा घेऊन बंदी मोडून अस्पृश्यांचे हातात हात घालून जगदंबा मंदिरात प्रवेश केला. लगेच दुसऱ्या दिवशी गंगाराम कांबळे याला सांगून महार वाडयातील लोकांना ट्रकमधून नृसिंहवाडीस दत्त पादुका स्पर्शासाठी नेले. त्यांनी झुणका भाकरही बांधून घेतली होती. आसपासच्या गावचे शेकडो लोक सभेला आले होते. सभा घेऊन अस्पृश्यासह पादुकास्पर्श केला. यामुळे संस्थानचे वातावरण बदलून गेले.

गिरणी मजूर

मजूर माझ्या घरावरूनच जात. त्यातले बरेच अस्पृश्य होते. त्यांच्या-कडून गिरणीच्या आतील कारभाराची माहिती मिळाली. गिरणीचे मॅनेजर माझे घरोब्याचे जिवलग मित्र. खादी भक्त. मुंबईस शाहू महाराजांच्या 'पन्हाळा लॉज' या बंगल्यात एकाच हॉलमध्ये आम्ही रहात होतो. पण त्यांच्याकडून आतील कारभाराची मला माहिती मिळू शकली नाही. पण कामावर जाणाऱ्या येणाऱ्याकडून पुष्कळ माहिती मिळू शकली. पहाटे दिवस उजडायचे आत व संध्याकाळी दिवस मावळल्यानंतर त्यांची सुटका होई. म्हणजे १४ तास काम. पगार नऊ. स्त्रियांना तशीच वेळ, पगार ७, मुलांना वेळ तितकाच. पगार ५. फॅक्टरी ॲक्ट लागू नाही, बोनस नाही, अपघात भर-पाई नाही. ब्रिटीश हद्दीतली स्थिती त्या मानाने बरीच चांगली होती. माझ्या स्वभावानुसार मी हाही प्रश्न हाती घेतला. यामुळे माझे मित्र मॅनेजर गरम झाले. मला म्हणाले, 'माधवराव तुम्ही यात पडू नकात. मी सरकारचा नोकर आहे. इथं खाजगी संबंध मला मानता येणार नाहीत. तुम्हाला हे जड जाईल. मीही मामलेदारचाच मुलगा मी त्यांच्या धमकीला डरलो नाही. मी मॅनेजरना म्हणालो, 'तुम्ही तुमचं कर्तव्य करा मी माझं करीन.'

मी जवळच एक भाड्याची ७ रु. ची जागा घेऊन तेथे मजुरांना काय करावे ते सांगू लागलो. त्यांची संघटना बांधली. विनती मोर्चा, उपवास सामुदायिक व संप या मार्गाने मागण्या मान्य करणे भाग पाडले.

आज मजुरांचा पगार २०० ते ३०० आहे. तास १४ चे ८ झाले. बोनस मागणी मान्य केली. अपघाताची भरपाई देण्यात येते. ७ रुपयाची भाड्याची जागा सोडून २/२॥ लाखाची कामगार संघाची जागा उभी राहिली आहे. संघटनेची शक्ती त्यांना कळाली. मला कळाली. त्याचा उपयोग मला पुढे झाला. आतापर्यंत मिळालेले यश केवळ माझ्या पुढाकाराने. माझा उपजत स्वभाव व परिस्थिती मला पुढे पुढे ढकलत होती.

यानंतर मी पुढची उडी घेतली. तिलाही परिस्थिती हेच कारण.

वडिलांनी शाहूंच्या निधनानंतर सत्यशोधक चळवळ बंद पडू नये म्हणून 'हंटर' नावाचे मराठी साप्ताहिक सुरू केले होते. मी त्यात स्फुटे लिहू लागलो. पत्रात लोक आपली गाऱ्हाणी लिहून, छापावी म्हणून कळवत. यामुळे

मला एकतंत्री बेजबाबदार राजशाहीचा कारभार, षोकासाठी शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, वाड्यावरच्या बगलबच्चांची हुकूमशाही व अनीतीचा कारभार समजू लागला. त्याला मी प्रसिद्धी देऊ लागलो म्हणून जबर जामीनकी लादून पत्र बंद पाडले.

तेव्हा सरकारविरूद्ध तोंडी प्रचार करण्यास सुरुवात केली म्हणून मला हद्दपारीची शिक्षा केली. मी व माझी पत्नी रमादेवी या काळात कुलाबा, रेवदंडा या गावी माझ्या मित्राच्या घरी राहिलो. तेथे राहण्यापूर्वी मला समाजवादी विचारसरणीच्या पुस्तकांची यादी जवळकरांनी दिली होती. ती सर्व पुस्तके विकत घेऊन मी नेली. त्या काळात मी तेथे समाजवादी, प्रसिद्ध जगमान्य नेत्यांच्या विचारसरणीचा अभ्यास केला. ते सर्व सावकारशाही, जमीनदारशाही, भांडवलशाही, राजशाही व भटशाही याविरूद्धच होते. मी हे वाचण्यापूर्वीच प्रत्यक्ष केलं याबद्दल मला अभिमान वाटतो.

मी आता पक्का समाजवादी झालो आहे. देवा-धर्माचा द्वेष्टा झालो आहे.

सर्व धर्मांची ओळख करून घेतली आहे. सर्वच धर्मांनी परस्परांचे शत्रुत्व केल्यामुळे जगाची हानी झाली आहे. असंख्य जनतेचे प्रत्येक धर्मियांनी खून पाडले आहेत.

या अभ्यासानंतर बुद्धिवादी-बुद्धधर्म तेवढाच जगाचं कल्याण करणार आहे याची खात्री झाली. तो देव मानत नाही, स्वर्ग-नरक, आत्मा परलोक मानत नाही. तो विचारस्वातंत्र्य हिरावून घेत नाही. पण तो धनाचा, इस्टेटीचा मोहच टाका म्हणतो. ते मला मान्य नाही. त्यामुळे सावकार, जमीनदार, भांडवलवाले यांनाच संरक्षण मिळेल. म्हणून या विचारातील काही दोष काढून डॉ. आंबेडकर यांनी आपली स्वतंत्र भर घातली आहे व त्यांच्या विचारात त्यांनी बुद्धिझम व कम्युनिझमचा समन्वय केला आहे, तो मला मान्य आहे.

बुद्धांना यांत्रिक प्रगतीच्या दुष्परिणामाची कल्पना नव्हती. मार्क्सला भारतातील वर्णाश्रमाची, जातीभेदाची व अस्पृश्यावर होणाऱ्या अन्यायाची व अनन्वित छळाची बरोबर कल्पना नव्हती. म्हणून मी म्हणतो कम्युनिझम व बुद्धिझम यांचा समन्वय होणे अत्यंत आवश्यक आहे-बुद्धिझम हा डॉगमॅटिक नाही तसा मार्क्सवादही डॉगमॅटिक नाही. ♠

मराठवाड्यातील अत्त्याचार अखेर दलितांना कल्याणकारकच ठरतील

मराठवाड्यात पाडलेल्या रक्तातून तुमचे मतभेद नाहीसे होतील. पक्षभेद नाहीसे होतील. तुम्ही खऱ्या अर्थाने एकाच रक्ताचे व्हाल ! पुण्यश्लोक बाबांची प्रेरणा व संदेश तुम्हाला प्रेमाने बांधून घेईल.

आज मराठवाड्यात तुमची होरपळ चालली आहे. आंबेडकर हे नावही त्यांना खपेना ! तुमच्यावर सूड उगवायला हे नाव केवळ कारणीभूत झालं ! हे मनूने पेरलेलं विष पुनः इतरत्रही फैलावू लागलं आहे ! ज्या विषातून पाकिस्तान निर्माण झालं, अखंड भारत खंडित झाला, ते विष अद्याप निपटलं गेलं नाही. ते वाढलं आहे !

आंबेडकरांनी खुद्द गांधीजींना बजावले, ती भूमिका आजही तशीच आहे ! आंबेडकर म्हणतात–

'गांधीजी, मला मायभूमी नाही.... ज्या देशात कुत्र्याच्याही जिण्याने आम्हाला जगता येत नाही, कुत्र्या–मांजराना जेवढचा सवलती मिळतात तेवढचा सवलतीही आम्हाला गुण्यागोविंदाने ज्या देशात मिळत नाहीत त्या भूमीला माझी जन्मभूमी आणि त्या भूमीतील धर्माला माझा धर्म म्हणण्यास मीच काय पण ज्याला माणुसकीची जाणीव झाली आहे. नि ज्याला स्वाभिमानाची चाड आहे, असा कोणताच अस्पृश्य तयार होणार नाही. ह्या देशाने आमच्या बाबतीत इतका अक्षम्य गुन्हा केला आहे की, आम्ही त्याचा कसलाही व कोणताही भयंकर द्रोह केला तरी त्यामुळे घडणाऱ्या पापाची जबाबदारी आमच्या शिरावर पडणार नाही, असे असल्यामुळे मला अराष्ट्रीय म्हणून कोणीही कितीही शिव्या दिल्या, तरी त्याबद्दल विशाद मानून घेण्याचेही मला प्रयोजन नाही.... ज्या राष्ट्रात माझ्या अस्पृश्य बांधवाची माणुसकी धुळीप्रमाणे तुडवली जात आहे, ती माणुसकी मिळवण्यासाठी ह्या राष्ट्राचे मी कितीही नुकसान केले तरी ते पाप न ठरता पुण्यच ठरेल.'

'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत ऐकताना त्यांचं मन प्रफुल्लित होईल काय? त्यांच्यावर शस्त्र चालून आल्यास स्वत:चं बलिदान करण्यास ते तयार होतील काय? राष्ट्रगीताविरुद्ध ब्र काढला म्हणून राजा ढाले विरूद्ध केवढा गहजब उठला! आज त्याच मन:स्थितीत अस्पृश्य बौद्ध समाज आहे. त्यांना देशाबद्दल अभिमान वाटावा अशी परिस्थिती आज दिसून येते काय?


दलितस्थानाची मागणी डोकावू लागली आहे. त्याला जबाबदार कोण? अस्पृश्य की स्पृश्य?

काँग्रेस असो अगर आजची Socalled जनता आघाडी असो, यांनी देवाधर्माचं स्तोम कमी केलं नाही उलट अंधश्रद्धेची जोपासनाच केली आहे. कोणा मंत्र्यानं कोणा गावाला भेट दिली की, प्रथम त्या गावच्या दगडोबाला, तो प्रथम भेट देईल! व अज्ञ समाजाला पुन: आपल्या पाठिंब्याने अंधश्रद्धेच्या डबऱ्यात ढकलील!

पंडित नेहरू हे एक अपवाद वगळले, तर इतर सर्व पंतप्रधान व मंत्री एका माळेचे मणी ठरले ते देशावरची धर्माची छाप कशी कमी करणार? ती हिंदुधर्माची छाप नष्ट झाल्याशिवाय अस्पृश्यावरचे अन्याय कमी होणार नाहीत.

महात्मा गांधी धार्मिक होते, पण एवढं खरं की, त्यांनी धर्माचा अर्थ आपल्या सोईप्रमाणे लावला व न पटणाऱ्या विधानांना मुरड घातली. इंदिराजी वस्तुत: नास्तिक असायला हव्या. पण त्यांनी तिरूपतीला जाऊन धार्मिक विधी पार पाडले! त्यांच्या सत्तेवर पाय ठेवून उभे राहिलेल्या मुरारजींनीही तिरूपतीला जाऊन आपल्या ईश्वर भक्तीचं प्रदर्शन केलं! आज आधुनिक गांधी समजलेले राष्ट्रधुरीण व मार्गदर्शक जयप्रकाश यांचं मार्गदर्शन देवी भगवती करीत असते. त्यांना आजारातून वाचवलं ते सुद्धा देवी भगवतीने म्हणे तरी लोक विज्ञानापासून अलिप्त राहू नयेत म्हणून डॉक्टरचं सहाय्य घेतलं व अमेरिकेला त्यासाठी भेट दिली. माझे पूज्य यशवंतरावजी कर्मविपाक सिद्धांताविरुद्ध बोलतात. पण भवानी देवीला सोडत नाहीत.

तेव्हा अस्पृश्यांनी कोणा व्यक्तीवर अगर पक्षावर विसंबून न राहता, या पक्षातून त्या पक्षात त्या पक्षातून या पक्षात उड्या न मारता सर्व अस्पृश्यांची स्पृश्य दलित व अस्पृश्य दलित, शेतमजूर ब गिरणीमजूर यांची स्वतंत्र संघटना बांधून आपली सत्ता स्थापन करावी. माझ्या दृष्टीने हाच एक उपाय त्यांना खरं स्वातंत्र्य व स्वराज्य मिळवून देईल. ♠



उद्घाटकीय भाषण :
अस्मितादर्श पाचवा मेळावा, कोल्हापूर

आजच्या संमेलनाचे उद्घाटन करताना माझे परममित्र अस्मितादर्शचे विद्वान संपादक गंगाधररावजी पानतावणे यांची व अस्पृश्य व बौद्ध समाजाची सेवा केल्याचे पुण्य माझे पदरी पडत आहे. मात्र याचा अर्थ मी कर्मसिद्धांत मानतो असा नव्हे.

राजर्षी शाहू महाराज असते तर त्यांनी पानतावण्यांचे स्वत:च स्वागत केले असते. सर्व पाहुण्यांची वाडचावरच व्यवस्था केली असती.

'महाराचा पोर अमेरिकेहून पी. एच्. डी. होऊन आला हे समजताच, ते आंबेडकरांना भेटण्याकरिता मुंबईच्या परळ विभागातील चाळीत गेले. आंबडकरांना पाहताच महाराजांनी त्यांना प्रेमाने आलिंगन दिले व म्हणाले, 'आता माझी काळजी दूर झाली. दलितांना पुढारी मिळाला!' त्यांना मोटारीत घेऊन आपल्या बंगल्यावर नेऊन कोल्हापूरला येण्याचे आमंत्रण दिले. कोल्हापुरात आल्यावर बाबांना आपल्या रथात बसवून, त्यांची भव्य मिरवणूक काढली त्या छत्रपतीच्या क्षेत्रात तुम्ही आला आहात. याच वर्षात भारतीय सरकारने त्यांच्या नावाने तिकिट काढून आमच्या राजाला अखिल भारतीय मान्यता दिली. याबद्दल आम्हा सर्वांनाच आनंद व आभिमान वाटल.

वेदोक्ताने व ते नाकारणाऱ्या राजोपाध्ये-वगैरेंनी व मुख्यत: ब्रह्मवृन्दाचे एकमेव पुढारी टिळक यांनी, आम्हा ब्राह्मणेतर व अस्पृश्यांना शाहू महाराज दिले.

कृष्णाच्याने, वर्णाश्रमधर्माने व मनूच्या विषमतेच्या हीन कायद्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मानवतेच्या रक्षणासाठी भारताला दिले. हे टिळकांचे तसेच कृष्ण मनूचे आमच्यावर उपकारच झाले म्हणायचे.

बाबासाहेब अमेरिका व इंग्लंडच्या सर्वोच्च पदव्या मिळवून आले. आर्थिकदृष्टचा संपन्न झाले. शैक्षणिकदृष्टचा जागतिक श्रेष्ठत्व संपादन केले. भारतातल्या कोणत्याही पुढाऱ्याला जी कमाई करता आली नाही ती केली. गांधी–नेहरू व इतर मंत्र्याहून विद्वत्तेने, त्यागाने व कष्टाने श्रेष्ठ ठरले.

तरी अस्पृश्यच! इतराहून हीनच! सयाजीराव महाराजांनी त्यांना मोठ्या हुद्याची जागा दिली. तरी त्यांच्या हाताखालच्या शिपुरड्याने त्यांचे सरकारी कामाचे दप्तर लांबून त्यांच्या टेबलावर फेकून दिले! त्यांना रहायला सुद्धा जागा मिळाली नाही. हा अपमान सहन न होऊन त्यांनी ती नोकरी सोडून दिली. मुंबईस प्रोफेसरच्या जागेवर आले. तेथे सर्वांसाठी ठेवलेल्यासाठी हंड्यातील पाणी घेण्यास बंदी केली. भाड्याचे वहान केले. गाडीवानास हे अस्पृश्य समजताच गाडीतून यांचे सामान फेकून दिले.

लहानपणी सर्व समाजाबरोबर जे हाल सर्वांना भोगावे लागले ते यांनाही भोगावे लागले. शिकताना अनेक अडचणीशी व विरोधाशी तोंड द्यावं लागलं संस्कृत शिकू दिले नाही. तरी कष्टाने शिकून पंडित झाले. या मनु–स्मृतीने अस्पृश्यांना माणसातून उठवलं, गावाच्या हद्दीबाहेर ढकललं त्यांनी जेवायला भांडी खापराची वापरायची. गाय, म्हैस, घोडी पाळायची नाहीत. कपडे प्रेतावरचे टाकलेले वापरायचे, स्त्रियांनी लोखंडाची काकणेच वापरायची!

पेशवाईने मनूच्या कायद्यात जादा भर घातली. माणुसकीचा लवलेश शिल्लक ठेवला नाही. अस्पृश्यांच्या सावलीने माणूस विटाळला जातो, म्हणून रस्त्यावरून जाण्यास बंदी! रस्त्यावरून गेल्यास त्याची उठलेली पाऊले पुसून टाकण्याकरिता, कसेबसे झाडपाल्याची फांदी बांधून घ्यावी लागे. रस्त्यावर अस्पृश्याची थुंकी पडू नये, म्हणून गळ्यात गाडगे बांधून घ्यावे लागे!

हा अन्याय व अपमान असहय झाल्यामुळे त्याचा प्रतिकार करण्याचा व बंडाला लोकांना प्रवृत्त करण्याचा बाबांनी निश्चय केला. त्यासाठी अन्या–याची जाणीव करून दिली. उच्चवर्णियांची माणुसकी धसाला लावावी म्हणून महाडच्या चवदार तळ्याचे पाणी सामुदाईकरित्या जाऊन पिण्याचा कार्यक्रम जाहीर केला, त्यात अत्यंत कटु अनुभव आला. बाबासाहेबांनी आपल्यामागे प्रचंड समाज असूनही कमालीचा संयम व शांतता राखली, मार खाल्ला स्त्री-पुरुषांना, वृद्धांना व मुलांनाही बेछूट मारपीट केली.

हिंदुधर्मीय सुधारतील, माणूसपणानं वागतील ही आशा नष्ट झाली. चवदार तळ्याचा संग्राम व काळाराम मंदिर प्रवेशाची अहिंसात्मक चळवळ ही म. गांधीच्या देश-स्वातंत्र्याच्या अहिंसामय सत्याग्रहाहून पवित्र होती.

आंबेडकरांचा संग्राम मानवी स्वातंत्र्यासाठी होता. गांधीचा देश स्वातंत्र्यासाठी होता. मंदिर प्रवेशाची चळवळ ही देशभक्तीसाठी होती. हक्क संपादनासाठी होती. यावेळी माझ्या जीवनातला एक प्रसंग आठवतो– सेनापती बापट व साने गुरुजी कोल्हापुरात आले होते. राजारामपुरीतील मांगवाडा झाडून माझ्या घरी आले. साने म्हणाले, 'माधवराव, मी पंढरपूरला अस्पृश्यांना मंदिर प्रवेश मिळविण्यासाठी प्राणांतिक उपोषण करणार आहे तुमचा आशीर्वाद हवा.' 'गुरुजी, माझी योग्यता तुम्हाला आशीर्वाद देण्याइतकी मोठी नाही, पण माझी सहानुभूती नाही. बडव्यांना ब्राह्मणेतराकडून लाखो रुपये मिळतात ते कमी पडले म्हणून अस्पृश्याकडूनही मिळवून देता काय?'

गांधीच्या अहिंसा लढ्याला त्यावेळच्या विशिष्ट जागतिक परिस्थितीमुळे यश मिळाले, अहिंसा सत्याग्रह या तत्वज्ञानाला मिळाले असे म्हणता येणार नाही. हिटलरच्या वीजीगीपु स्वारीच्या धास्तीमुळे ब्रिटीश साम्राज्यच धोक्यात आले होते. म्हणून यावेळी भारताच्या सहाय्याची ब्रिटनला आवश्यकता भासली. ब्रिटीश हावित्सर व मशीनगन्सपुढे अहिंसा सत्याग्रहाचा जराही टिकाव लागला नसता. व्हिएटनामने अमेरिका व चीनचा हल्ला अहिंसा सत्याग्रहाने हटवला नसता.

आंबेडकरांना सत्याग्रह करताना कार्यसिद्धीसाठी हिंसा जरी झाली तरी ती त्यांना मान्य होती. सत्याग्रही माणसाने शक्य असेल तोवर अहिंसा, जरूर पडेल तर हिंसा हे धोरण स्विकारावे. आंबेडकरांनी आपल्या बुद्धीने निर्णय घेण्याची वृत्ती टाकली नाही. आंबेडकरांनी जरी बुद्ध धर्म स्विकारला तरी स्विकारण्याजोगे असेल ते घेतले आहे. स्विकारता येणार नाही ते बाजूस सारले आहे. भ. बुद्ध म्हणतात–

'सर्व काही नाशवंत आहे म्हणून मालमत्तेसाठी झगडण्याची आवश्यकता नाही.'

हा उपदेश अव्यवहारी आहे याने 'आहेरे' वर्गाला म्हणजे सावकार, जमीनदार, जहागिरदार यांना संरक्षणच मिळणार आहे. दरिद्री,बेकार व श्रम-

जीवी वर्गाने 'सर्व काही नाशवंत आहे' असे समजून स्वस्थ बसल्यास त्याची स्थिती केव्हाही सुधारणार नाही.

गांधीजींच्या ट्रस्टिशिपने जसे धनिकांनाच संरक्षण मिळाले. कोणी आपली इस्टेट ही लोकांची समजून तिचा विनियोग केला नाही.

आंबेडकरांना संघर्ष,क्रांती नको होती, असे मुळीच नाही. ते म्हणतात,

'मला कोणी विचारले, 'धर्म-क्रांती अगोदर की आर्थिकक्रांती अगोदर तर मी म्हणेन धर्मक्रांती अगोदर''

धार्मिक क्रांतीनंतर अस्पृश्य, बेकार, दरिद्री राहावेत असं आंबेडकरांना वाटणं केव्हाही शक्य नव्हतं. आपल्या समाजाला उर्जितावस्था आणणं, त्याची सर्वांगीण उन्नती करणं, हेच त्यांचे समोरचे मुख्य ध्येय होते. म्हणून ते म्हणत-

'माझ्यासमोर देश आणि समाज असा प्रश्न उभा राहिला, तर मी समाजाला महत्व देईन. मी व देश उभा राहिल्यास देशासाठी प्राण देईन.'

आज धार्मिक क्रांतीसाठी बुद्ध तत्वज्ञानाचा व आर्थिक क्रांतीसाठी मार्क्सवादाचा स्वीकार करावा लागणार आहे.

मार्क्सच्या मते खाजगी मालकी ही मानवी वितुष्टाच्या मुळाशी आहे. बुद्धाचही म्हणणे तेच आहे. म्हणून बुद्ध भिक्षुंनी इस्टेट करायची नाही असा दंडक घातला. ४ अगर ७ घरं भिक्षा मागून जगावे. पण याने स्वाभिमान कसा राखला जाईल? कम्युनिझम म्हणजे हिंसा असं मानण्याचं कारण नाही. सर्वांना सुखानं जगता यावे एवढी मालमत्ता प्रत्येकाची असावी. त्याच्या आवडीच्या विषयाची वाढ करण्यास आर्थिक साधन त्यांच्याकडे असावे, हाच म्युनिझमचा उद्दश आहे फ्रांस, रशिया, चीन या राष्ट्रांना हिंसा केल्याखेरीज स्वातंत्र्य मिळालच नसतं. भारतात लोकशाही असल्यामुळे निवडणुकीच्या मार्गाने सत्ता बदलता येते, हा अनुभव आला आहे.

बुद्ध धर्माचा एक गाढ अभ्यासू ख्रिस्तमस हम्प्रे म्हणतो-

'Communism and Budhism have features in Common.'

आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्यापूर्वी सर्व धर्माचा अभ्यास करून, मगच बुद्धीवादी बुद्ध धर्माचा स्वीकार केला. कृष्ण, ख्रिस्त, महमद या प्रत्येकांनी देव, देवांचा पुत्र व प्रेषित असे बिरूद चिकटवून घेतले आहे. स्वर्ग,

नरक. पुनर्जन्म, कर्मसिद्धांत या कल्पना प्रत्येक धर्मात आहेत व आपला भाव वाढवणाऱ्या कथा, आपापल्या धर्मात घुसडल्या आहेत. दुसऱ्या धर्मियांचा द्वेष शिकवला आहे. पण आपल्याच धर्मात उच्चनीच भाग पाडले नाहीत, ते कृष्णाने आपल्याच धर्मात 'ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र' असे चार विभाग कायमचे पाडले. त्यांचा धर्म म्हणजे त्यांना दिलेला धंदा, तो जन्मभर पालन करणे त्यात या जन्मी बदल होणार नाही. बदल केल्यास 'नरको नियत वास:' तो माणूस नरकात जाईल, असा शापही देऊन टाकला. मनूनें त्याला कायद्याचे स्वरूप देऊन त्यात अस्पृश्याची भर घातली. चार वर्ण पाडले, पण स्त्री-पुरुष आकर्षणाला बंदी घालता आली नाही. निसर्गाकर्षणाला आवर घालता आला नाही.... वनपर्वात युधिष्ठर-नहुष संवादात, युधिष्ठिर म्हणतो, 'हल्ली मनुष्य ही एकच जात उरली आहे. सर्व वर्णांचा संकर झाला आहे. जातीची परीक्षा करता येत नाही.' ही सरमिसळ सर्व जातीत आजपर्यंत चाललीच आहे 'श्रेष्ठ वर्ण ब्राह्मणाचा संग न सुटे शुद्रीचा' ब्राह्मणाची स्त्री शुद्राबरोबर व शुद्राची ब्राह्मणाबरोबर गेलीच आहे, पण वारसा सांगायचा झाला म्हणजे बाप म्हणतो हा मुलगा माझा आईला माहीत असतं कुणाचा ! वंशशुद्धता अगर जाति-शुद्धता हे केवळ थोतांड आहे- हरिणी नावाच्या अनार्य स्त्रीच्या पोटी कौशिक गवताच्या बेटात जन्मास आले. वाल्मिक मातीच्या ढिगाआड जन्मास आले वेश्येचे उदरी, वशिष्ठ जन्मास आले. नारद स्वत: दासीपुत्रच होते गवताचे बेट, मातीचा ढीग अशा ठिकाणी पोर जन्मास घालणाऱ्या माता चुकलेल्या कुमारिकाच असण्याचा संभव आहे. कुंतीने कर्णाला नदीत सोडून दिले. आज कित्येक अर्भके विहिरीत, गटारात व संडासात टाकलेली आढळतात, हे बंद व्हावे म्हणूनच, म. फुल्यांनी बालकाश्रम काढून टाकलेल्या मुलांचा संभाळ करणारी संस्था काढली... वशिष्ठ, विश्वामित्र, पराशर, कौशिक, भरद्वाज, गौतम या ऋषींनाच ब्राह्मण आपले कुलगुरु समजतात वशिष्ठ ऋषीनी अक्ष-माला या नीच जातीय स्त्रीशीच विवाह केला, तिलाच पुढे अरुधती म्हणू लागले.. पराशरानी कोळणीशी समागम केला व ते वेदमहर्षी व्यास झाले. परशुराम हा चित्पावन ब्राह्मणांचे कुलदैवत, बाप जमदग्नी ब्राह्मण आई रेणुका जोगतीण, कुठं राहिला आहे तो कृष्णाचा वर्णाश्रम धर्म ? पण हे जातिधर्माचे थोतांड अद्याप जिवंत आहे. हा उच्चनीच भेद अस्पृश्यातही शिरला आहे. या कुट नीती कृष्णाने 'संभवामि युगेयुगे' असे म्हणून, बोवा-बाजीलाही उत्तेजन दिले आहे, ते कोल्हापूरला त्यांची कृष्णकृत्ये उघडकीला येईपर्यंत खूपच भोवलं आहे. याबाबत सत्यशोधक ना. भास्करराव जाधव म्हणतात, 'बुवाबाजी नष्ट करायची असेल, तर ईश्वर अवतार घेतो, या

कल्पनेचा फोलपणा लोकांना पटवला पाहिजे 'संभवामि युगेयुगे' अशा वाक्यांनी, भगवद्गीतेने अवतारकल्पना घट्ट केली म्हणून भगवद्गीता हीच बुवाबाजीचे मूळ आहे, बुवाबाजी हा एक मोठा विषवृक्ष आहे, आमच्या समाजाचे रक्त शोषित आहे व आमच्या सद्सद्विवेक बुद्धीस मारून टाकून, आमच्या लोकास भित्रे व परावलंबी करीत आहे. निरनिराळ्या ठिकाणी बोवा बनून, साधुत्वाचा बाजार मांडणारे महाराज, हे या विषवृक्षाच्या फांद्या आहेत. याची पाळेमुळे खणून नष्ट केली पाहिजेत.

कृष्ण म्हणतो- चातुर्वर्ण्यम मया सृष्टम । गुण कर्म विभागशः । परीक्षेत विद्यार्थ्यांना मार्क देऊन पास-नापास करतात, तशी यंत्रणा कृष्णाने तयार केली होती काय? एवढ्या प्रचंड मानवी समाजाला ती कशी लागू केली?

तसं पाहिलं तर प्रत्येक माणसात चारी वर्णाचे गुण असतात. सकाळी तो भंगी व महाराचे काम करतो. बाजारहाट करताना वैश्य बनतो. मालमत्तेसाठी झगडा करताना क्षत्रिय बनतो. व सर्वांना आपल्या जीवनाचं साधन बनवून, आपलं श्रेष्ठत्व प्रस्थापित करण्याकरिता कथा व वचने लिहित बसताना, ब्राह्मण बनतो त्याचं उत्कृष्ट उदाहरण म्हणजे रामदास व ज्ञानेश्वर. रामदास हा कट्टर जातिवादी ब्राह्मणनिष्ठ. तो जनमनाची लाज सोडून म्हणतो,

ब्राह्मण वेद मूर्तिमंत । ब्राह्मण तोचि भगवंत
पूर्ण होती मनोरथ । विप्रवाक्ये करुनी ।।
असो ब्राह्मणा सुरवर वंदिती । तेथे मानव बापुडे किती ।
जरी ब्राह्मण मूढमती । तरी तो जगद्वंद्य ।।

ज्ञानेश्वराने गीता मराठीत करून संस्कृत न जाणणाऱ्या वर्णाश्रमधर्माचं महत्त्व निवेदन केलं आहे. अस्पृश्यांना हीन लेखलं आहे ज्ञानेश्वर आपल्या वर्णांची स्तुती करताना म्हणतात, स्वर्ग लोक हे ब्राह्मणांचे इनाम गाव; मंत्रविद्येचे माहेरघर, ब्राह्मण हे सर्व वर्णामध्ये श्रेष्ठ. हे पृथ्वीवरचे देव आहेत ते अंत्यजावद्दल म्हणतात, अत्यजाच्या समागमाने ब्राह्मणही अत्यंज होतो. ब्राह्मण जरी दरिद्री झाला, तरीही त्याने शूद्राच्या घरची उत्तम पक्वाने सुद्धा सेवू नयेत.

सांगे शुद्राघरी आघवी । पक्वाने आहाति बरवी ।।
ती द्विजे केवी सेवावी । दुर्बल जरी जाहला ।।

या ब्राह्मणी संतांनी व भटांनी, वाटेल ते बरळावे आणि आम्ही खरे मानावे. आम्हाला डोकं आहे व विचार करता येतो असं त्यांना वाटतच नाही. ती आमची बुद्धी त्यांनी गोठून टाकली आहे. जी गोष्ट कधी काळी झाली नाही, होणार नाही व निसर्गाला सुटून आहे, ती अगदी निर्लज्जपणे हे बरळतात.

ईश्वराच्या मुखातून म्हणे ब्राह्मण जन्मला, बाहुतून क्षत्रिय, जांघातून वैश्य, पायातून शूद्र ही निसर्गबाह्य गोष्ट कोणत्या विज्ञानाने घडवून आणली ते अद्याप कुठं प्रसिद्ध झालेलं नाही. टयूबने मूल जन्माला घालता येते, ही विज्ञानी वाढ झालेली आहे. पण तोंडातून, हातातून, मांडीतून, पायातून मुले अद्याप काढता आली नाहीत.

जातीबद्दल अशीच समजूत. जाती देवाने पाडल्या ? निसर्गाने जनावरांच्या पाडलेल्या जाती ओळखता येतात. गाय, म्हैस, उंट, हत्ती वाघ, सिंह पक्ष्यांच्या-कावळा, कोंबडी, चिमणी, मोर वगैरे. जलचरात- मगर, मासा वगैरे. तसं माणसातल्या जाती ओळखता येतात ? ब्राह्मणांचं मूल शेंडीसकट, मुसमानाचं दाढीसकट, लिंगायताचं लिंगासकट व अस्पृश्याचं घाण चिकटलेलं असं बाहेर येतं ?

सर्व माणसे सारखीच असतात. माणूस हीच सर्वांची जात पण भेदभाव पाडले ते हिंदूधर्माने, वर्णाश्रम या सर्वांचा आधार देव, अन तो देव म्हणजे मूर्ती. तो कोण तयार करतो ?

खाणीतून वडु दगड बाहेर काढतो, त्या दगडाला कोणी पाया पडत नाही, त्याचे तुकडे करून रस्त्यावर टाकले जातात. त्याला तुडवत जातो. त्याला कोणी पाया पडत नाही. त्याच दगडाची कुंडी शेतखाण्यात घालतो, तिच्यावर घाण टाकतो पाया नाही पडत, त्याच दगडाला स्त्री अगर पुरुषाचा आकार देऊन चार भिंतीच्या आत बसवला की, त्या घराचं देऊळ बनतं. त्या देवासमोर भट बसला की, तुम्ही त्याला देवाचा दलाल समजून दक्षिणेची लाच देता. आपल्या अडीअडचणी पार पाडाव्यात म्हणून प्रार्थना करता ! या मुखपणावर संत गाडगे महाराजांनी कोरडे उडवले आहेत ते म्हणतात, 'शेंदूर फासोनिया धोंडा । पाया पडती पोरे रांडा ।। देव दगडाचा केला । गवंडी त्याचा बाप झाला । देव सोन्याचा केला । सोनार त्याचा बाप झाला ।। सोडोनिया खऱ्या देवा । करी म्हसोबाची सेवा । पण खरा देव कुठं आहे ? त्याची सेवा मी जन्मभर करत आलो, तो देवळात नाही. तो सर्व जनतेला पोसण्याकरिता राबतो आहे. उन्हारान्हात राबताना त्याची

पाठ काळीठिक्कर पडत आहे थंडी-वाऱ्यात काम करताना त्याचं अंग तडकून चिरून फुटत आहे. पावसात भात काढताना, त्याचे पाय कुजले आहेत. हा देव आकाशात नाही, तो अन्नदाता प्रभू दुसरा कोणी नसून, शेतकरी हाच होय. आणि वस्त्रदाता परमेश्वर तुम्हाला नटवण्याकरता, गिरणीत राबतो आहे, त्याचे हात मी पाहिले आहेत, कापसाच्या पिंजराने न्हाऊन निघालेला छातीत पिंजर जाऊन क्षयाची वाट धरलेला स्वत: फाटके मळलेले कपडे घालून कोंबडी-वजा खुराड्यात राहणारा, पण त्याच्या श्रमावर जगणारे मात्र गगनचुंबी इमल्यात, हे सारं बदलायला पाहिजे. या सावकार-जमीनदार-भांडवलवाले या सर्वांना आधार देवाचा हा देवाचा दगड गाडून टाकला पाहिजे . देव मानला की, तुम्ही गुलाम झाला. देव तुमच्या डोकीवर बसला. तुम्ही जिवंत असून बिनडोक्याचे दगड बनता देव मानला की तो उच्च, तुम्ही नीच, देव मानला की समता गेली, समाजवाद गेला, लोकशाही गेली, स्वातंत्र्य, समता व बंधुता गेली, हुकुमशाहीच्या आधीन झाला, साहजिकच जनसंघ तुमच्या डोक्यावर बसणार. आज राजकर्ते या धर्माच्या व अधश्रद्धेच्या गुंगीतच राज्य करत आहे.

या सर्व धर्मांचा समाजातील अज्ञानाचा व अंध:श्रद्धेचा विचार करू-नच, बाबासाहेबांनी बुद्धिवादी बुद्ध धर्माचा स्वीकार केला..... महात्मा बुद्ध स्वर्ग मानीत नाहीत, जातिभेद जाणत नाहीत, कर्मकांडाला जुमानत नाहीत, मूर्तीपूजा करत नाहीत, त्यांनी स्वामी 'बाबा' दलालांना जवळ केले नाही. देवालयात पाऊल टाकले नाही, विश्वाचा शास्ता कोणी मानला नाही, 'हा ईश्वर कोण आहे, कसा अस्तित्वात आला, या प्रश्नाला उत्तर नाही. कोणीही ईश्वराला पाहिलेले नाही. लोक फक्त ईश्वरासंबंधी बोलतात, कोणीही असे सिद्ध करू शकत नाही, की ईश्वराने सर्व जग निर्माण केले, जग हे रचलेले नसून विकास पावलेले आहे, ईश्वरावर विश्वास ठेवण्यात काही लाभ नाही, ईश्वराधीन धर्म हे कल्पनाश्रित धर्म आहेत. ईश्वरावरच्या अस्तित्वाचा सिद्धांत हा सत्यावर आधारलेला नाही, धर्माचा हेतू सर्व सुखी होतील अशा रीतीने माणसाशी कसे वागावे हा आहे.'

बाबासाहेबांनी बुद्ध धर्माचा स्वीकार केला तरी बुद्धकालाच्या दृष्टीने त्याच्यात जो उणेपणा आला तो या कालाचा विचार करून बाबासाहेबांनी काढून टाकला. त्याचे ऋण मानून आपले पाऊल पुढे टाकले म्हणून आज आम्हाला बाबासाहेबांनाच आपले मार्गदर्शक मानले पाहिजे.

बाबासाहेबांनी म. फुले व कबीर यांना आपले गुरू मानले तरी त्यांना आपल्या गुरुच्या पुढे मजल मारली आहे.

म. फुले–ईश्वर एक असून तो सर्वव्यापी आहे. मनुष्यप्राणी त्याची लेकरे आहेत असे म्हटले. त्याची पूजा–अर्चा होऊ नये म्हणून त्यांनी त्याला निर्मिक असे नाव दिले. म्हणजे ईश्वर या कल्पनेला टाकून दिले नाही. निर्मिक याऐवजी निसर्ग हा शब्द संयुक्तिक ठरला असता, म्हणून आम्हाला आंबेडकरच मार्गदर्शक वाटतात.

कबीर–इतरांच्या मानाने ते पुरोगामी आहेत यात शंका नाही. तथापि ईश्वर व त्याचे वरचे परावलंबितत्व झुगारून दिलं नाही. त्यांचेकडून निष्क्रियतेचाच पुरस्कार झाला आहे. ते म्हणतात.

अजगर न करे चाकरी । पंछी करे न काम ।
दास कबीरा कह गये । सब का दाता राम ॥

अगदी हेच विचार बायबलमध्ये आहेत.

सेंट म्यॅथ्यू–रानामधील वृक्ष वेली व तृण पहा. त्यांची वाढ आपोआपच होते, ते का श्रम करतात? पण ईश्वर जर रानावनातल्या फुलवेलींना पोसतो तर ती तुम्हाला नाही का पोसणार? म्हणून अन्नपाण्याची, तुम्ही काळजी करू नका तुकारामही या परावलंबितत्वातून सुटलेले नाहीत, 'आम्ही काय कुणाचे खातो रे! तो देव आम्हाला देतो रे.' सर्व धर्मगुरूंची जात एकच, बुद्धच तेवढा अपवाद. त्यांनी तुमचं वैचारिक स्वातंत्र्य हिरावून घेतलं नाही. म्हणूनच आंबेडकर त्यांचे पुढे गेले म्हणून या युगाचे सर्वश्रेष्ठ नेते आंबेडकरच होत. आचार्य अत्रे म्हणतात–महार जातीत जन्माला आलेला हा माणूस वृत्तीने, व्यासंगाने, अधिकाराने ब्राह्मणापेक्षाही अधिक श्रेष्ठआणि पवित्र असा ब्राह्मण आहे! एवढेच नव्हे तर 'ब्रह्मर्षि' हया श्रेष्ठ पदवीपर्यंत जाऊन तो पोहोचलेला आहे. डॉक्टर म्हणजे स्वाभिमानाचा एक जळता ज्वालामुखीच आहे.

आजच्या कोणत्याही सरकारपासून, अगर पक्षापासून. अस्पृश्यांना खरं स्वातंत्र्य मिळेल ही शक्यता नाही. राजेंद्र बाबूपासून ते आजचे पंतप्रधान मुरारजी देसाई पाहिले तर, एकही देवा–धर्माच्या व अंधश्रद्धेच्या पटंड्यातून सुटलेला नाही, अपवाद एकच तो पंडित जवाहरलाल नेहरूंचा. म. गांधी, विनोबा तसे सर्वकष क्रांतिकारक म्हणून समजले गेलेले. जयप्रकाश एकाच मालेत बसतील. राजेंद्र बाबू तर भटाच्या आंगठ्याचे तीर्थ पिऊन त्यांना स्वर्गाची (?) वाट मोकळी करून घेतली सोमनाथ मंदिराचा जीर्णोद्धार करून उघड्या पडलेल्या देवाला आसरा करून दिला,औरंगजेब येतोय या भीतीने, पंढरपूरच्या

बडव्यानी त्यांना उत्पन्न देणाऱ्या देवाला दडवून ठेवले. काशी येथील विश्वेश्वराची मूर्ती फोडताना त्या विश्वाच्या ईश्वराने, त्यांचे हात मोडले नाहीत. त्याच ईश्वराची पूजा करण्याकरता आपल्या पिताजीचे संस्कार गुंडाळून ठेऊन इंदिराजी तिरुपतीला व भारतावर अंमल गाजवणाऱ्यांनी भटांच्या आज्ञेप्रमाणे धार्मिकविधी पार पाडले. यानंतर त्यांचेच गादीवर आरूढ होणाऱ्या आजच्या पंतप्रधान मुरारजी देसाईंनी, त्यांच्याच पाऊलावर पाऊल ठेऊन तिरुपती गाठली व भट सांगल त्याप्रमाणे धर्मविधी उरकून घेतले, उरले सर्वकष क्रांतिकारक जयप्रकाश. यांना भगवती देव म्हणे मार्गदर्शन करते. त्यांना आजारातून बरं केलं ते डॉक्टरांनी नसून देवी भगवतीने! तरी पण त्यांना आपल्या आजारासाठी डॉक्टरांचे सहाय्य घेतलेच. अमेरिकेला खास उपचारासाठी गेले. विज्ञान आणि अज्ञान यांचा संयोग म्हणायचा.

म. गांधी यांनी सर्व जनतेला लढ्याला प्रवृत्त केलं. भारत स्वतंत्र केला पण अंधश्रद्धेतून मुक्त केलं नाही, त्यांच्या आचारात-विचारात पूर्ण विसंगती दिसून येते. धड प्रतिगामी नव्हेत. पुरोगामी नव्हेत. वर्णाश्रम धर्म व जातीच्या म्हणजे अंधश्रद्धेच्या अडकित्त्यातून ते सुटले नाहीत. हिंदू कोण? तर गांधीजी म्हणतात-

'जात जन्मामुळे प्रात होते - जो जाती आणि वर्णाश्रम व गोरक्षण यावर श्रद्धा ठेवतो तो हिंदू.'

काळाराम मंदिर प्रवेशाला गांधींनी आशीर्वाद दिला नाही. उलट विरोध केला.

विनोबांनी तर गोरक्षणासाठी प्राणांतिक उपोषण जाहीर करून मोठा विनोदच केला! त्यांचा समझोता करण्यासाठी मंत्र्यांचं डेप्यूटशन जातं हा त्याहूनही मोठा विनोद. गाईला प्राण आहे आणि इतर जनावरांना नाही? आज लोक दूध विकत घेतात ते म्हशीचं, गाईचं अपवाद पूर्वी बैलाचा उपयोग शेतीला होत होता. आता ट्रॅक्टरने त्याची शेतीतली उपयुक्तता समूळ नष्ट केली. तर हा अशास्त्रीय आग्रह कशासाठी? त्याचं ग्रामदान हेही ऑफीस झालं. टाकाऊ व खंकटचात अडकलेल्या जमिनी दान करून जमीदारांनी फुकटाचा मोठेपणा मिळवला. त्यांचे दौरे म्हणजे खेडुतावर धाड. यांचेबरोबर फुकटखाऊ ध्येयनिष्ठांची फलटण असायची. त्यांना मीच पन्हाळ्याचे मुक्कामावर याची जाणीव करून दिली होती. पण मला यातलं काही माहिती नाही असं त्याचं उत्तर मिळालं. यांनी मराठवाड्यातील दंगल पाहून उपोषण केलं

असतं तर अनेकांचे प्राण वाचले असते गाईच्या प्राणापेक्षा त्याला महत्व होतं. मुरारजी म्हणतात, 'प्रत्येक विद्यार्थ्याने रामायण-महाभारत जवळ ठेवावे. ज्या रामाने शूद्राने धर्मग्रंथ वाचला म्हणून एका ब्राह्मणाने तक्रार करताच शुद्राला ठार मारले, एका परिटाने 'सीतेच्या पावित्र्याची शंका घेतली म्हणून, आपल्या गर्भवती सहधर्मचारिणीची चौकशी न करता त्याग केला! रावणाच्या बहिणीचे नाक कापून स्त्री–दाक्षिण्याचे प्रदर्शन केले एकलव्य धनुष्य मारण्यात अर्जुनाहून प्रवीण झालेला न खपून द्रोणाचार्यांनी त्यांचा अंगठा तोडला, हाच आदर्श मास्तरांनी गिरवायचा काय? याच वृत्तीतून आंबेडकर ब्राह्मण मुलांच्या वरचढ होतील म्हणून संस्कृत शिकू दिले नाही, पण स्वतंत्रपणे शिकलेच.

यशवंतरावजी चव्हाण अधिकारावर असते, तर मराठवाडा विद्यापीठाचा प्रश्न इतका चिघळला नसता त्यांनी पददलित अस्पृश्यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने योग्य दिशेने पाऊले टाकली होती. म्हणून भारतीय रिपब्लिकन पक्ष नेत्यांनी व नवदीक्षित बौद्ध जनतेने, नागपूर येथे १६–१२–१९६० रोजी दीक्षा भूमिमैदानावर त्यांचा प्रचंड सत्कार केला, या समारंभाचे अध्यक्ष खा. दादासाहेब गायकवाड होते. मुख्य वक्ते ज. से. खोब्रागडे होते. यशवंतरावजीनीच गुलामी पद्धतीची महार वतनी पद्धत नष्ट केली, यासाठी बाबासाहेबांनी खूप प्रयत्न केले होते, पण यश मिळाले नाही. केवळ बुद्ध धर्मांचा स्वीकार केल्याने त्यांच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक मागासलेपणा नष्ट होत नाही, हे मान्य करून, त्याबाबतीत सवलती देण्याचे हुकूम सर्व खात्यांना दिले यशवंतरावांनीच आंबेडकर जयंतीची सुटी जाहीर केली, नागपूर येथे ज्या भूमीवर आंबेडकरांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतली, ती बौद्धांच्या स्वाधीन केली. दिल्लीच्या पार्लमेंटसमोर जो भव्य स्टॅच्यू उभा आहे, त्या समितीचे अध्यक्ष यशवंतरावजीच होते.

यशवंतरावजी नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'ऋणानुबंध' या पुस्तकात म्हणतात, परवा मराठवाड्यात झालेली उग्र निदर्शने व दंगली पाहिल्या, म्हणजे आमच्या आशावादाचा तात्पुरता का होईना, पण पराभव झाला आहे असे मला वाटते, या जातीयतेच्या अंधारामध्ये कोणाला वर येता येणे शक्य नाही.

यशवंतरावजीचेच मानसपुत्र आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत त्यांनी विधीमंडळात पास केलेला ठराव तेव्हाच अमलात आणायला हवा होता. शांतता निर्माण होईल या अपेक्षेने, विलंब लावल्याने शांतता निर्माण होणार

नाही. शांतता निर्माण करण्यासाठी लष्कराचं सहाय्य तो ठराव अंमलात आणावा, असे मी सुचवितो.

तथापि अस्पृश्यांनी परावलंबित्व टाकून संघटना बळकट करावी. फाटाफूट नष्ट करावी. आंबेडकरांना मानणाऱ्या सर्व व्यक्तींनी व पक्षांनी एक व्हावे व प्रतिकाराला सज्ज व्हावे. आपल्या संघटनेचे पुढारीपण आपल्याचकडे ठेवावे. जोपर्यंत जातिवाद आहे, तोपर्यंत सर्व दलित एक होऊ शकत नाही.

ब्राह्मण दलित, मराठा दलित, महार दलित यांचा दर्जा समान नाही म्हणून–

'Workers of the world unite' ही घोषणा येथे यूरोप अमेरिकेप्रमाणे परिणामकारक होणार नाही. खुद्द अस्पृश्य वर्गातच सत्ता व स्वार्थासाठी हपापलेले समाजद्रोही, गीता–रामायणाचा उदोउदो करणारे, नामांतराची चळवळ हत्या होते, म्हणून बंद करा, म्हणणारे सूर्याजी पिसाळ आहेत. राखीव जागेमुळे अस्पृश्यांना खूष करून हे निवडून आहेत. त्याला जबाबदार गांधीच होत. यांना ओळखून बाजूस ठेवले पाहिजे–

कोल्हापूरला संमेलन भरल्यानंतर राजर्षी शाहूंच्याबद्दल चार शब्द न बोलणे कृतघ्नपणाचे ठरेल. महाराज सुरवातीस जातिवादी होते, धर्मभोळे होते, मूर्तिपूजक होते, पण त्यांच्या विचारात व आचारात अनुभवाने सारखा बदल होत गेला आहे. मृत्यूपूर्वी दोन वर्षे त्यांनी जाहीर केले की, 'मला ही अंधश्रद्धा व तिची कारणे समूळ नष्ट करावयची आहेत.'

ते असते तर आंबेडकरांच्या हातात हात घालून, भारतात सामाजिक व धार्मिक क्रांती घडवून आणली असती व राज्यशकट अस्पृश्यांचे हाती आला असता, टिळकाच्या राजकारणाला उखडून टाकलं असतं.

मी गडकऱ्यांच्या शब्दात तुम्हा सर्वांना अपील करतो.
चला रूढीवर आता घसरा। टाकुनी सीमा मृत धर्माच्या,
अंधपणाच्या। अहंपणाच्या। जुन्या मताचा जाळा कचरा।
श्रुति–स्मृतींना आता विसरा। अंध भक्तीचा पांगुळगाडा।
पाताळी तो नेऊन गाडा॥ जरिपटका घ्या सुधारणेचा।
भगवा झेंडा नव्या मताचा। नव्या दमाने फडकविण्याचा।
मानव धर्माचा दसरा।

आंबेडकराचं मानव धर्म प्रस्थापित करणं हेच ध्येय होतं.

बुद्ध, फुले, कबीर या सर्वांचं ध्येय मानवता हेच होतं.

माणूसपणा आला की सर्व काही आलं । माणूसपणा आला की लोकशाही आली । धर्मभेद गेले । वंशभेद गेले । राष्ट्रभेद गेले। माणूसपणा म्हणजे सर्वश्रेष्ठ नीती ।

माणूसपणा आला की पिळवणूक गेली पिळवणूक गेली की भांडवलशाही गेली. भांडवलशाही गेली की साम्राज्यवाद गेला. शस्त्रसत्ता गेली. सहकार्य आले. 'मी' ही भावना जाऊन 'आम्ही' ही भावना आली. संमेलनात महाराष्ट्रात नामवंत लेखक, कवि, कथाकार जमले आहेत. मी स्वतः कवी व साहित्यिक नसल्यामळे तुम्हाला मी काय सांगणार. पण सत्यशोधक ना. भास्करराव जाधव यांनी साहित्याबद्दल मला जे मार्गदर्शन केले, तेच आपल्याला सांगणार आहे. १९३४ साली दासराय जाधव यांनी काढलेल्या बालमासिकात 'वन्देमातरम्' यावर मी एक संवाद घातला होता. तो–

मास्तर मुलांना म्हणतात– अरे ' वन्दे मातरम्' गीत म्हणा पाहू ?

अस्पृश्य मुलगा 'वंदेमातरम् म्हणजे काय ?'

मास्तर– वंदे, म्हणजे नमस्कार असो, मातरम् म्हणजे आईला, काळचा आईला. म्हणजे जमिनीला. कारण तीच आम्हाला अन्न देते, फळे देते, म्हणून तुला प्रणाम.'

अस्पृश्य – पण मास्तर, आम्हाला जमीन कुठं? आम्ही भूक लागली म्हणून समोरच्या शेतात जाऊन आंबे पाडले, शेतातली चार कणसे घेतली तर आम्हाला शेतकऱ्याने लाथा–बुक्या मारल्या, घेतलेली कणसे व शेताच्या बाहेर ढकलले व म्हणाला पुन्हा शेतात पाय टाकला तर कंबर मोडीन, मग आम्ही का त्या आईच्या पाया पडायचं? कुठं आहे आम्हाला आई?

हा लेख वाचल्यावर जाधवरावांनी मला आपल्या बंगल्यावर बोलावून घेतले. पाठीवर थाप मारली व म्हणाले, ' माधवराव, छान लेख लिहिलात, तुम्ही निर्भय आहात. तुमची भाषा अगदी सोपी आहे ती तशीच ठेवा जोडाक्षरे येऊ देऊ नका. संस्कृत आलाच तर खड्यासारखा निवडून बाजूस काढा.

लेख आईला अगर भांडी घासणारीला वाचून दाखवावे. त्यांना समजला म्हणजे पुरे तोच आपला बहुजन कष्टकरी समाज, बड्या साहित्यिकांची शिफारस नको. लेखकांनी व कवीनी महारवाड्यात, मांगवाड्यात जाऊन आपले कथा-लेख व काव्य वाचून दावावे. त्यांना समजले म्हणजे झाले. आंबेडकरांनी जी घटना तयार करून दिली ती टिळकाप्रमाणे एकांगी नाही, ती सर्वंकषक्रांतीकारक आहे. जग बदल घालुनी घाव' हे आंबेडकरांनी केवळ अण्णा भाऊ साठ्यांनाच सांगितले नसून तुम्ही-आम्ही सर्वांनीच घडून आणायचे आहे. अस्पृश्य हाच भारतातला खरा प्रोलिटोरिएट आहे त्यालाच अमरशेख बेभान होऊन गरजतात

'उघड नेत्र तो तिसरा भयंकर,
लाले लाल अंगार,
ऐतखाऊचे कर निर्दालन,
घे रूद्र अवतार,
घेई आता ही एकजुटीची मशाल
उचला निशान उचला निशान

एवढं बोलून मी समेलनाचं उद्घाटन करतो. ♠


मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
2015
23000
निवेध
20/3/15


REFBK-0023447

आमची दर्जेदार प्रकाशने

बौद्ध व दलित साहीत्याचे ग्रंथ

- ☐ **मूकनायक** : प्रा. गंगाधर पानतावणे
- ☐ **दलितांचे प्रबोधन** : प्रा. गंगाधर पानतावणे
- ☐ **दलितांचा जाहीरनामा** : प्रा. रामचंद्र क्षीरसागर
- ☐ **भारतीय रिपब्लीकन पक्ष** : प्रा. रामचंद्र क्षीरसागर
- ☐ **सामाजिक विचार मंथन** : भाई माधवराव बागल
- ☐ **दलित साहित्याची - प्रकाश यात्रा** : भालचंद्र फडके
- ☐ **प्रबुद्ध भारतातील अग्रलेख** : प्रा. क्षीरसागर / प्रा. पवार
- ☐ **बौद्ध संस्कार दर्शन** : भिक्षु संघरत्न
- ☐ **धम्मचक्र गिते** : बनसोड / नाईक
- ☐ **डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समर्पित मानपत्रे** : संपा. शंकरराव हातोले
- ☐ **ऐतिहासिक सत्याग्रह** : शंकरराव हातोले
- ☐ **सचित्र, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर चरित्र** : शंकरराव हातोले
- ☐ **रसिक रंजन (डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जिवनावर गाण्याचासंच)** : रोहम दिवेकर

• • • •

बौद्ध व दलीत साहित्याचे प्रकाशक

आनंद प्रकाशन

जयसिंगपुरा, औरंगाबाद ४३१००४